# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१२

**संस्थेचे पदाधिकारी**

श्री. जयसिंहभाई मरिवाला

श्री. रमेश जोशी

श्री. श्रीकांत सामळ

श्री. शिरीष पटवर्धन

**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**

श्री. सुनील कुलकर्णी

श्री. गणेश पवार

श्री. कमलेश शिंदे

**दूरध्वनी संपर्क**

श्री. जयंत शंकर कवठेकर

संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४

(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०

मो. : ९०११३८६३८६

किंमत रूपये ५/-

वार्षिक वर्गणी रूपये १००/-

(विशेषांकासह)

आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त

चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी या

नावाने काढावा.

## अंतरंग

- हृद्‌गत
- मुखपृष्ठ संकल्पना
- केंद्रीय कार्यक्रम वृत्तांत
- वार्षिक वृत्त
- यशोगाथा
- विशेष लेख
- आर्थिक स्थिती व आवाहन

**छपाई**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ** : श्री. विक्रांत दिघे

# ‘स्व’–रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

* पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर * श्री. प्रमोद चौधरी * श्री. प्रतापराव पवार

### संस्थापक सदस्य

- कै. पु. व. श्रॉफ
- कै. दत्तोबा तांबे
- श्री. रा. प. देसाई
- कै. कृ. ल. पटवर्धन
- कै. अ. न. गोगावले
- श्री. श्री. शं. सामळ
- कै. कां. गि. शहा
- श्री. कृ. गो. लवळेकर

### विद्यमान कार्यकारी समिती

***अध्यक्ष***

श्री. जयसिंहभाई मरिवाला

***उपाध्यक्ष***

श्री. उदय गुजर
श्री. आर. ए. मेहता
श्री. श्रीकांत सामळ
श्री. कल्याण वर्दे

***कार्याध्यक्ष***

श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी

***सहकार्याध्यक्ष***

श्री. शिरीष पटवर्धन
श्री. रामभाऊ डिंबळे

***कोषाध्यक्ष***

श्री. कन्हैयालाल बलदोटा

***सहकोषाध्यक्ष***

श्री. विलास कुलकर्णी

***कार्यवाह***

श्री. ज्ञानेश पुरंदरे

***सहकार्यवाह***

श्रीमती पुष्पाताई नडे
श्री. विश्वास कुलकर्णी
श्री. अमोल उंदरे

***सदस्य***

- प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर
- श्री. अजय कदम
- श्री. अरविंद केळकर
- डॉ. प्रदीप आगाशे
- श्री. सुनील कुलकर्णी
- श्री. विनोद बिबवे
- श्री. संजय तांबट
- सौ. मेघना अत्रे
- कु. लता टिळेकर
- डॉ. विनेश नगरे
- श्री. पराग लकडे
- कु. दीपाली पवार
- श्री. किशोर सोंडूर
- ॲड. सौ. निलिमाताई गोखले
- सौ. बागेश्री पोंक्षे
- श्री. अविनाश जोशी


**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**
संपर्काचा पत्ता : – ‘स्व’–रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.
दूरध्वनी : – (कार्यालय) – २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६
**100% Exemption available under Sec. 35-AC of the Income Tax Act 1961**
**(For the period 2011-2012 to 2013-2014) PAN No. : AAATS 5461K**
**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई–मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org
**धनादेश ‘स्व’–रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत

**स्वा**मी विवेकानंदांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सर्व भारतवर्ष स्वामीजींच्या प्रचोदक विचारांनी पुन्हा भारून गेले आहे. या निमित्ताने स्वामी विवेकानंदांची वचने वार्षिक वृत्ताच्या तळटीपांमध्ये उद्‌धृत केली आहेत. वर्धिनीचे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन सरांवर रामकृष्ण-विवेकानंदांच्या विचारांचा अत्यंत प्रभाव होता. वर्धिनीच्या स्थापनाकाळात स्वामीजींना अपेक्षित असे भारताचे चित्र बदलवू शकणारे ते संन्यस्त तरुण त्यांच्या डोळ्यासमोर होते; म्हणूनच वर्धिनीची स्थापना कशासाठी याचे उत्तर देताना, 'आम्हाला स्वच्छ हाताचे, समर्थ खांद्याचे, तल्लख बुद्धीचे आणि विशाल मनाचे राष्ट्रसमर्पित तरुण निर्माण करावयाचे आहेत,' हे त्यांनी नि:संदिग्धपणे सांगितले. या ध्येयानुसार गत ३३ वर्षे वर्धिनीची वाटचाल चालू आहे.

आज मितीस वर्धिनीच्या १७ शाखा आहेत. शिरवळ-भोर रस्त्यावरील विंग गावात नुकतीच सुरू झालेली ग्रामशाखाही चांगले बाळसे धरत आहे. ही वर्धिनीची दैनंदिन प्रभात शाखा आहे. भल्या पहाटे कितीही थंडी असली, तरी सुमारे ८० वर्धक-वर्धिका ठीक सहा वाजता मैदानावर हजर असतात.

वर्धकांच्या विकासासाठी झटणाऱ्या शाखास्तरावरील युवा कार्यकर्त्यांचेही व्यक्तिमत्त्व विकसन तितकेच महत्त्वाचे. यास्तव 'युवा गुणवर्धन केंद्रा'च्या माध्यमातून अनेकविध उपक्रमांच्या आधारे वाचन संस्कृती विकास, संवाद कौशल्य, अभ्यास पूरक कौशल्यांचा विकास, भाषा प्रभुत्व, वक्तृत्व-नेतृत्व विकसनाचे अनेक आयाम कार्यान्वित करण्यास प्राधान्य असणार आहे.

पूर्वांचलातील आसाम, मणिपूर या प्रांतांचे अभ्यासदौरे यावर्षी झाले. मणिपुरातील विद्यार्थ्यांशी नाते जोडण्यासाठी १२ वी चे कार्यकर्ते सुटीत दोन-तीन महिने म्यानमार सीमेवरील शाळांमध्ये काम करण्यासाठी जाणार आहेत. स्वामीजींना अभिप्रेत राष्ट्रीय एकात्मतेसाठी कर्तव्य भावनेने या विषयात अधिक लक्ष घालण्याचा संकल्प आहे.

'विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालविलेले केंद्र' ही स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची संकल्पना पुन्हा एकदा मूर्त रूप साकारते आहे. केंद्राच्या पुनरुज्जीवनानंतर सुमारे ४२ विद्यार्थी स्पर्धा परीक्षांत यशस्वी होऊन प्रशासनात उतरले आहेत. सहाय्यक परिचर्या वर्गाद्वारे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झालेल्या ग्रामीण व शहरी भागातील मुलींचे यश पाहून हा अभ्यासक्रम अनेक ठिकाणी सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

चहूदिशा व्याप्त होत असलेल्या या कार्याचा मूलाधार स्वयंप्रेरणेने कार्य करणारा कार्यकर्ता आहे. तो गुणसंपन्न, कर्तृत्वसंपन्न व्हावा यासाठी काही प्रेमळ, अनुभवसंपन्न हात त्याच्या पाठीवरून फिरण्याची आवश्यकता आहे. अनेक व्यवधानांमध्ये व्यग्र असलेल्या ज्येष्ठ समर्थ कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक या आधार फळीत सामील व्हायला हवे. समाजातील सृजनशील व्यक्तींचेही या कामी स्वागतच आहे.

स्व. किशाभाऊ श्री रामकृष्णांनी सांगितलेली एक कथा नेहमी सांगायचे. एका श्रीमंत गृहस्थाकडे त्याच्या लहान मुलाच्या संगोपनासाठी एक दाई काम करीत असे. त्या मुलाला न्हाऊ-माखू घालताना, त्याला घास भरवताना तिचे डोळे भरून यायचे. त्या गृहस्थाने दाईला याचे कारण विचारले. दाई म्हणाली, ''माझ्या घरी माझं तान्हुलं एकटंच आहे. त्याला घास कोण भरवणार ? ते माझी वाट पहात असेल....''

'जगात कुठेही असलो तरी वर्धिनी सदैव आपली वाट पहात असेल,' असेच तर किशाभाऊंना यातून सुचवायचे नसेल ना !

**धर्म ही अशी वस्तू आहे की जिच्यामुळे पशुचे मनुष्यात आणि मनुष्याचे ईश्वरात रूपांतर होते.**

## मुखपृष्ठ संकल्पना

रामकृष्ण गेले आणि विवेकानंद अस्वस्थचित्त झाले. हा चित्ताचा दाह कमी व्हावा आणि समाजजीवन व सभोवतालचे जग जवळून पाहावे यासाठी विवेकानंदांनी देशयात्रेला प्रारंभ केला. तीन वर्षे काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत स्वामीजी भ्रमंती करीत राहिले. या भ्रमंतीने त्यांना एक वेगळे भान दिले, त्यांच्या जीवनाला राष्ट्रनिष्ठेचे एक परिमाण प्राप्त करून दिले. या परिभ्रमणाच्या ओघात विवेकानंद रानोमाळ फिरले. नगरे, पठारे, गिरिगव्हरे, राजप्रासाद, धर्मशाळा, झोपड्या, खोपट्या, निबिड अरण्ये, निर्जन वाळवंटे यांनी घडलेला देश स्वामीजींनी पाहिला. 'नित्य नवा दिस जागृतीचा' जगणाऱ्या विवेकानंदांनी परिव्राजक दशेतील या परिभ्रमणाची सांगता कन्याकुमारीच्या दर्शनाने केली. कन्याकुमारीची तपोभूमी म्हणून पुराणप्रसिद्ध असलेला हा खडक स्वामीजींच्या देशयात्रेतील शेवटचा टप्पा ठरला. या खडकावर स्वामीजींना आपल्या जीवनाचे नवे प्रयोजन सापडले. देश या कल्पनेने त्यांच्या धर्मविचारात प्रवेश केला. फूल उमलताक्षणीच त्यातून सुगंध दरवळत राहावा त्याप्रमाणे विवेकानंदांच्या धर्मचिंतनाला देशभक्तीचा परिमल प्राप्त झाला. आजवर धर्म हा मोक्षासाठी आणि मोक्षापुरता होता, तो व्यक्तिप्रधान होता. व्यक्तिहित हे महत्त्वाचे खरे; परंतु देशहित, समाजहित तेवढेच महत्त्वाचे आहे. 'व्यक्तीचा मोक्ष आणि समाजाचे हित' अशी एक संयुक्त संकल्पना स्वामीजींच्या मनात आकाराला आली. मोक्षासाठी बंधनातीत व्हावे लागते. त्यासाठी परित्यागाचा मार्ग पत्करावा लागतो. समाजहित हे सेवेने साधता येते. सेवा म्हणजे अनुकंपा नव्हे, करुणाबुद्धी नव्हे. आपल्याखेरीज अन्य व्यक्तींच्या ठायी असणाऱ्या अंगभूत दिव्यत्वाचे ते पूजन होय. धर्म ही या आंतरिक दिव्यत्वाची आराधना असते. हे दिव्यत्व जातीपातीपलीकडे असते. त्याचे पूजन सेवाभावाने करणे हेच यथार्थ धर्मजीवन होय. स्वामीजी म्हणाले, "True aim of religion is to draw attention to the divinitiy already in man." हे काम जेवढे सोपे तेवढेच अवघड आहे. असंख्य माणसे अज्ञानाच्या तिमिरात गुरफटलेली आहेत. कोणी भुकेपायी कंगाल झाले आहे, आपले मूळ रूप हरवून बसले आहे. त्यांना 'स्व-रूप' प्राप्त होत नाही, तोपर्यंत 'स्व-राज्य' कसे अस्तित्वात येणार ? कन्याकुमारीच्या खडकावर स्वामीजींनी आपल्या नव्या जीवनदर्शनाचा पाया घातला. येत्या पन्नास वर्षांत राष्ट्र हेच दैवत समजून सर्वांनी उद्योगाला लागावे. ध्यानमग्न संन्यस्तांनी भूतमात्रासाठी मोक्षत्याग करावा आणि देशाच्या उभारणीच्या उद्योगात आपले तप आणि सत्त्व वेचावे. पण हे करावे कसे ? स्वामीजींना मार्ग दिसू लागला, विचार सुचू लागला. पश्चिमेचे तंत्रज्ञान भारतात आणावे व देशाची दुरवस्था दूर करावी. भारताचे तत्त्वज्ञान पश्चिमेला सांगावे आणि प्रगत राष्ट्रांच्या समृद्ध जीवनाला आत्मज्ञानाचा स्पर्श घडवावा. पूर्व आणि पश्चिम, विज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय झाल्याशिवाय जीवनाला पूर्णत्व नाही. पश्चिमेने पूर्वेला विज्ञान द्यावे, पूर्वेने पश्चिमेला तत्त्वज्ञान द्यावे. दोघांनी मिळून विश्वकल्याणाचे पसायदान गावे. या उत्तुंग कल्पनेचे स्फुरण स्वामीजींना घडले, ते तीन सागरांच्या संगमस्थानावर असणाऱ्या त्या शिलाखंडावरच. याच जागी आज 'विवेकानंद-स्मारक' उभे आहे.

**- प्राचार्य शिवाजीराव भोसले**

('दीपस्तंभ' या पुस्तकातून पूर्वपरवानगीने साभार)

**आपण ईश्वर आहोत आणि अगदी खालच्या पातळीवरील मनुष्यही ईश्वर आहे**
**ह्या जाणिवेहून उदात्ततम हेतू कोणता असू शकेल ?**

# सदा विवेकानन्दमयम्

भुवनमण्डले नवयुगमुदयतु सदा विवेकानन्दमयम् ।
सुविवेकमयं स्वानन्दमयम् ।। ध्रु ।।
तमोमयं जनजीवनमधुना निष्क्रियताऽऽलस्य ग्रस्तम् ।
रजोमयमिदं किंवा बहुधा क्रोधलोभमोहाभिहतम् ।
भक्तिज्ञानकर्मविज्ञानै भवतु सात्विकोद्योतमयम् ।। १ ।।

वह्निवायुजलबलविवर्धकं पाञ्चभौतिकं विज्ञानम् ।।
सलिलनिधितलं गगनमण्डलं करतलफलमिव कुर्वाणम् ।
दिक्षुविकीर्णं मनुजकुलमिदं घटयतुचैककुटुम्बमयम् ।। २ ।।

सगुणाकारं ह्यगुणाकारं एकाकारमनेकाकारम् ।
भजन्ति एते भजन्तु देवं स्वस्वनिष्ठया विमत्सरम् ।
विश्वधर्ममिममुदारभावं प्रवर्धयतु सौहार्दमयम् ।। ३ ।।

जीवे जीवे शिवस्वरूपं सदा भावयतु सेवायाम् ।
श्रीमदूर्जितं महामानवं समर्चयतु निजपूजायाम् ।
चरतु मानवोऽयं सुहितकरं धर्मं सेवात्यागमयम् ।। ४ ।।

**- सौजन्य :**
**स्वामी विवेकानंद सार्धशती**
**समारोह समिती**

**ज्ञान हे आतूनच प्रकट होत असते. लहान मूल आपल्या स्वभावानुसार स्वत:चा विकास करून घेत असते. तुम्ही फक्त विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करू शकता.**



हनुमंताचे चरित्रच आता तुम्हाला आदर्शरूप मानले पाहिजे.
प्रभू रामचंद्रांच्या आज्ञेने त्यांनी महासागर कसा ओलांडला ते पहा,
जीवन मरणाची तमा त्यांनी कधीच बाळगली नाही.
ते पूर्ण जितेंद्रिय होते, विलक्षण बुद्धिसंपन्न होते.
दास्यभक्तीच्या ह्या महान आदर्शानुसार
तुम्ही आता आपले जीवन घडविले पाहिजे.
या आदर्शामधूनच इतर सर्व आदर्श
हळूहळू तुमच्या जीवनात प्रकट होतील.
गुरु आज्ञेचे नि:शंक पालन आणि पूर्ण ब्रह्मचर्य
यांतच यशाचे रहस्य साठलेले आहे.
एकीकडे हनुमान जसे सेवाव्रताच्या आदर्शाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत,
तसेच दुसरीकडे ते सिंहासारख्या पराक्रमाचे देखील प्रतीक आहेत.

**- स्वामी विवेकानंद**

**तुमच्या स्वत:च्या आत्म्याव्यतिरिक्त तुमचा दुसरा कोणीही शिक्षक नाही.**

# केंद्रीय कार्यक्रम वृत्त

## शाखा विभाग - मकर संक्रमण उत्सव

'जन-गण-मन' या आपल्या राष्ट्रगीताच्या शताब्दीचे वर्ष. कवी रवींद्रनाथांनी लिहिलेल्या राष्ट्रगीतातील पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, वंग या प्रांतातील लोकजीवन, तेथील इतिहास, कला, संगीत, नृत्य आणि या प्रांताचे राष्ट्रउभारणीतील योगदान हे महानाट्याद्वारे सादर केले गेले. महानाट्यामध्ये ६०० वर्धक-वर्धिकांचा सहभाग होता. महानाट्याची संकल्पना श्री. ज्ञानेश पुरंदरे यांची तर संहिता श्री. मंदार परळीकर यांची होती. दिग्दर्शन श्री. निलेश धायरकर यांनी केले. महानाट्याद्वारे प्राचीन ऋषी-मुनी, गुरु गोविंदसिंह, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदासस्वामी, छत्रपती शिवराय, विद्यारण्य स्वामी, राजा कृष्णदेवराय, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद अशा महापुरुषांच्या कार्याचे दर्शन घडविण्यात आले. शनिवारवाड्याच्या प्रांगणामध्ये झालेल्या या उत्सवासाठी प्रमुख अतिथी म्हणून 'कॉसमॉस बँके'चे उपाध्यक्ष श्री. कृष्णकुमार गोयल तर प्रमुख वक्ते म्हणून निवृत्त कर्नल श्री. सदानंद साळुंखे हे उपस्थित होते. यावेळी सातवीतील कुमार सौरभ पायघन व आठवीतील कुमार पार्थ कश्यप यांनी वार्षिक वृत्तांत संवादाच्या माध्यमातून मांडला. वर्धिनीच्या कामामागील उद्देश डॉ. विनेश नगरे यांनी प्रास्ताविकात मांडले. वर्धिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. रघुनाथ नरवणे सर यांचा सहस्रचंद्रदर्शनानिमित्त हृद्य सत्कार करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष श्री. उदय गुजर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुवर्णाताई शेडगे यांनी केले. श्री. अनिरुद्ध गायकवाड व श्री. ओंकार सोनावणे यांनी अत्यंत कल्पकतेने नेपथ्य रचना केली होती. वर्धिनीचे सर्व पालक, हितचिंतक, देणगीदार, संक्रांत कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. दर्जेदार महानाट्य सादर केल्याबद्दल सर्वांनी वर्धक व युवकांचे कौतुक केले.

## गुणगौरव समारंभ

जुलै महिन्यात गुणगौरव समारंभ हा भागशः पार पडला. गतवर्षी उत्तम यश संपादन केलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रमुख अतिथींच्या हस्ते पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले. यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात वक्त्यांनी वर्धक-वर्धिकांना यशाची गुरुकिल्ली सांगितली.

| | वक्ते | बक्षिसपात्र विद्यार्थी |
|---|---|---|
| भाग क्र. १ | श्री. एकनाथ बुरसे<br>श्री. सुरेंद्रशेठ गाडवे | ५० |
| भाग क्र. २ | इन्स्पेक्टर सुनील जगताप | ७५ |
| भाग क्र. ३ | श्री. दत्तात्रय निंबाळकर | ५० |
| भाग क्र. ४ | डॉ. सतीश राजमाचीकर | ३० |
| भाग क्र. ५ | निवृत्त कॅप्टन स्मिताताई गायकवाड | ३० |

प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी काका हलवाई स्वीट सेंटर, टिळक रोडचे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी सर्व शाखांच्या वर्धकांना पेढे रूपाने देणगी देऊन त्यांचे कौतुक केले.

**ईश्वर मनुष्य बनला आहे; मनुष्य पुनः ईश्वर बनेल.**

## रक्तदान शिबिर व पाणपोई

दि. १४ एप्रिल म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. बाबासाहेबांच्या स्मृतींना मानवंदना देण्यासाठी ससून रुग्णालय परिसरात असणाऱ्या बाबासाहेबांच्या पुतळ्यापाशी प्रचंड गर्दी होते. रखरखत्या उन्हामध्ये तहानेने हे सर्व व्याकूळ होतात. त्यांच्या सोयीसाठी वर्धिनी पाणपोईचा उपक्रम राबवते. यावर्षी पाणपोईच्या उद्घाटनासाठी कामगार नेत्या श्रीमती मुक्ता मनोहर उपस्थित होत्या. त्यांच्यासमवेत श्री. प्रकाश जाधव, श्री. गमरे, श्री. प्रकाश चव्हाण, श्री. मधुकर नरसिंगे हे कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. पाणपोईची संपूर्ण व्यवस्था भगिनी निवेदिता शाखेच्या वर्धिकांनी व समर्थ रामकृष्ण शाखेच्या वर्धकांनी समर्थपणे सांभाळली. यावर्षी ६०० जणांनी पाणपोईचा लाभ घेतला.



सायंकाळी जनकल्याण रक्तपेढी, स्वारगेट यांच्या मदतीने वर्धिनीच्या वास्तूमध्ये 'रक्तदान शिबिर' आयोजित केले होते. सौ. प्रेमा नडे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. १२७ रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या. रक्तदान शिबिराची व्यवस्था श्री. अमोल पांगारे व श्री. अमोल कुसुरकर यांनी सांभाळली.


## संपदा सहकारी बँक लि.,पुणे

**मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२**
**दूरध्वनी क्र.: (०२०) २४४५६०८३, २४४५१८३०**
**ई-मेल : sampadabank@rediffmail.com**

* सतत 'अ' ऑडिट वर्ग असलेली व लाभांश देणारी बँक
* ठेवींवर १०.००% व्याजदर (ज्येष्ठ नागरिक व अपंग व्यक्तींना अर्धा टक्का जास्त व्याज)
* सर्व प्रकारचे कर On-line भरण्याची सुविधा
* उद्योजक व व्यापारी बंधूंसाठी 'उद्योग उत्कर्ष' कर्ज योजना
* सुलभ हप्त्यात व अल्प व्याजदरात वाहन कर्ज योजना, सोने तारण कर्ज योजना व अन्य कर्ज योजना

| सुभाष रावळ | अश्विनीकुमार उपाध्ये | सी. ए. विवेक मठकरी |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**आजचा आपल्या नजीकच्या शाखेशी त्वरित संपर्क साधा.**

| | |
|---|---|
| * बुधवार पेठ शाखा, पुणे | फोन नं. २४४५६०८३, २४४५१८३० |
| * चाकण शाखा, जिल्हा पुणे | फोन नं. ०२१३५-३००५९०, २४९७३३ |
| * सुभाषनगर शाखा, पुणे | फोन नं. २४४९५०२२, २४४९५४३४ |
| * कर्वे रोड शाखा, पुणे | फोन नं. २५३९५८७६, २५३९४०६२ |
| * धायरी शाखा, पुणे | फोन नं. २४३९१४७०, २४३९१४७१ |

**ग्राहकांच्या सेवेसाठी लवकरच पुणे नगर रस्त्यावर कोरेगाव भीमा येथे बँकेची शाखा सुरू.**


**परोपकार करणे हा धर्म होय; दुसऱ्याला पीडा देणे हा अधर्म होय.**

## वर्षारंभ उपासना

**आनंदाची गुढी उभारा । आनंदाची गुढी ।**

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू नववर्षदिन !

दरवर्षीप्रमाणे वर्षारंभ उपासना ओंकारेश्वर मंदिरात झाली. यावेळी युवक-युवती, वर्धिनीचे हितचिंतक, देणगीदार असे २०० जण उपस्थित होते. मार्गदर्शन करण्यासाठी विज्ञानभारतीचे अखिल भारतीय संघटनमंत्री श्री. जयंतराव सहस्रबुद्धे हे उपस्थित होते. युवक हे राष्ट्राचे खरे धन आहे. युवकांनी वेळेचे योग्य नियोजन करून समाजासाठी काही तरी केले पाहिजे, असा विचार त्यांनी याप्रसंगी मांडला.

## संस्था वर्धापनदिन -

**१३ मे ला वर्धिनीचा ३३ वा वर्धापनदिन वर्धिनीच्या वास्तूत पार पडला. यावेळी युवक-युवती, वर्धिनीचे हितचिंतक उपस्थित होते. प्रथम 'आजची सामाजिक परिस्थिती व सामाजिक कार्यासाठी वेळ काढण्याची गरज' या विषयावर गटचर्चा घेण्यात आली व चर्चेनंतर पूर्वांचलमध्ये आठ वर्षे पूर्ण वेळ संघाचे काम करणारे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. सुनील देवधर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी व्याख्यानामध्ये मांडलेले विचार पुढे देत आहोत.**

★ प्रत्येक सजीव गोष्ट ही जन्माला येते व मरण पावते. परंतु 'स्व'-रूपवर्धिनीसारख्या सामाजिक संस्था या तत्त्वाला अपवाद आहेत. कारण ही एक चेतना आहे. जी नेहमी इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

★ वर्धापनदिन साजरा करण्याच्या पद्धती या निरनिराळ्या असतात. पण संस्थेचा वर्धापनदिन साजरा करणे हे पूर्णत: वेगळे आहे.

★ भारतीय संस्कृती ही 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही शिकवण देणारी आहे. भारतीय संस्कृतीचे मिष्टान्नाशी वाकडे नाही. पण केक सजवून त्यावरील मेणबत्त्या विझवणे हा कोणता पराक्रम ? याला भारतीय संस्कृतीचा विरोध आहे.

★ अंधाराला लाठ्या-काठ्या मारून, त्याला ओढून अंधार पळवता येत नाही. तो पळवायचा असेल तर एक दिवा प्रज्वलित करणे हा त्यावरील उत्तम उपाय आहे. वर्धिनीचे काम हे दीप प्रज्वलनाचे आहे.

★ आज भारताला विविध समस्या भेडसावत आहेत. पूर्वांचलाचा प्रश्न, बेरोजगारी, अस्पृश्यता, स्त्रीभ्रूणहत्या अशा असंख्य समस्या दत्त म्हणून उभ्या आहेत.

★ आज दिवसाला ६००० बांगलादेशी घुसखोर भारतात घुसत आहेत. ईशान्येकडे चीन हा भारताला गिळंकृत करीत आहे. चिनी सरकार तेथील लोकांना आमिष दाखवून 'तुम्ही भारतीय नाही' ही भावना त्यांच्या मनात रुजवत आहे. पण अशा परिस्थितीत त्यांच्या या आमिषाला बळी न पडता सर्व अरुणाचल प्रदेशातील जनता अभिमानाने सांगते, 'We are Indian'.

★ व्रताचा संकल्प करणं सोपं आहे. पण ते पूर्णत्वास नेणं हे अवघड असते. संस्थेचा कार्यकर्ता या नात्याने व्रतपूर्तीमध्ये काही अडचणी येतात त्यांना तोंड दिले पाहिजे.

**आज आपल्या देशाला लोखंडी स्नायूंची आणि पोलादी मज्जातंतूंची खरी गरज आहे.**

★ संस्थेच्या वर्धापनदिनी आपण विचार करावा, आपण येथे कसे आलो ? का आलो ? आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी कोणी अथक परिश्रम केले ? आपला बहुमूल्य वेळ अनेकांनी आपल्या वाढीसाठी दिला आहे याचे स्मरण असावे.

★ लक्ष्य गाठण्यासाठी साधनाची आवश्यकता असते. राष्ट्रउद्धाराच्या महत् कार्यात 'स्व'-रूपवर्धिनी हे आपल्याला मिळालेले उत्तम साधन आहे.

★ आईचा विरह हा कोणत्याही चीजवस्तूने भरून निघत नाही. आईचा प्रेमळ खांदा हा आपल्याला शेवटपर्यंत आधारदायी असतो. अशी आपली सर्वांची माता भारतमाता तिच्या छत्राखाली आपण सुरक्षित आहोत.

★ आपल्यामधील 'मला काय त्याचे ?' ही संकुचित भावना नष्ट झाली पाहिजे. जगातील प्रत्येक व्यक्तीचा प्रत्येक व्यक्तीशी संबंध असतो. अमेरिकेत काय झाले तर त्याची झळ भारतातील सामान्य नागरिकाला बसू शकते.

★ आपल्या ऐहिक सुखाला आपण बंधन घातले पाहिजे. खूप पैसा, धन, दौलत आली म्हणजे देश मोठा झाला ही भावना साफ चुकीची आहे. याला प्रगती कधीच म्हणत नाही आणि काही ठराविक लोक याला प्रगती म्हणत असतील तर अशा प्रगतीची भारताला आवश्यकता नाही.

★ समाजातील श्रीमंत वर्गाच्या वागणुकीकडे बघून गरीब जनताही तसं वागण्याचा, ऐषोआराम उपभोगण्याचा विचार करते आणि कालांतराने मागून मिळत नसेल तर हिसकावून घेण्याची ही वृत्ती बनते व गुन्हेगारीला जन्म घालते.

★ राष्ट्राचे समस्याधारी रूप बदलण्यासाठी काय करावं ? यासाठी आवश्यक आहे परिवर्तन आणि हे परिवर्तन कोण घडवेल तर 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्यकर्ते. सेवाव्रती असे युवक कार्यकर्ते घडले पाहिजेत, घडविले पाहिजेत.

★ **'धर्मो रक्षति रक्षितः'** या वचनाप्रमाणे जर तुम्ही धर्माचं रक्षण केलं तर धर्म तुमचं रक्षण करतो. जर तुम्ही देशाचं रक्षण केलं तर देश तुमचं रक्षण करणार.

★ सामाजिक कामात 'हे मी केलं, माझ्यामुळं झालं' ही भावना मनातही न येणं म्हणजे उत्तम कार्य घडलं असं म्हणावं.

★ वर्धिनीच्या संस्कारातून जीवनपुष्प फुलवून भारतमातेच्या चरणी अर्पित होऊन जावे.

★ 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्यकर्ते परीसाहून श्रेष्ठ आहेत. परीस हा फक्त लोहाचे सुवर्ण करतो. परंतु त्याच्यासारखा दुसरा परीस तो निर्माण करू शकत नाही. परंतु वर्धिनीचे कार्यकर्ते स्वत:सारख्या सेवाव्रती व्यक्ती घडवितात.

★ जे अचेतन असतं, ते प्रवाहासोबत वाहत जातं. पण जे चेतनादायी असतं, ते प्रवाहाच्या प्रतिकूलतेतही आपली वाट निवडते.

★ स्वत: दीपज्योतीप्रमाणे जळून दुसऱ्यांसाठी प्रकाश बनणे नेहमी अवघड असते.

★ अवघड परिस्थितीत अश्रू ढाळणे सोपे असते; पण अशाही परिस्थितीत हसत राहणे अवघड असते.

❖ ❖ ❖

**नीतिपरायण व्हा, वीर बना, निष्कपट बना – तुमच्या चारित्र्याला कोणत्याही प्रकारचा कलंक लागू देऊ नका.**

## दुर्गदिन

एक मे म्हणजे महाराष्ट्रदिन ! हा दिवस दुर्गदिन म्हणूनही साजरा केला जातो. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेमध्ये महाराष्ट्रातील मावळ्यांप्रमाणे महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेचाही महाराजांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. 'ज्याचा किल्ला, त्याचा प्रदेश' या तत्त्वाप्रमाणे महाराजांनी काही किल्ले घेतले, काही बांधले. तोरणा किल्ल्यावर उभे असताना दिसलेल्या मुरुंब देवाच्या डोंगरावर त्यांनी अजिंक्य असा राजगड उभा केला. गरुडाने स्वच्छंदीपणे आकाशात विहार करावा त्याप्रमाणे राजगडाचे रूप दिसते. संजीवनी, सुवेळा, पद्मावती या तीन माच्या, बालेकिल्ला, संरक्षक असे चिलखती बुरुज हे गडाचे वैशिष्ट्य आहे.

महाराजांनी गड बांधताना कोठेही आपल्या नावाचा उल्लेख केला नाही. अत्यंत निस्वार्थी मनाने अजिंक्य अशा उभ्या केलेल्या या राजगडाचे पावित्र्य, सौंदर्य धोक्यात आले आहे. गडावर पर्यटकांची वर्दळ, त्यातून निर्माण झालेला कचरा, अस्वच्छता यामुळे त्याचे सौंदर्य क्षणोक्षणी दूषित होत चालले आहे. अनेक किल्ल्यांवर असेच दृश्य दिसते. या गोष्टींना आळा घालण्यासाठी दरवर्षी आपण दुर्गदिन साजरा करतो. यावर्षी भाग दोन मधील स्वामी अखंडानंद, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी शिवानंद व धर्मवीर शंभू राजे शाखांमधील ७० वर्धक व ३० युवकांची दि. ५ मे ते ८ मे या कालावधीत राजगडावर स्वच्छता मोहीम आखण्यात आली.

## १५ ऑगस्ट - स्वातंत्र्यदिन

यावर्षी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम हा भागश: घेण्यात आला. भाग एक व भाग चार मधील शाखांचा कार्यक्रम बीएमसीसी कॉलेज येथे झाला तर भाग दोन व भाग तीन मधील शाखांचा कार्यक्रम न्यू इंग्लिश स्कूल, टिळक पथ, येथे झाला. दोन्हीही कार्यक्रमाची एकूण संख्या ही ८५० होती. या कार्यक्रमाला इयत्ताश: विविध मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या व त्यानंतर वर्धक युवकांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांना मार्गदर्शन करण्यासाठी अनुक्रमे श्री. योगेश्वर घोघले व श्री. उदयभाई गुजर उपस्थित होते.

## श्री गणेश प्राणप्रतिष्ठापना वर्ग

गणपती ही विद्येची देवता. या देवतेची समंत्र प्रतिष्ठापना घरोघरी होते. ही पूजा समाजातील सर्व स्तरातील व्यक्ती करू शकतात. प्रश्न असतो ही पूजा करायची कशी ? यामुळे गेल्या काही वर्षांपासून 'स्व'-रूपवर्धिनी व ज्ञानप्रबोधिनीच्या संस्कृत संस्कृती संशोधिका (संत्रिका) विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात श्री गणेश प्राणप्रतिष्ठापना वर्ग घेण्यात आला. पाच ठिकाणी झालेल्या या वर्गास विद्यार्थी, महिला, पुरुष असे सुमारे ६०० जण उपस्थित होते.

## गणेशोत्सव

वर्धिनीचा गणेशोत्सव म्हणजे एक वेगळाच उत्साह आणि आनंद. १६ शाखांपैकी ८ शाखांनी ढोल-ताशा, घुंगुरकाठी, झांज, लेझीम, टिपरी यांसारखी पथके बसविली होती व अन्य ८ शाखांनी पथनाट्य बसविली होती. ही पथनाट्ये पुण्यातील प्रमुख गणेश मंडळांसमोर सादर करण्यात आली. शाखांनी समाजप्रबोधनपर विषयांवर पथनाट्ये बसविली. उत्सव प्रमुख म्हणून श्री. दीपक भोरेकर यांनी व सांस्कृतिक प्रमुख म्हणून श्री. शंतनु

**सामर्थ्य आणि पौरुष हा धर्म होय; दौर्बल्य आणि भेकडपणा हा अधर्म होय.**

पाटसकर यांनी व्यवस्था पाहिली.

शाखांनी पुढील विषयांवर पथनाट्ये बसविली-

- ❖ दहशतवाद-मला काय त्याचे ?
- ❖ दहशतवाद-एक शाप
- ❖ आपली भारतीय संस्कृती
- ❖ सोशल नेटवर्किंग-शाप की वरदान
- ❖ देश : आमचा की माझा ?
- ❖ मला ८ वी पास व्हायचंय.

पथनाट्यांबरोबर स्वामी शिवानंद व भगिनी निवेदिता शाखेने तलवार, दांडपट्टा या मैदानी खेळाची प्रात्यक्षिके सादर केली. भवानी पेठ शाखेने 'हम करे राष्ट्रआराधन' या पद्यपर पथनाट्याचे सादरीकरण केले. धर्मवीर शंभू राजे शाखेतील वर्धकांनी 'गाथा यशाची : आमुच्या इतिहासाची' हा इतिहासपर गीतगायन व निवेदनाचा कार्यक्रम सादर केला.

शाखांची पथके श्रीगणेश सेवा मंडळ ट्रस्ट, गोसावीपुरा मित्र मंडळ, वीर नेताजीवाडी, श्रीसिद्धीविनायक मित्र मंडळ, दत्तवाडी नगर मित्र मंडळ, विक्रांत मित्र मंडळ, बालाजी मित्र मंडळ, तुळशीबाग मित्र मंडळ आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई मित्रमंडळ या मंडळांसमोर सादर करण्यात आली.

## क्रीडादिन

यावर्षीचा क्रीडादिन दोन भागांमध्ये विभागला होता. ९ डिसेंबरला युवकांसाठी सायकल स्पर्धा घेण्यात आली. यात एकूण ९ संघांनी भाग घेतला. एका संघात ६ खेळाडूंचा समावेश होता. ओंकारेश्वर मंदिर, पाषाण, चांदणी चौक मार्गे परत ओंकारेश्वर मंदिर असा एकूण २५ कि.मी.चा मार्ग होता. प्रथम आलेल्या संघाने एक तास पाच मिनिटे एवढ्या वेळात ही स्पर्धा पूर्ण केली.

त्या दिवशी दुपारी वर्धिनीच्या इमारतीवर सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ५ वी पासून महाविद्यालयीन गटापर्यंत सर्व वर्धकांचा सहभाग होता. एकूण २५ संघांनी यात भाग घेतला. परीक्षणासाठी विविध शाळांमधील व सूर्यनमस्कार क्षेत्रातील तज्ज्ञ परीक्षक उपस्थित होते.

दि. १६ डिसेंबरला बृहन् महाराष्ट्र महाविद्यालयाच्या मैदानावर वैयक्तिक आणि सांघिक मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. वैयक्तिक स्पर्धांमध्ये १०० मी. धावणे, १५०० मी. धावणे आणि गोळाफेक अशा तीन स्पर्धा होत्या तर सांघिक स्पर्धांमध्ये गोल खो-खो, उभा खो-खो, हॅन्डबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. यातील गोल खो-खो आणि हॅन्डबॉल या स्पर्धा यंदा प्रथमच घेण्यात आल्या. या खेळांच्या प्रशिक्षणासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू सौ. मनिषा भोरेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन होते. त्या बरोबरच श्री. दीपक भोरेकर व श्री. उमेश बिबवे या युवकांनीही शाखांवर जाऊन प्रशिक्षण दिले. नवीनच खेळ असल्यामुळे वर्धकांनी त्यात उत्साहाने भाग घेतला. यावर्षी एकूण सहा नवीन खेळांचा समावेश क्रीडादिनामध्ये केल्यामुळे अधिकाधिक मुलांचा सहभाग खेळांमध्ये दिसून आला. विशिष्ट शारीरिक कौशल्ये ध्यानात ठेवून या क्रीडादिनाची रचना केली होती. वेग मोजण्यासाठी १०० मी. धावणे, वेग आणि दमसास पाहण्यासाठी १५०० मी. धावणे आणि ताकद आजमावण्यासाठी गोळाफेक, लवचिकता आणि स्नायूंची सुयोग्य हालचाल पाहण्यासाठी सूर्यनमस्कार तर संघटन कौशल्य पाहण्यासाठी सांघिक खेळ या सर्व खेळांचे आयोजन करण्यात आले.

**दुसऱ्यांवर प्रेम करणे हा धर्म होय; दुसऱ्यांचा द्वेष करणे हा अधर्म होय.**

### वैयक्तिक स्पर्धा :

| प्रथम क्रमांक | १०० मीटर धावणे | १५०० मीटर धावणे | गोळाफेक |
|---|---|---|---|
| ५ वी-६ वी | आकाश मुळे | अतुल भोसले | - |
| ७ वी-८ वी | लोकेश खाटपे | अमित आदवडे | रोहन वाडेकर |
| ९ वी-१० वी | श्रीतेज दिघे<br>आशुतोष खैरे | विपुल गावडे<br>विजय सणस | ऋषीकेश नरसाळे |
| ११ वी-१२ वी | नेताजी कमळीकर | कुणाल भरगुडे | हर्षल खैरनार |
| महाविद्यालयीन | अमोल पांगारे | अतुल बिबवे | कृष्णा पिंगळे |

### सांघिक स्पर्धा :

| खेळ प्रकार | गट | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|
| सायकलिंग | युवक गट | ब्रह्मानंद शाखा | अभेदानंद शाखा | समर्थ रामकृष्ण शाखा |
| सूर्यनमस्कार | ५वी-६वी<br>७वी-८वी<br>९वी-१०वी<br>महाविद्यालयीन<br>वर्धिका गट | अभेदानंद शाखा<br>समर्थ रामकृष्ण शाखा<br>दयानंद सरस्वती शाखा<br>दयानंद सरस्वती शाखा<br>भगिनी निवेदिता शाखा | धर्मवीर शंभूराजे शाखा<br>श्रद्धानंद शाखा<br>श्रद्धानंद शाखा<br>समर्थ रामकृष्ण शाखा | सुबोधानंद शाखा<br>ब्रह्मानंद शाखा<br>समर्थ रामकृष्ण शाखा |
| गोल खो-खो | ५वी-६वी | दयानंद सरस्वती शाखा | | |
| उभा खो-खो | ७वी-८वी | ब्रह्मानंद शाखा | | |
| हॅन्डबॉल | ९वी-१०वी | दयानंद सरस्वती शाखा | | |
| कबड्डी | ११वी-१२वी | श्रद्धानंद शाखा | | |
| व्हॉलीबॉल | व्यावसायिक | स्वामी योगानंद | | |

अत्यंत जोशात, उत्साहात वर्धक गटाचा क्रीडादिन पार पडला. या क्रीडादिनाला बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सी. एन. रावळ सर हे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सर्व विजयी संघांना व स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. सी. एन. रावळ सर यांनी परिश्रम, परिवर्तन, प्रयत्न, परिणाम आणि पश्चात्ताप या पाच 'प'चे महत्त्व सांगितले. त्यांच्या वतीने यावेळेस १५०० मी. धावणे स्पर्धेत प्रथम आलेल्या सर्व स्पर्धकांना बक्षीसे देण्यात आली.

**एकत्वाचे ज्ञान हा धर्म होय; भेद पाहणे हा अधर्म होय.**

**भात लावणी (विंझर गाव) :**

ऑगस्ट महिना म्हटलं की मुसळधार पाऊस. हा पाऊस आपल्या शेतकरी बांधवांसाठी खूप महत्त्वाचा. आपल्या शेतामध्ये विविध प्रकारची पिके याच ऋतूमध्ये तो घेतो. वेल्ह्याजवळील विंझर गावी तांदूळ हा मोठ्या प्रमाणावर पिकवला जातो. पण या पिकाची लावणी कशी करायची हे जाणून घेण्यासाठी वर्धिनीच्या परिवारातील ॲड. सदानंद फडके यांच्या मार्गदर्शनाखाली ७५ युवक ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात भातलावणीसाठी विंझर गावी गेले होते. गुडघाभर चिखलामध्ये भाताची पिकं कशी लावावीत हे तेथील शेतकऱ्यांनी युवकांना शिकविले. प्रत्यक्ष शेतात कामाचा अनुभव सर्व युवकांनी घेतला. पाठ्यपुस्तकी ज्ञानापेक्षा हे प्रत्यक्ष ज्ञान अनुभवास मिळाले. गुडघाभर चिखल आणि वरून पडणारा पाऊस असा अविस्मरणीय अनुभव युवकांनी घेतला.


**नील इंजिनियर्स**

*सिव्हील इंजिनियरींग,*
*वॉटर अ‍ॅण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस*

**श्री पराग लकडे**
फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

ब्लॉक नं १०, युनिट नं. २
सद्‌गुरु जंगली महाराज सोसायटी
सेनापती बापट रोड,
पुणे ४११ ०१६


## डॉ. वाणी यांचा सन्मान

**महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशन (MSSO) या कॅनडास्थित संस्थेचे संस्थापक डॉ. जगन्नाथ वाणी यांना 'Order of Canada' हा कॅनडामधील सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर झाला आहे. सामाजिक क्षेत्रातील निरलस कामांच्या माध्यमातून देशसेवा करणाऱ्या व्यक्तीला कॅनडा सरकार या पुरस्काराने सन्मानित करते. डॉ. जगन्नाथ वाणी यांनी MSSO च्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून भारतासह कॅनडा आणि जगातील अन्य देशातील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना भरघोस साह्य केले आहे. वर्धिनीशी डॉ. वाणी यांचा गेल्या २५ वर्षांपासून स्नेह असून त्यांच्या माध्यमातून वर्धिनीला आर्थिक साहाय्य तर मिळतेच पण कामाचा प्रचार आणि प्रसार होण्यामध्येही त्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले आहे. 'Order of Canada' या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे याचा वर्धिनीला आनंद आणि अभिमान वाटतो.**

**वर्धिनीच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !**

मानवी देहातील आत्मा हाच एकमात्र उपास्य ईश्वर होय. इतर प्राण्यांची शरीरे देखील देवमंदिरे आहेत.



संस्कृती म्हणजे फक्त बाह्य ऐषआराम नव्हे, तर माणसाला नवी दृष्टी व उच्च जीवनाची गोडी लावून त्याच्यातल्या पाशवी प्रवृत्तीला नष्ट करणे होय. पावित्र्य हा देशाचा प्राण असतो. अपवित्रता ही देश रसातळाला जाण्याची पहिली खूण आहे हे तुम्हाला आजवरच्या इतिहासापासून आढळून आले नाही काय ? जेव्हा त्या अपवित्रतेचा प्रवेश होतो, तेव्हा त्या समाजाचा, जातीचा, वंशाचा शेवट दृष्टीपथात आला असे समजावे.

बल किंवा जोर निर्माण करता येत नाहीत त्याला फक्त दिशा देता येते. त्यामुळे आपल्या हातात असलेल्या शक्तींवर नियंत्रण ठेवायला शिकले पाहिजे व इच्छाशक्तीद्वारे या शक्तींना पाशवी न बनविता अध्यात्मिकतेकडे वळविले पाहिजे. यावरून पावित्र्य, शुद्धता ही सर्व नैतिकतेची व सर्व धर्मांची आधारशीला आहे असे कळते. अशुद्धतेची कल्पनासुद्धा अशुद्ध कृतींइतकीच वाईट असते. शुद्ध मनावर ताबा मिळविणे फार सोपे. मनावर नियंत्रण करायचे असेल तर मनाच्या शुद्धतेवर भर दिलाच पाहिजे. संपूर्ण नैतिकता म्हणजे मनावर पूर्ण नियंत्रण. आधी शुद्ध व्हा म्हणजे तुमच्यात ताकद येईल. शुद्ध मेंदूमध्ये प्रचंड ताकद व अतिप्रचंड इच्छाशक्ती असते. ब्रह्मचर्यामुळे जगावर विस्मयकारक नियंत्रण मिळविता येते. आध्यात्मिक मानवी गुरू हे फार संयमी होते व त्यामुळे शक्तिशाली होते.

**- स्वामी विवेकानंद**

**माझी अशी इच्छा आहे की प्राचीन भारताचे जे विशेष गुण होते त्यात आधुनिक युगाच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांची भर पडावी आणि अशा रीतीने भारताचे पूर्वीचे गुण सहजरीतीने बळकट व्हावे.**

# शाखा वृत्त

## समर्थ रामकृष्ण शाखा :

वर्षभरामध्ये शाखेत पुढील व्याख्याने झाली -

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. गणेश पवार | पक्षी शास्त्र | श्री. रुपेश बालसारा |
| प्रस्तरारोहण | श्री. सचिन गायकवाड | पेपर कसा सोडवावा ? | सौ. दिप्तीताई डोळे |
| गुरुपौर्णिमा | श्रीमती पुष्पाताई नडे | शिवरायांची शौर्यगाथा | कु. सौरभ करडे |
| शरीर तंदुरुस्ती व आहार | कु. निखिल कुंभार | अफ्रिकेतील अनुभव | श्री. किशोर बेलोसे |

वर्षभरात शाखेत पुढील पालकसभा झाल्या-

| विषय | वक्ते | संख्या |
|---|---|---|
| उन्हाळी शिबिर | श्री. विश्वास कुलकर्णी | ३० |
| पाल्याचे संगोपन | श्री. राजेंद्र देवपूरकर | ३५ |
| वर्धक व पालक यांचा शाखेतील सहभाग. | श्रीमती पुष्पाताई नडे | ३५ |

- शाखेची मानसिक विकास बैठक पाताळेश्वर मंदिर, ओंकारेश्वर मंदिर व शनिवारवाडा येथे झाली. शाखेत मनाचे श्लोक घेण्यात येतात.
- **वर्धापनदिन :**
  शाखेचा ३३ वा वर्धापनदिन १३ मे ला वर्धिनीच्या वास्तूत साजरा करण्यात आला. शाखेचे समाजातील महत्त्व व सातत्याने सुरू असलेल्या कामामागील उद्देश शाखेतील युवक श्री. सिद्राम शासम याने आपल्या प्रास्ताविकात मांडला. श्री. मंदार पोफळे यांनी ‘चरैवेति चरैवेति’ हे प्रेरणादायी पद्य घेतले. शाखेचे वार्षिक वृत्त संगणकीय सादरीकरणाद्वारे शाखेचे शाखाप्रमुख श्री. राज जाधव यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. संजय तांबट यांनी शाखेचे महत्त्व याविषयी विविध गोष्टींद्वारा वर्धक व पालकांना मार्गदर्शन केले. यावेळी शाखेतील पालक श्री. जगदीश कश्यप यांनी मनोगत मांडले.
- दिवाळीमध्ये वर्धकांचे ‘फटाक्यांचे दुष्परिणाम’ या विषयावर पथनाट्य बसविण्यात आले. शाखा परिसरात वर्धकांनी पथनाट्याचे सादरीकरण केले व ‘फटाके वाजवू नका’ हा संदेश सर्वांना दिला.
- धनत्रयोदशीच्या दिवशी दीपोत्सवाचा कार्यक्रम झाला. वर्धिनीच्या वास्तूमध्ये दीपप्रज्वलन व दीपपूजन करण्यात आले. वर्धिनीची संपूर्ण वास्तू ५०० पणत्यांनी प्रकाशित करण्यात आली.
- १४ नोव्हेंबरला शाखेची युवक सहल रात्री सिंहगड येथे गेली होती. यात १५ युवक सहभागी झाले होते. सर्व युवक सायकलीवरून रात्री १२ नंतर निघाले व सिंहगड पायथ्याला सकाळी ६ वाजता पोचले.
- नवीन मराठी शाळेत भरविण्यात आलेल्या किल्ले प्रदर्शनाला भेट देण्यात आली. चाकण येथील संग्रामगडचा संपूर्ण इतिहास ‘इतिहासप्रेमी मंडळा’चे अध्यक्ष श्री. मोहन शेटे सर यांनी सांगितला.

**भारताचा आतूनच विकास होऊन नवभारत निर्माण व्हावयास हवा.**

## स्वामी विवेकानंद शाखा :

- **वर्धापनदिन**

  शाखेचा त्रिदशकपूर्ती वर्धापनदिन दि. ४ जुलैला मोठ्या दिमाखात संपन्न झाला. युवक व वर्धकांनी 'संतवाणी' हे भक्तीरसपूर्ण असे अत्यंत प्रभावी नाटक सादर केले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, भक्त पुंडलिक यांच्या जीवनातील प्रसंग-भारुडे, अभंग, ओव्या, श्लोक यांच्या आधारे सादर केले. शेवटच्या प्रत्यक्ष दिंडीने तर सर्वांनाच आषाढी वारीत आहोत असे वाटत होते. या नाट्याचे लेखन, दिग्दर्शन, ध्वनी, प्रकाश इ. सर्व व्यवस्थांचे नियोजन शाखेच्या युवकांनीच केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. हर्षल सोनार याने, तर प्रास्ताविक श्री. प्रकाश चौधरी याने केले. प्रमुख अतिथी वीरचक्र सन्मानित कर्नल सदानंद साळुंखे यांनी आपल्या भाषणात वेळेचे महत्त्व, जिद्द, परिश्रम, मोठ्यांचा मान या गोष्टींचे जीवनातील महत्त्व समजावून सांगितले. प्रमुख मार्गदर्शक श्री. मोहन शेटे सर यांनी पालकांशी संवाद साधताना केवळ शालेय गुणांचा डोंगर रचून करिअर घडवणे यापुरते वर्धिनीचे काम सीमित नाही, तर इथे येणारा प्रत्येक वर्धक हा गुणग्राही, सृजनशील, सर्वांचा मित्र, सर्वांच्या मदतीला धावणारा व अत्यंत जबाबदार नागरिक कसा होईल याकडे वर्धिनीचे लक्ष असते हे विशेषत्वाने सांगितले.
- युवकांनी तासिका व्यवस्थेच्या उत्तम रचनेतून मुलांची सरासरी १५ टक्के गुणवाढ साध्य केली.
- शाखेची संख्या ही नियमितपणे ६० च्या पुढे राखण्यात संपर्क विभागाला यश आले आहे.
- वार्षिक उद्दिष्टानुसार ग्रामीण जीवनाच्या अभ्यासासाठी घोटावडे जवळील शेळकेवाडी येथील भातशेतीला तीन ते चार वेळा भेट देऊन उत्पादन प्रक्रियेचा अभ्यास ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांनी केला.
- वर्धिनीचा प्रकल्प विभाग, फासेपारधी विद्यार्थ्यांचे समरसता गुरुकुल, मातोश्री वृद्धाश्रम व ससूनमधील 'सपोर्ट' या बालसहायता केंद्रास भेट दिली. वरील सर्व भेटींद्वारे संस्थांच्या कार्याचा अभ्यास करून प्रकल्प तयार केले गेले.
- रोजगार निर्मितीसाठी युवकांचे विशेष प्रशिक्षण घेण्यात आले. फॅब्रिकेशन, केटरिंग या उद्योगांसाठी युवकांना सक्रिय बनविले गेले.
- विवेकानंद सार्धशतीनिमित्त शाळा, सार्वजनिक मंडळे इ. ५७ ठिकाणी पथनाट्य सादर केली गेली.
- सौ. ज्योत्स्ना तावडे या अत्यंत आपुलकीने स्वामी विवेकानंद व अभेदानंद शाखेतील ८ वी, ९ वीच्या वर्धकांना शैक्षणिक मार्गदर्शन करतात. त्यांच्या परिश्रमामुळे मुलांच्या अभ्यासात लक्षणीय प्रगती झाली.

## स्वामी अभेदानंद शाखा :

शाखेत वर्षभरात पुढील व्याख्याने झाली.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| शारीरिक तंदुरुस्ती व शिस्त<br>'पुलं' चे व्यक्तिमत्त्व | श्री. अरुण पवार<br>श्री. विक्रांत दिघे | छत्रपती शाहू महाराज<br>आई | श्री. मोहन शेटे<br>श्री. गणेश पवार |

**सामर्थ्याची शिकवण देणे हाच अहिंसा शिकविण्याचा अधिक चांगला मार्ग आहे.**

- ❖ २० फेब्रुवारीला कान्हे फाटा येथील 'आधुनिक ऊर्जा बाग' या वैज्ञानिक उपकरणांच्या प्रदर्शनाला शाखेने भेट दिली.
- ❖ उन्हाळी सुट्टीनिमित्त शाखेत पुढील स्पर्धा झाल्या- शक्ती-बुद्धी, जाहिरात, नाट्यस्पर्धा, आयत्या वेळी दिलेल्या विषयावर कथाकथन, वक्तृत्व इ.
- ❖ ११ मार्चला हनुमान टेकडीवर वर्धकांनी वृक्षारोपण केले व मोठ्या झाडांना आळी करून पाणी घातले.
- ❖ दि. १२ जूनला 'आनंदवारी' या चित्रप्रदर्शनास २५ वर्धक व ९ युवकांनी भेट दिली.
- ❖ शाखेचा १५ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. दि. २८ ऑक्टोबरला सकाळी वर्धापन दिनानिमित्ताने रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी ३२ रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या. सायंकाळी पालक, युवक, वर्धक मेळावा झाला. या मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी वर्धिनीच्या प्रारंभ काळातले विद्यार्थी श्री. चंद्रकांत भोसले उपस्थित होते. आयुष्यात अंधत्वावर मात करून आपण मोठे कसे झालो याचे अनुभव त्यांनी मांडले. कार्यक्रमाला वर्धक, युवक, पालक असे १०० जण उपस्थित होते.

## स्वामी अखंडानंद शाखा :

शाखेत वर्षभरात पुढील व्याख्याने झाली.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| स्वामी विवेकानंद | श्री. शशिकांत मांडके | कथाकथन कसे करावे ? | श्री. मयुर कर्जतकर |
| स्वा. सावरकर | श्री. दीपक कुलकर्णी | ओळख संतांची | श्री. ब्रिजराज नाईक |
| गणितातील गमतीजमती | श्री. जयंत हुल्याळकर | | |

शाखेत वर्षभरात पुढील पालकसभा झाल्या.

| विषय | वक्ते | संख्या |
|---|---|---|
| दहावी परीक्षेचे नियोजन | श्री. ज्ञानेश पुरंदरे व श्रीमती छायाताई देशपांडे | १० |
| आदर्श पालकत्व | श्री. विलास कुलकर्णी | २० |

- ❖ शाखेतील युवक आदित्य शेंडकर हा विश्व हिंदू परिषदेच्या लातूर शिबिरासाठी ध्वजदल प्रशिक्षक म्हणून गेला होता.
- ❖ शाखेत गटश: स्पर्धा झाल्या. स्पर्धेत गटांनी 'भारतीय संस्कृती', 'संतपरंपरा' व 'लष्कर' या विषयांवर पद्य, नाटिका, माहिती सादरीकरण हा कार्यक्रम होता. स्पर्धा परीक्षणासाठी श्री. हेरंब नगरे उपस्थित होते.
- ❖ पाककला ही नावीन्यपूर्ण स्पर्धा घेण्यात आली. तब्बल एका तासात एका गटानी एकूण १४ पदार्थ बनविले.
- ❖ मृत्युंजय अमावस्येनिमित्त किल्ले चित्र प्रदर्शनाला शाखेने भेट दिली.
- ❖ सुट्टीत शिवतांडव स्तोत्र शिकविण्यात आले.
- ❖ ६ ते ९ जून या कालावधीत १० वीत गेलेल्या वर्धकांनी शाखा सांभाळली. यावेळी त्यांनी पद्यमंजूषा,

**या जगातील सर्व वस्तू भयव्याप्त आहेत, केवळ त्यागच भयरहित आहे.**

जाहिरात स्पर्धा, शक्ती-बुद्धी हे कार्यक्रम घेतले.

❖ १ जुलैला शाखेची सहल कोराई गड येथे गेली होती. यावेळी ४० वर्धक व २० युवक सहभागी झाले होते.

❖ **वर्धापनदिन –**

शाखेचा २७ वा वर्धापनदिन रविवार, दि. १४ ऑक्टोबरला कै. सीताराम आबाजी बिबवे या शाळेतील सभागृहात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते श्री. विवेक वेलणकर हे उपस्थित होते. त्यांनी जीवनातील यशस्वीतेचे मूलमंत्र छोट्या छोट्या कथांद्वारे प्रभावीपणे मांडले. कितीही मोठे झालात तरी वर्धिनीशी नाळ जोडलेली राहील याची काळजी घ्यावी असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने वर्धकांचा 'गाथा महापुरुषांची' हा गीतगायनाचा कार्यक्रम बसविला होता. महाराष्ट्रातील महापुरुषांची माहिती व त्यावर रचलेली गीते यावेळी वर्धकांनी सादर केली. कार्यक्रमाला वर्धक, युवक, पालक, शिक्षक असे १०५ जण उपस्थित होते.

❖ यावर्षी गणेशोत्सवात शाखेने 'मला काय त्याचे ?' हे पथनाट्य बसविले होते. समाजामध्ये सामान्य माणसाची कर्तव्ये कोणती यावरील प्रसंग वर्धकांनी बसविले होते. पथनाट्याचे सादरीकरण शाखा परिसरातील विविध सोसायट्यांमध्ये करण्यात आले.

❖ दि. २१ सप्टेंबरला शाखेत रंग भरणे स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत लहान गटात कु. आदित्य आबनावे व कु. अथर्व वर्धे यांना तसेच मोठ्या गटात कु. वैष्णव आबनावे व कु. गौरव गायकवाड हे वर्धक विजेते ठरले. दि. २३ सप्टेंबरला शाखेत ''कौन बनेगा ज्ञानपती'' ही स्पर्धा घेण्यात आली. आठवडाभर आधीच दररोज तीन सामान्यज्ञानाचे प्रश्न फळ्यावर देण्यात येत होते. या प्रश्नांवरच ही स्पर्धा होती.

❖ गुरुनानक जयंती दिवशी शाखेची सहल पुरंदर येथे गेली होती. या सहलीला वर्धक, युवक मिळून ३६ जण गेले होते. यावेळेस श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी 'वीर मुरारबाजी' यांची कथा सांगितली.

❖ शाखेमध्ये 'तपस्या' या कार्यक्रमातील वर्धिनीची माहिती असणारी चित्रफीत दाखवण्यात आली. त्याचप्रमाणे 'चार्ली चॅपलीन' हा चित्रपट दाखवण्यात आला.

❖ 'उत्कर्ष कबड्डी क्लब'च्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त भरलेल्या कबड्डी स्पर्धेमध्ये शाखेतील युवकांचा संघ उतरला होता. त्यांनी उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली.

## स्वामी सुबोधानंद शाखा :

❖ दि. ३ मार्चला शाखेत पालकसभेचे आयोजन करण्यात आले होते. वर्धिनीचे सहकार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी यांनी वार्षिक परीक्षेसंदर्भात पालकांची भूमिका हा विषय मांडला. पालकसभेस २५ पालक उपस्थित होते.

❖ शाखेत वर्धकांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. सुनिल गवारे यांनी कबड्डीची माहिती मुलांना सांगितली.

❖ शाखेमध्ये प्रश्नमंजूषा, पाककला व अभिरूप न्यायालय या स्पर्धा घेण्यात आल्या. आषाढी एकादशीनिमित्ताने

**आपण स्वत:साठी स्वत:च्याच प्रयत्नाने चांगले बनू या.**

शाखेत निवासाला असणाऱ्या वारकऱ्यांना दोन हजार बिस्किटे व दोन हजार लाडू वाटप करण्यात आले.

- दिनांक १६ जूनला मोठा गट व युवक गटाची सहल 'किल्ले सिंहगड' येथे गेली होती. दिनांक ३० जून व ३१ जूनला शाखेची सहल 'किल्ले पुरंदर' येथे गेली होती.
- दिनांक २६ जूनला बंकीमचंद्र चटर्जी यांच्या १७५ व्या जयंतीनिमित्त श्री. मिलिंद सबनीस यांचे व्याख्यान झाले.
- २९ जुलैला शाखेचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला वर्धिनीचे कार्यकर्ते व अष्टपैलू अभिनेते श्री. श्रीकांत यादव प्रमुख वक्ते म्हणून लाभले.

## स्वामी योगानंद शाखा :

- कुसुमाग्रज पुण्यतिथीनिमित्त शाखेत कुसुमाग्रजांच्या 'कणा' व 'म्यानातून उसळे' या पद्यांचे वाचन झाले व त्याचा भावार्थ सांगण्यात आला.
- शाखेत गुढीपाडव्यानिमित्त समरगीत स्पर्धा घेण्यात आली. तीन गटांनी 'म्यानातून उसळे', 'शूर आम्ही सरदार', 'शिवरायांचा पोवाडा' ही गीते सादर केली.
- वार्षिक परीक्षेनिमित्त शाखेत सराव परीक्षा घेण्यात आली. परीक्षा कालावधीत दर रविवारी शाखेत अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले.
- शाखेची सहल ५ मेला किल्ले रायरेश्वर येथे गेली होती. सहलीला २० मुले व ५ युवक उपस्थित होते. किल्ल्यावर गेल्यानंतर वर्धकांनी गटश: ग्रामसंपर्क केला. रात्रकार्यक्रमामध्ये पद्यमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. किल्ला पाहून झाल्यानंतर सर्व वर्धक युवकांनी रायरेश्वर किल्ल्याची स्वच्छता केली व तेथील रायरेश्वर मंदिरात पूजा करून सर्वजण परतले.

## स्वामी ब्रह्मानंद शाखा :

- गुरुपौर्णिमेनिमित्त शाखेत 'गुरु कृतज्ञता' कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून सौ. वैजयंती मुळे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ९ वीतील वर्धक कु. केतन खेडकर याने केले.
- ५ सप्टेंबरला शिक्षकदिनानिमित्ताने शाखेत शिक्षकदिनाचा कार्यक्रम झाला. यावेळी शाखेतील मोठ्या गटातील वर्धकांनी लहान गटातील वर्धकांच्या इयत्तांवर तास घेतले. यावेळी श्री. मयूर कर्जतकर यांचे कथाकथनही झाले. यावर्षी गणेशोत्सवात शाखेने 'दहशतवाद' हे पथनाट्य बसविले होते. एकूण ४ ठिकाणी या पथनाट्याचे सादरीकरण झाले.
- शाखेतील वर्धकांचे संवाद कौशल्य व अभिनय कौशल्य वाढावे यासाठी शाखेत नाट्यप्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. उन्हाळी व हिवाळी सुट्ट्यांमध्ये गटश: नाट्यस्पर्धा घेण्यात आली.
- रक्षाबंधनानिमित्त शाखेजवळील अभिरुची पोलिस स्टेशनमधील सर्व पोलिस बंधूंना राख्या बांधण्यात आल्या. यावेळी पोलिस काकांनी मुलांना खाऊसाठी पैसेही दिले.

**गीता व वेदांतावरील इतर चांगले ग्रंथ वाचा तेवढेच तुम्हाला पुरेसे आहेत.**

❖ दिवाळी सुट्टीमध्ये वर्धकांनी एकूण १००० उटण्यांची पाकिटे विकली. त्याबरोबर शाखेतील वर्धकांनी ८०० आकाशकंदील बनविले. तेही वर्धकांनी परिसरात विकले. यातून मिळालेल्या पैशातून काही वर्धकांनी स्वत:चा शिबिरखर्च भागवला.

## स्वामी श्रद्धानंद शाखा :

❖ दि. ३१ जानेवारीला रथसप्तमीनिमित्ताने शाखेतील सर्व वर्धक, युवक यांनी १२०० सूर्यनमस्कार घातले.

❖ दिनांक १० एप्रिलला शाखेत उन्हाळी शिबिर व रक्तदान शिबिर या विषयावर पालकसभा झाली. संस्थेचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी पालकांना मार्गदर्शन केले. यावेळी २५ पालक उपस्थित होते.

❖ मोठ्या गटातील वर्धकांनी सौ. वासंतीताई कुलकर्णी यांजकडून हातकागदाच्या पिशव्या, चित्रचौकटी आणि दागिने ठेवण्याच्या पेट्या इत्यादी प्रकार शिकून घेतले.

❖ दिनांक १४ जूनला संत ज्ञानेश्वर माऊलींच्या व जगद्‌गुरु तुकारामांच्या पालखीचा मुक्काम पुण्यात होता. शाखा भरते त्या शाळेतही वारकरी निवासाला होते. त्यावेळी शाखेतील सर्व वर्धक, युवकांनी वारकऱ्यांची भेट घेतली. दिंडी प्रमुखांची भेट घेऊन त्यांचा परिचय करून घेतला.

❖ दि. २४ जूनला मानसिक विकास बैठक पर्वतीवर घेण्यात आली. यावेळी पर्वतीवरील पेशवे संग्रहालयाला भेट देण्यात आली. तसेच दि. २९ जूनला पर्वती जलशुद्धीकरण केंद्राला भेट देण्यात आली.

❖ ६ जुलैला शारीरिक स्वास्थ्य या विषयावर श्री. अरुण पवार यांचे व्याख्यान झाले.

❖ शाखेतील नवीन वर्धकांच्या पालकांची पालकसभा झाली. मार्गदर्शन करण्यासाठी वर्धिनीच्या सहकार्यवाह श्रीमती पुष्पाताई नडे आल्या होत्या. यांनी पालकांना वर्धिनीची ओळख व शाखेचे महत्त्व सांगितले.

❖ रक्षाबंधनानिमित्त वर्धकांनी अग्निशामक दलातील कर्मचारी, खडक पोलिस स्टेशनमधील पोलिस अधिकारी यांना राख्या बांधल्या.

❖ शाहीर दादा पासलकर यांच्या 'जुने क्रांतिकारक' या पथनाट्याचे सादरीकरण शाखेत झाले. यावेळी 'चैतन्याची थाफ डफावर' या पोवाड्याचे गायन झाले.

❖ गणेशोत्सवात शाखेतील लहान गटाने 'मला ८ वी पास व्हायचंय' व मोठ्या गटाने 'सांस्कृतिक प्रदूषण' ही पथनाट्ये बसविली. गणेशोत्सवात वर्धकांच्या घरी आरती व अथर्वशीर्षाचे पठण झाले.

❖ भाग दोन मधील स्वामी अखंडानंद शाखेला भेट देण्यात आली. दोन्ही शाखांच्या वर्धकांचा परिचय करून घेण्यात आला. वर्धकांनी तयार केलेले दिवाळी शुभेच्छापत्र एकमेकांना देऊन दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

❖ वर्धकांना Kungfu Panda 2 हा चित्रपट दाखवण्यात आला.

## स्वामी दयानंद सरस्वती शाखा :

❖ दिनांक ४ फेब्रुवारीला ऐश्वर्या गुंदेचा या ताईने शाखेत स्वामी विवेकानंद आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी माहिती सांगितली.

❖ दि. ११ फेब्रुवारीला शाखेत शिक्षक मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमात शिक्षकांचा सविस्तर परिचय

**माझ्या वीर युवकांनो विश्वास असू द्या की तुम्ही सर्वजण महान कार्य करण्यासाठी जन्माला आला आहात.**

करून देण्यात आला. वर्धिनीचा परिचय करून देणारी चित्रफीत यावेळी दाखवण्यात आली. कार्यक्रमास १५ शिक्षक उपस्थित होते.

- ❖ शिवजयंतीला श्री. मयूर कर्जतकर यांचे व्याख्यान झाले. विविध प्रेरणादायी कवितांमधून त्यांनी शिवाजीराजांचे विविध गुण वर्धकांसमोर मांडले.
- ❖ उन्हाळी सुट्टीमध्ये 'दयानंद सिरीज' ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये २२ प्रकारचे मैदानी व बौद्धिक खेळ घेण्यात आले. यामध्ये आदर्श गट, आदर्श वर्धक, सहभाग व विजयी संघांना पारितोषिक देण्यात आले. स्पर्धांचा समारोप व बक्षीस समारंभ श्री. ज्ञानेश पुरंदरे यांच्या हस्ते झाला.
- ❖ २९ जूनला शाखेत श्री. निलेश मांढरे यांची मुलाखत झाली. निलेश सर पी.एस.आय.असून या क्षेत्रात त्यांनी यशप्राप्ती कशी केली या विषयावर त्यांनी वर्धकांशी गप्पा मारल्या.
- ❖ रक्षाबंधनाच्या निमित्ताने सूर्योदय फाऊंडेशन व गुजरवाडी येथील ओंकार न्यास या संस्थांना भेटी दिल्या.
- ❖ मोठ्या गटातील वर्धकांमध्ये 'युद्ध हवे का नको' या विषयावर वादविवाद स्पर्धा झाली.
- ❖ **वर्धापनदिन –**

  शाखेचा दहावा वर्धापनदिन विश्वकर्मा विद्यालयाच्या भव्य सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाला ज्येष्ठ अभिनेते, उत्कृष्ट निवेदक, सूत्रसंचालक श्री. राहूल सोलापूरकर उपस्थित होते. आपल्या मनोगतातून त्यांनी वर्धिनीच्या कामाला शुभेच्छा देऊन सर्व वर्धकांचे, युवकांचे अभिनंदन केले. भविष्यात उत्तम यश मिळविण्यासाठी कष्ट करण्याची सवय असावी हे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. यावेळी शाखेतील शिक्षिका श्रीमती वनमाला जोशी यांचा प्रमुख वक्त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाखेतील वर्धकांनी लाठीकाठी, दांडपट्टा, तलवार या मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके यावेळी सादर केली.

## राजर्षी शाहू शाखा :

- ❖ शाखेत पुढील व्याख्याने झाली –

  खो-खो – श्री. भूषण दीक्षित | आहार – श्री. शिवाजी माने

  सर्प – श्री. चेतन दत्ता | लष्कर – श्री. नकुल थावरे
- ❖ शाखेतील मोठ्या गटातील वर्धकांची सायकल सहल 'किल्ले सिंहगड' येथे गेली होती.
- ❖ 'घरातील वातावरण' या विषयावर वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन यांनी पालकसभा घेतली.
- ❖ इंग्रजी निबंध स्पर्धा झाली. लहान गटाने My Mother या विषयावर तर मोठ्या गटाने My National Hero या विषयावर निबंध लिहिला.
- ❖ शिक्षकदिनानिमित्ताने शिक्षक सप्ताह घेण्यात आला. मोठ्या गटाने लहान गटातील इयत्तांवर तास घेतले.
- ❖ गणेशोत्सवात 'मला काय त्याचे ?' हे पथनाट्य बसविले होते. समाजात दहशतवादाकडे सामान्य माणसं ज्या दृष्टीने पाहतात ते प्रसंग वर्धकांनी बसविले. परिसरातील १० ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण झाले.

**तुमच्यावर वज्रघात झाला तरी भिऊ नका. उठा आणि कार्याला लागा.**

## स्वामी शिवानंद शाखा :

शाखेत वर्षभरात पुढील व्याख्याने झाली.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| प्रेरणादायी कथा | श्री. मयूर कर्जतकर | गुरुपौर्णिमा | श्री. थोरात सर |
| शारीरिक आरोग्यसंपदा | श्री. निखिल कुंभार | ऑलिंपिक्सचा इतिहास | श्री. संदेश शेंडकर |

- ❖ परीक्षा कालावधीत शाखेत इतिहास, भूगोल या विषयांची प्रश्नमंजूषा घेण्यात आली.
- ❖ दि. १३ जूनला शाखेची सहल 'किल्ले तिकोना' येथे गेली होती. दि. १३ जूनला किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गावात मुक्काम करून दुसऱ्या दिवशी किल्ला पाहिल्यानंतर परतीच्या प्रवासात हडशी येथील विठ्ठल मंदिराला भेट देण्यात आली. वर्धिनीचे एक पालक श्री. नामदेव टेमघरे यांनी काशीद या गावात चालवलेल्या ग्रंथालयासही सर्वांनी भेट दिली.
- ❖ उन्हाळी सुट्टीत 'राजीव गांधी प्राणीसंग्रहालय', किल्ले प्रदर्शन, पाचगाव पर्वती व काकासाहेब गाडगीळ उद्यान, तसेच स्वामी अखंडानंद शाखेला भेट देण्यात आली.
- ❖ दहीहंडी उत्सव धडाक्यात साजरा करण्यात आला. कौतुकाची बाब म्हणजे या सर्व कार्यक्रमाचे नियोजन हे शाखेच्या मोठ्या गटातील वर्धकांनी केले होते.
- ❖ 'वर्धिनी परिचय' या विषयावर पालकसभा झाली. पालकसभेला श्री. विश्वास कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी २५ पालक उपस्थित होते.
- ❖ श्री. नंदू फडके यांनी आयोजित केलेल्या 'भातलावणी महोत्सवा'ला शाखेतील सर्व युवक गेले होते.
- ❖ अरण्येश्वर विद्यामंदिर शाळेत 'माजी विद्यार्थी समूहा'च्या वतीने आयोजित स्पर्धांमध्ये शाखेतील वर्धक चैतन्य घेवारे याला गायन स्पर्धेत, तुषार सोनवणे व निरंजन कुचेकर याला तबला वादन स्पर्धेत, वैभव वंजारे याला वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिके मिळाली.
- ❖ गणेशोत्सवात 'आपली संस्कृती' या विषयावर पथनाट्य बसवले. परिसरातील तळजाई, पद्मावती, सहकारनगर, धनकवडी, मंगळवार पेठ येथे त्याचे सादरीकरण केले. पथनाट्यासोबत ३६ वर्धकांचे लाठी-काठी, तलवार, दांडपट्टा, भाला इ. 'मर्दानी खेळा'चे पथक बसविण्यात आले. वरीलप्रमाणे उल्लेखिलेल्या परिसरात मर्दानी खेळाचे सादरीकरण झाले.

## धर्मवीर शंभू राजे शाखा :

❖ **शाखा उद्‌घाटन सोहळा –**

आंबेगाव पठार परिसरातील नवमहाराष्ट्र शाळा व प्रेरणा विद्यालयातील विद्यार्थ्यांची नवीन शाखा धनकवडी भागात सुरू झाली. १० डिसेंबर २०११ ला दत्तजयंती व कै. किशाभाऊ जयंती या शुभमुहूर्तावर शाखेचा उद्‌घाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व वर्धिनीचे कार्यकारिणी

**तुमच्या देशाला वीरांची आवश्यकता आहे; वीर बना. पर्वताप्रमाणे दृढ व्हा ! तुमचा निश्चय कधीही ढळू देऊ नका.**

सदस्य डॉ. प्रदीप आगाशे उपस्थित होते. त्यांनी संस्थेच्या कार्याची ओळख वर्धक व पालकांना करून दिली. कार्यक्रमाला प्रेरणा शाळेच्या संस्थापिका डॉ. अनुराधा पटवर्धन उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून नूतन शाखेला शुभेच्छा दिल्या. यावेळी वर्धक व पालक असे १०० जण उपस्थित होते. कार्यक्रमानंतर श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी पालकांशी प्रश्नोत्तर स्वरूपात संवाद साधला.

शाखेत वर्षभरात पुढील व्याख्याने झाली.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| वक्तृत्व कसे करावे ? | श्री. मोहन शेटे | आपली प्रार्थना आपली प्रेरणा | श्री. शिरीष पटवर्धन |
| कथाकथन | श्री. ज्ञानेश पुरंदरे | आदर्श वर्धकाचे गुण | श्री. राहुल जगताप |
| संघबांधणी | श्री. शशिकांत मांडके | अनुभव कथन | श्री. प्रसाद गाडे |
| कथा यशाच्या | श्री. बन्सीधर देशपांडे | राजर्षी शाहू महाराज | श्री. निलेश धायरकर |
| गुरुपौर्णिमा | श्री. धोंडे सर | लोकमान्य टिळक | श्री. मोहन शेटे |
| ऑलिंपिक | श्री. संदेश शेंडकर | योगेश्वर श्रीकृष्ण | श्री. अशोक कपाटे |
| १८५७ चा उठाव | सौ. वारे मॅडम | हस्तकला (कृतीसत्र) | श्री. अनिरुद्ध गायकवाड |

शाखेत वर्षभरात पुढील पालकसभा झाल्या.

| विषय | वक्ते | संख्या |
|---|---|---|
| सामाजिक कामातील अनुभव | श्रीमती पुष्पाताई नडे | ३५ |
| नवीन परीक्षा पद्धती | श्री. रेवणनाथ पवार | ३५ |
| ८ वी पास करण्याचे सरकारी धोरण | श्रीमती वनमालाताई जोशी | ३५ |
| उन्हाळी व हिवाळी शिबिरे | श्री. ज्ञानेश पुरंदरे | ३५ |
| वर्धिनी एक अनौपचारिक प्रकल्प | श्री. विश्वास कुलकर्णी | ४० |

❖ वर्षभरात शाखेतील वर्धकांच्या सहली किल्ले पुरंदर व किल्ले राजगड येथे गेल्या होत्या.

❖ वर्षभरात आठवीतील वर्धकांच्या ३ स्थळभेटी झाल्या.

१) श्रीकृष्ण महानुभाव मंदिर

२) कुष्ठरोगी रुग्णालय, बोपदेव घाट

३) महादेव मंदिर व अभ्यासिका

❖ स्वामी विवेकानंद सार्धशतीचा पहिला कार्यक्रम ज्ञानेश माध्यमिक विद्यालय, बालाजीनगर येथे घेण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करण्यासाठी ज्येष्ठ लेखक श्री. शशिकांत मांडके हे उपस्थित होते. त्यांनी 'स्वामी विवेकानंद' हा विषय विद्यार्थ्यांसमोर मांडला.

❖ २६ नोव्हेंबरला मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सर्वांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम झाला.

**मला भित्रेपणाची चीड येते. अगदी घोर आपत्तीतदेखील मनाचा समतोल राहू द्या.**

यावेळी 'ए मेरे वतन के लोगो' या गीताचे गायन झाले व या हल्ल्याची माहिती वर्धकांना सांगण्यात आली.

- ❖ दिवाळीमध्ये वर्धकांनी पणत्या रंगवून विकल्या व त्यातून शिबिराचा खर्च वर्धकांनी स्वत:च उभा केला.
- ❖ गणेशोत्सवामध्ये लहान गटाने 'देश आमुचा की माझा' या विषयावर पथनाट्य बसविले होते. शाखा परिसरात ३ ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण झाले. मोठ्या गटातील वर्धकांचा 'गाथा यशाची : आमुच्या इतिहासाची' हा सांस्कृतिक कार्यक्रम बसविला होता. देशभक्तीपर गीत गायनाचा कार्यक्रम व निवेदन याद्वारे हिंदुस्थानाचा इतिहास संक्षिप्त रूपात कार्यक्रमाद्वारे मांडण्यात आला. शाखा परिसरात ८ ठिकाणी शाळांमध्ये, सोयायटींमध्ये याचे सादरीकरण झाले.
- ❖ शाखेतील वर्धकांचे इयत्ताश: निवासी वर्ग घेण्यात आले. वर्षभरात व्यक्तिमत्त्व विकास, आपली शाखा, श्रीकृष्ण जीवन व कला या विषयांवर एकूण ४ निवासी वर्ग झाले. हे निवासी वर्ग प्रेरणा विद्यालय व श्रीकृष्ण महानुभाव मंदिर, आंबेगाव पठार येथे घेण्यात आले.
- ❖ उन्हाळी सुट्टीत वर्धकांना महिषासुरमर्दिनी स्तोत्र व गणेशोत्सवामध्ये अथर्वशीर्ष शिकविण्यात आले.
- ❖ उन्हाळी सुट्टीत व त्यानंतर दर रविवारी तळजाई व वाघजाई येथे वर्धकांची उपासना घेण्यात येई. उपासना झाल्यानंतर वर्धकांना महापुरुषांच्या कथा सांगितल्या जातात.
- ❖ **प्रथम वर्धापनदिन व शाखा नामकरण सोहळा –**

  शाखेचा प्रथम वर्धापनदिन व शाखा नामकरण सोहळा दि. २९ डिसेंबरला झाला. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री. डॉ. आनंद यादव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून श्री. संदीप जोगळे यांनी कार्यक्रमाचा उद्देश मांडला. आपल्या मनोगतातून शाखेतील वर्धक, पालक यांनी आपले विचार यावेळी सर्वांसमोर मांडले. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख वक्त्यांच्या हस्ते शाखेच्या वार्षिक अहवाल पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रमुख वक्ते डॉ. आनंद यादव यांनी आपल्या मार्गदर्शनातून वर्धकांना शालेय जीवनामध्ये काय वाचावे, अभ्यास कसा करावा, मोठी माणसे आयुष्यात यशस्वी कशी होतात याविषयी आपले विचार मांडले. शंभूराजांची प्रतिमा, शंभूराजांवरील पुस्तिका व श्रीफळ प्रमुख वक्त्यांच्या हस्ते शाखाप्रमुखांना देऊन शाखेचा नामकरण विधी संपन्न झाला.

## भगिनी निवेदिता शाखा :

- ❖ १२ जानेवारी विवेकानंद जयंतीनिमित्ताने प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्था आयोजित निबंध स्पर्धेमध्ये इयत्ता ९ वीतील कु. आरती गोरख भेगडे या वर्धिकेचा द्वितीय क्रमांक आला.
- ❖ विज्ञान दिनानिमित्ताने दि. २८ फेब्रुवारीला शाखेत विज्ञान प्रयोग व प्रकल्प स्पर्धा झाली. वर्धिकांनी इयत्ताश: प्रयोग व प्रकल्प सादर केले. स्पर्धांचे परीक्षण ज्ञानप्रबोधिनीचे श्री. नचिकेत नित्सुरे आणि श्री. आदित्य पोंक्षे यांनी केले. लहान गटात इ. ५ वी व मोठ्या गटात इ. ८ वीच्या वर्धिकांना प्रथम पारितोषिक मिळाले.

**आपले पौरुष, पराक्रम प्रकट करा.**

❖ **कार्यशाळा –**
दि. १५ एप्रिल ते ५ मे या कालावधीत इयत्ता ५ वीमध्ये गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थीनींसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये श्रीमती मीनाताई सिदूमूल यांनी वैदिक गणित आणि विज्ञान खेळणी तयार करण्यास शिकविले. श्रीमती अभिलाषाताई प्रभुणे यांनी अगदी सोप्या पद्धतीने इंग्रजी शिकवले. कार्यशाळेत विविध खेळसुद्धा घेण्यात आले. कार्यशाळेची जबाबदारी कु. प्रियांका बारणे व श्रीमती लताताई टिळेकर यांच्याकडे होती. वीस दिवसाच्या कार्यशाळेत एकूण २५ मुला-मुलींचा सहभाग होता.

❖ **वर्धापनदिन –**
१ जून १९८८ ला मुलींची पहिली शाखा 'भगिनी निवेदिता शाखा' सुरू झाली. या वर्षी शाखेने 'रौप्यमहोत्सवी' वर्षात पदार्पण केले. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून श्री. रामभाऊ डिंबळे आले होते. 'वर्धिकांच्या विकासात शाखेचा महत्त्वपूर्ण सहभाग' याविषयी त्यांनी पालकांना व वर्धिकांना मार्गदर्शन केले. वर्धापनदिनी शाखेने 'ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन' (प्राथमिक स्वरूपात) व ५ वी ते ९ वीच्या वर्धिकांसाठी 'कृतीरूप शिक्षण' या संकल्पनेनुसार तासिका घेणार हे दोन संकल्प केले. वर्धापनदिनास वर्धिका, पालक, जुने नवे शिक्षक व युवती असे एकूण ८८ जण उपस्थित होते.

❖ ५ जूनला पर्यावरण दिनानिमित्त शाखेने निसर्गसेवक या संस्थेच्या साहाय्याने प्रदर्शन आयोजित केले. प्रदर्शनात पुण्यातील दुर्मिळ वनस्पती व वृक्ष यांची माहिती देण्यात आली होती. ५० जणांनी प्रदर्शनीचा लाभ घेतला.

❖ स्वातंत्र्यदिनी मुलींना 'लिजंड ऑफ भगतसिंग' हा चित्रपट दाखवला व त्यावर चर्चा केली. इयत्तेप्रमाणे देशभक्तीपर नाटिका सादर करण्यात आल्या.

❖ महाकवी कालिदास दिनानिमित्त शाखेत 'मेघदूत' या महाकाव्याबद्दल माहिती सांगण्यात आली.

❖ शाखेत कु. शिल्पाताई पोफळे हिने 'भाषा शुद्धीकरण' या विषयावर सत्र घेतले.

❖ आषाढी एकादशीला पालखी सोहळा घेण्यात आला. पालखी सिद्धेश्वर मंदिरात नेण्यात आली. पालखीचे पूजन होऊन अभंग स्पर्धा झाली. परीक्षणासाठी ह. भ. प. श्री. राजेंद्रजी पालवे उपस्थित होते. त्यांनी वर्धिकांना 'ग्यानबा-तुकाराम' या शब्दांचा उदय कोठून व कसा झाला हे सांगितले.

❖ 'इंद्रधनुष्य' या पर्यावरण संस्थेतर्फे 'वाघ वाचवा' या विषयावर शनिवारवाडा ते बालगंधर्व असा मोर्चा काढण्यात आला होता. शाखेतील १९ वर्धिका व ६ युवती या मोर्चात सहभागी झाल्या. याच संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या टी-शर्ट पेंटिंग स्पर्धेत शाखेतील युवती कु. तेजश्री शिंदे हिने द्वितीय क्रमांक पटकाविला.

❖ शाखेतील युवती कु. वैदेही बेहेरे हिने कथ्थक या नृत्यप्रकारात प्रथम प्रवेशिका परीक्षेत प्रथम श्रेणी मिळवली.

❖ गणेशोत्सवामध्ये शाखेने पर्यावरण पूरक गणपती मूर्ती तयार करून शाखेतील जुन्या युवतींना विकल्या.

❖ महात्मा गांधी जयंतीनिमित्त म. फुले वस्तुसंग्रहालय, शिवाजीनगर येथे भेट देण्यात आली.

❖ दि.२१ ऑक्टोबरला शाखेत आरोग्य कार्यशाळा अँजलीनताई, श्रद्धाताई, स्मिताताई यांनी घेतली. याआधी

**हे वीर ! तू आपले सर्वशक्तीसंपन्न स्वरूप प्रकट कर म्हणजे समस्त विश्व तुझ्या पायाशी लोळण घेईल.**

त्यांनी दोन दिवस युवतींना सर्व शिकवले. नंतर युवतींनी मुलींना शिकविले. यामध्ये रक्तातील हिमोग्लोबिन कमी झाल्याने ॲनिमिया होऊ शकतो, त्याचा विपरीत परिणाम आरोग्यावर होतो. रक्तातील हिमोग्लोबिन कमी होण्याची कारणे उदा. मलेरिया जंतू यासंबंधी विस्तृत माहिती दिली.

❖ इतिहासप्रेमी मंडळाने आयोजित केलेल्या 'चाकणचा रणसंग्राम' या कार्यक्रमास वर्धिकांनी भेट दिली.

## भवानी पेठ शाखा :

❖ २२ जानेवारीला २१ मुलींची पर्वतीला सहल गेली होती. तेथील संग्रहालयातील नाणी बघून गटांनी नाण्याच्या इतिहासावर वही तयार केली व संपूर्ण माहिती कथन केली.

❖ १७ फेब्रुवारीला श्री. शिरीष पटवर्धन यांनी संघर्ष केलेल्या महिलांचे समाजातील स्थान सांगून मुलींना शिकण्याचे महत्त्व पटवून दिले. सौ.मेघाताईंनी मुलींना 'व्यवहाराच्या सवयी' या विषयावर प्रबोधन केले.

❖ २३ मार्चला नववर्षानिमित्त पदयात्रा काढण्यात आली. स्त्रीभ्रूणहत्या निषेधाच्या तसेच 'मुलींना शिकवा, समाज घडवा' अशा घोषणा देत संपूर्ण कासेवाडी भाग ढवळून काढला. पदयात्रेत २९ वर्धिका सहभागी झाल्या होत्या. शाखेतील कु. पल्लवी दहातोंडेच्या आईने सुंदर पोहे सर्वांना खाऊ घातले.

❖ लोकरीच्या कलाकुसरीतून २५० रु. फायदा झाला. त्यातून मुलींसाठी वह्या आणण्यात आल्या.

❖ शिवराज्याभिषेक दिनी गटश: 'राजमहल सजावट' ही स्पर्धा झाली.

❖ वटपौर्णिमेनिमित्त झाडांचे तसेच वडाचे महत्त्व सांगितले. वडाच्या झाडाला वटवृक्ष का म्हणतात ? याचे महत्त्व काय आहे ? हे सांगून पतिव्रता सावित्रीची गोष्ट सांगितली.

❖ दि. १२ व दि. १३ जूनला शाखेच्या पालक व शिक्षकांनी शाखा भरविली. पालकांनी मुलींना वारकऱ्यांची भेट घालून व पालखीचे महत्त्व समजून सांगितले. यावेळेस शिक्षक व मुली यांनी पारंपारिक गणवेश घातले होते. त्याचप्रमाणे आपल्या शाखेतील परंतु दुसऱ्या शाळेतून येणाऱ्या मुलींनाही सहभागी केले होते. सौ. सुवर्णाताई शेडगे यांनी काढलेल्या जगद्गुरु तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या पालखीचे चित्रीकरण दाखविण्यात आले. शाखेची पालखी तयार करून 'भवानी माता मंदिरा'त नेण्यात आली. रस्त्यात बायका 'विठ्ठल-रखुमाई' झालेल्या मुलींच्या पायावर डोके ठेवून भावूक होत होत्या. तसेच 'पाऊस पडावा' अशी मागणीही करीत होत्या. बरेच पालक सुट्टी घेऊन सहभागी झाले होते. मंदिरात प्रथम भारुड व नंतर कीर्तनाचा कार्यक्रम झाला. प्रेक्षकांच्या मिळालेल्या प्रतिसादामुळे भारुड व कीर्तनाचा कार्यक्रम परत करावा लागला. एकूण ४३ मुली, १९ पालक सहभागी झाले होते.

❖ शाखेचा प्रथम वर्धापनदिन ४ नोव्हेंबरला मोठ्या उत्साहात झाला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण मंडळाचे सदस्य श्री. रघुनाथ गौडा व प्रमुख वक्त्या म्हणून सौ. बागेश्रीताई पोंक्षे उपस्थित होत्या. ताईंनी वर्धिकांना 'वर्धिनीचे कार्य व शाखेचे महत्त्व' समजावून सांगितले.

❖ दिवाळीमध्ये श्रीमती उषाताई माळी यांनी मुलींना पणती रंगवण्याचे प्रशिक्षण दिले. फुग्याचा उपयोग करून कागदाचे सुरेख आकाशकंदील बनवण्यास शिकवले. १२ नोव्हेंबरला शाखेतील वर्धिकांना संभाजी

**आपल्या देशाला आज आवश्यकता आहे साहसाची आणि त्याचबरोबर वैज्ञानिक प्रतिभेची.**

उद्यानातील किल्ले स्पर्धा पाहण्यास नेण्यात आले. तेथे मुलींनी विविध किल्ल्यांची माहिती घेतली व त्यांच्या प्रतिकृती पाहिल्या.

- वर्धिकांनी तयार केलेल्या भेटपत्रांवर आईच्या प्रेमाची व कष्टांची आठवण म्हणून कृतज्ञतापूर्ण संदेश लिहून ते भेटपत्र आपल्या आईला दिले. ह्या कार्यक्रमाचे पालकांकडूनही अतिशय कौतुक झाले.
- 'भाऊबीज' हा सण स्वामी विवेकानंद शाखेतील युवकांबरोबर साजरा करण्यात आला. वर्धिकांनी युवकांचे औक्षण केले व त्यांच्याशी गप्पा मारल्या.
- श्री. जयंत कवठेकर सरांनी वर्धिकांना आदर्श सूर्यनमस्कार कसे घालावेत ते शिकवले. सूर्यनमस्कारामुळे होणारे फायदे व शारीरिक सुदृढता याची माहिती सांगितली.
- गणितातील गमतीजमती या विषयावर डॉ. प्रदीप आगाशे यांचे व्याख्यान झाले. ह्या व्याख्यानातून वर्धिकांच्या अनेक शंका सरांनी दूर केल्या.
- ८ डिसेंबरला शाखेत श्री. उमामहेश्वर आणि त्यांच्या गटाने एक कार्यशाळा घेतली. त्यात वर्धिकांना इंग्रजी कसे बोलावे याचे मार्गदर्शन केले.
- 'सप्तरंग' ह्यांच्यावतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत शाखेतील पल्लवी दहातोंडे व अक्षदा नायदे ह्या वर्धिकांनी बक्षीसे मिळवली. तसेच ५ जणींना प्रशस्तीपत्रके मिळाली.

## नरवीर तानाजी मालुसरे शाखा :

- २६ फेब्रुवारीला भागश: विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाखेतील ५ वीतील वर्धकांना विज्ञान प्रयोग स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले.
- ११ ऑगस्टला 'एकाग्रता' या विषयावर श्री. सचिन गोडसे यांचे व्याख्यान झाले.
- २ ऑगस्ट रक्षाबंधन दिनानिमित्त भगिनी निवेदिता शाखेवर शाखा संपर्क झाला. निवेदिता शाखेच्या वर्धिकांनी सर्व वर्धकांना राख्या बांधल्या.
- जुलै महिन्यात संस्कृत संभाषण वर्ग घेण्यात आला.
- ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी ८ वीतील वर्धकांनी शाखा सांभाळली. यावेळेस त्यांनी लहान गटावर तास घेतले.
- ८ सप्टेंबरला श्री. विश्वास कुलकर्णी यांनी 'घरातील वातावरण' या विषयावर पालकसभा घेतली.
- २९ सप्टेंबरला चांदणी भोजनाचा कार्यक्रम झाला. या रात्री मुलांना 'कुंग फु पांडा' हा चित्रपट दाखविण्यात आला.

## वीर अभिमन्यू बालशाखा :

- २ ऑगस्टला रक्षाबंधनदिनी शाखेतील वर्धक-वर्धिकांनी वर्धिनीच्या वास्तूमध्ये असणाऱ्या सर्व झाडांना राख्या बांधल्या. पर्यावरणाचे रक्षण आपण केले पाहिजे हा संदेश या कार्यक्रमाद्वारे देण्यात आला. यावेळी शाखेचे शाखाप्रमुख श्री. रोहित धायरकर यांनी मुलांना गोष्टी सांगितल्या.
- स्वातंत्र्यदिनाच्या वेळी शाखेत गुणगौरव समारंभ घेण्यात आला. यावेळी १५ वर्धक-वर्धिकांना पारितोषिक

**आज आपल्याला गरज आहे असीम साहसाची, प्रचंड शक्तीची आणि अदम्य उत्साहाची.**

मिळाले.

- २९ ऑगस्टला 'नित्य शाखेचे फायदे' या विषयावर श्रीमती पुष्पाताई नडे यांनी पालकसभा घेतली. या पालकसभेस २० पालक उपस्थित होते.
- गणेशोत्सवामध्ये शाखेचे टिपरी पथक बसविण्यात आले. बालाजीनगर, सोमवार पेठ, मंगळवार पेठ या ठिकाणी पथकाचे सादरीकरण झाले.
- घटस्थापनेमध्ये नवरात्र महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शाखेत गणिताची उदाहरणे सोडवण्यास दिली जात. तसेच नऊ दिवस नऊ देवींची माहिती सांगण्यात आली. दसऱ्याच्या दिवशी शाखेत सर्व साहित्याचे पूजन झाले. यावेळी श्री. निलेश धायरकर यांनी सर्वांना शिवरायांची गोष्ट सांगितली.
- सहामाही परिक्षेच्या कालावधीत 'कोण जास्त वेळ अभ्यास करणार' ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इयत्ता ४ थी मधील कु. सुफिया शेख या वर्धिकेने सलग सहा तास अभ्यास करून शाखेत प्रथम क्रमांक मिळविला.
- ऑगस्ट महिन्यात सर्व मुलांना भगवद्‌गीतेतील १२ वा अध्याय शिकविण्यात येतो. हा अध्याय श्री. सुभाष नडे शिकवितात.

## समर्पण दिन

कै. किशाभाऊ पटवर्धन सरांच्या जन्मतिथीनिमित्त (दत्त जयंती) दरवर्षी समर्पण दिन योजला जातो. यावर्षी त्याच्या जोडीला स्वामीजींच्या सार्धशतीनिमित्त संकल्प दिनाचेही आयोजन केले होते. रविवार दि. २३ डिसेंबरला सुमारे १०० व्यावसायिक युवक-युवती या कार्यक्रमास उपस्थित होते. श्री. यशवंतराव लेले सरांनी सर्वांना मार्गदर्शन करताना व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील 'व्रत' या संकल्पनेचे महत्त्व विशद करून सांगितले.

## युवक सायकल सहल

वर्षाआड युवकांच्या सायकल सहलीचे आयोजन केले जाते. यावर्षी अलिबागला जायचे निश्चित झाले. २७ ते ३० डिसेंबर या चार दिवसात पुणे, पेण, अलिबाग, पाली व उन्हेरे या मार्गे ही मोहीम मार्गस्थ झाले. सुमारे ३२५ किलोमीटरचे अंतर ५१ सायकलस्वारांनी लीलया पार केले. सकाळ-संध्याकाळची कडक थंडी व दुपारचे तळपते ऊन यांची पर्वा न करता एकमेकांचा उत्साह वाढवत या युवा गटाने सायकल सहलीचा आनंद घेतला. सहलीअंतर्गत कुलाबा किल्ला व सरसगड या दोन किल्ल्यांनाही भेटी झाल्या. पालीच्या गणपतीचे मनोभावे झालेले दर्शन व उन्हेरेच्या गरम कुंडातील आंघोळी कधीही विसरता येणार नाहीत. पूर्वीच्या काळातील मावळे हिरीरीने कशा मोहिमा पार पाडत असावेत याची प्रत्यक्ष अनुभूतीच या सायकल सहलीने मिळाली. मार्गातील ग्रामस्थ अत्यंत आस्थेने खाण्यापिण्याची व्यवस्था करून भारतीय आतिथ्याचे दर्शन घडवत होते.

**आत्मसात करणे हे विकासाचे खरे द्योतक आहे. हिंदुधर्माला हे आत्मसात करणे पूर्णपणे साधले आहे.**

# विजयपर्ण





**''यापुढे यशाकडे अखंड झेप घ्यायची !''**

वर्धिनीचे वर्धक, युवक व कार्यकर्ते आपल्या कर्तृत्वाच्या बळावर
विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवत असतात.
स्वत:च्या उन्नतीबरोबर वर्धिनीचेही नाव मोठे करत असतात.
त्यांच्या यशातून प्रेरणा घेऊन अनेकजण नवं काही करण्यासाठी सिद्ध होतात.
वर्षभर अशी उत्तम कामगिरी केलेल्या सर्वांचे वर्धिनी परिवारातर्फे मन:पूर्वक अभिनंदन.
त्यांच्या या यशामध्ये, आनंदामध्ये वर्धिनीही पूर्णपणे सहभागी आहे.

- पुणे जिल्हा कबड्डी संघटना व सरस्वती क्रीडा संस्था आयोजित **जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत भाग १ चा कबड्डी संघ** उतरला होता. या स्पर्धेत **'उत्कृष्ट पकड करणारा संघ'** असे पारितोषिक मिळाले. समर्थ रामकृष्ण शाखेचे युवक **कु. हरिश्चंद्र मिसाळ** यांची जिल्हास्तरीय सामन्यांसाठी निवड झाली.

- शाखेतील युवक **उमेश मठपती** याने राज्यस्तरीय ८० किलो वजनगटात ज्युदो स्पर्धेत ब्राँझपदक पटकावले. ही स्पर्धा अमरावती येथे झाली होती.

- समर्थ रामकृष्ण शाखेचा वर्धक **कु. शुभम संकपाळ** याने दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ ट्रस्ट आयोजित पर्यावरण पूरक मूर्ती बनविण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला तसेच शाखेतील वर्धक **रोनक पवार** याची पुणे जिल्ह्याकडून लंगडी संघासाठी निवड झाली.

- स्वामी शिवानंद शाखेतील युवक **कु. संदेश शेंडकर** यास महाविद्यालयात आयोजित टेक्नोस्टिक स्पर्धेत द्वितीय क्रमांक व मॉडेल मेकिंग स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले.

- स्वामी शिवानंद शाखेतील युवक **कु. सुमित पाटील** यास गरवारे महाविद्यालय आयोजित निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. त्याने **'तरुणाई व राजकारण'** विषयावर निबंध लिहिला होता.

**समोरच्या रस्त्यावर निर्भयपणे उभे राहून 'आमच्यापाशी केवळ ईश्वरच आहे, दुसरे काही नाही' असे जगाला छातीठोकपणे सांगू शकतील अशा वीस स्त्री पुरुषांची आज जगाला गरज आहे.**

- धर्मवीर शंभू राजे शाखेचा वर्धक **कु. प्रतिक चांदगुडे** हा ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेत **गुणवत्ता यादीत ३१ वा** व **शाळेत चौथा** आला. परीक्षा कालावधीमध्ये प्रतिकने रात्रभर जागून शिवचरित्राचेही वाचन केले होते.

- धर्मवीर शंभू राजे शाखेचा वर्धक **कु. आदित्य विचारे** हा चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत १६ वा व शाळेत पहिला आला.

- जागतिक मातृदिनानिमित्त सकाळ सोशल फाऊंडेशनमधील 'सकाळ सांस्कृतिक मंच' यांच्या वतीने ११ आदर्श मातांचा सत्कार दि. १२ मे रोजी भिकारदास मारुती येथील नारद मंदिरात करण्यात आला. यावेळी स्व-रूपवर्धिनीच्या ग्रंथपाल **श्रीमती नीलाताई कुंडलिंगार (अव्वा)** व समर्थ रामकृष्ण शाखेतील पालक **श्रीमती कल्पना खैरे** यांचा सत्कार केला गेला.

- धर्मवीर शंभू राजे शाखेतील वर्धक **कु. सौरभ पायघन** इ. ७ वी यास शाळेतील **आदर्श विद्यार्थी** व **कु. इम्रान बुधाळ** इ. ७ वी यास शाळेतील **अष्टपैलू खेळाडू** हे पारितोषिक मिळाले.

- स्वामी अखंडानंद शाखेतील वर्धक **श्री. गौरव गायकवाड** याने 'रॅपिड चेस टुर्नामेंट स्पर्धेत' १६ वर्षाखालील वयोगटात दुसरे पारितोषिक पटकावले.

- मुक्तांगण विज्ञान शोधिका केंद्र आयोजित निबंध स्पर्धेत वर्धिनीच्या युवती कार्यकर्त्या व रेणुकास्वरूप प्रशालेतील शिक्षिका **श्रीमती लताताई टिळेकर** यांना जैवरसायन शास्त्र विषयावरील निबंधास पारितोषिक प्राप्त झाले.

- कोल्हापूर येथे झालेल्या **पोवाडा गायन स्पर्धेत** धर्मवीर शंभू राजे शाखेचा वर्धक **कु. सौरभ पायघन** याचा **प्रथम क्रमांक** आला.

विविधतेत एकत्व ! होय, हेच सत्य आहे !

❖ स्वामी श्रद्धानंद शाखेचा वर्धक **कु. सिद्धार्थ डोंबाळे** याने पाचगणी येथे झालेल्या International Championship या स्पर्धेत **ब्लॅक बेल्ट** मिळविला.

❖ वर्धिनीचे कार्यकर्ते व एच. व्ही. देसाई कॉलेजचे उपप्राचार्य **डॉ. गणेश राऊत** यांना पुणे विद्यापीठाची पी.एच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी **'भूदान चळवळ-एक चिकित्सक अभ्यास, विशेष संदर्भ-महाराष्ट्र'** हा प्रबंध सादर केला.

❖ स्वामी शिवानंद शाखेचा वर्धक **कु. आकाश सरवदे** याची जिल्हास्तरीय कबड्डी संघामध्ये तसेच **कु. गणेश कांबळे** याची जिल्हास्तरीय धावणे स्पर्धेत निवड झाली. **कु. तुषार सोनवणे** याला शालेय चित्रकला स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला.

❖ वर्धिनीच्या सहायक परिचर्या वर्गातील माजी विद्यार्थीनी **सौ. पल्लवी जावळे** व **कु. कीर्ती उमाटे** यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल इनलॅक्स बुधरानी हॉस्पिटलचे **'स्टार ॲवॉर्ड'** मिळाले.

❖ अक्षरभारती आयोजित प्रश्नमंजूषा स्पर्धेत स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धकांना पारितोषिक मिळाले.

**१. कुमार केतन क्यादर, इ. ९ वी, द्वितीय क्रमांक**
**२. कुमार आकाश काकडे, इ. ९ वी, द्वितीय क्रमांक**
**३. कुमार शंतनू सहाणे, इ. ७ वी, तृतीय क्रमांक**
**४. कुमार करण शिंगडे, इ. ६ वी, तृतीय क्रमांक**

❖ १० जूनला **अहमदनगर येथे** कै. अनाजी खाडे बालाश्रम आयोजित **भजनस्पर्धेत** स्वामी दयानंद सरस्वती शाखेतील वर्धक **कु. वैभव मोरे** (इ. १० वी) याला **'उत्कृष्ट गायक'** व **'उत्कृष्ट तबलावादक'** हे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

**भारताचा खरा इतिहास जेव्हा उजेडात येईल तेव्हा असे सिद्ध होईल की, भारत ज्याप्रमाणे धर्माच्या बाबतीत सबंध जगाचा आद्य गुरू आहे त्याचप्रमाणे कलांच्या बाबतीतही तो उभ्या जगाचा आद्य गुरू आहे.**

- स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धक **कु. सिद्धार्थ डोंबाळे** याची आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा खेळण्यासाठी तो मलेशिया येथे जाणार आहे.

- धर्मवीर शंभू राजे शाखेचा वर्धक कु. प्रसन्न प्रदीप मेनकुदळे, इ. ६ वी याला राज्यस्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धेत **उत्कृष्ट संघनायक** हे सुवर्णपदक मिळाले व कु. अमित विजय कथले, इ. ६ वी याला **उत्तेजनार्थ** पारितोषिक मिळाले.

- वर्धिनीच्या सहाय्यक परिचर्या वर्गातील माजी विद्यार्थिनी श्रीमती वैशाली जाधव, श्रीमती अर्चना लोंढे व श्रीमती वीरश्री माने या ANM या नर्सिंगच्या कोर्समध्ये विशेष प्रावीण्याने उत्तीर्ण झाल्या.


- राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठान व वसंतदादा सेवा संस्था आयोजित कबड्डी स्पर्धेत स्वामी श्रद्धानंद शाखेतील युवक **कु. अक्षय जगताप** याला **'उत्कृष्ट खेळाडू'** हे पारितोषिक मिळाले.

- सामाजिक समरसता मंचातर्फे सामाजिक क्षेत्रातील सेवेबद्दल दिला जाणारा पुरस्कार वर्धिनीच्या सहकार्यवाह **श्रीमती पुष्पाताई नडे** यांना महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वाड्यावर संपन्न झालेल्या कार्यक्रमात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

## पुन्हा एकदा पानिपतावर...

पानिपताच्या इतिहासाला उजाळा देण्यासाठी व पानिपतावर ज्या मराठ्यांचे रक्त सांडले
त्यांना मानवंदना देण्यासाठी पुण्यातील काही इतिहासप्रेमी हे दुचाकीवर
दिनांक ३ जानेवारी रोजी पानिपत येथे गेले होते.
या मोहिमेमध्ये धर्मवीर शंभू राजे शाखेतील वर्धक
**कुमार सौरभ शहाजी पायघन, इयत्ता ७ वी** हा आपल्या वडिलांसोबत गेला होता.
इतक्या बालवयामध्ये त्याच्या कृतीतून प्रकट झालेल्या इतिहासप्रेमाचे सर्वांनी कौतुक केले.
वर्धिनीच्या वतीने ही मोहिम यशस्वी केल्याबद्दल त्याचे अभिनंदन.

**प्रत्यक्ष मृत्यूशी सामना करण्याची हिंमत ठेवा**



''आत्मा प्रथम श्रवण केला पाहिजे. मग त्यावर मनन केले पाहिजे आणि नंतर त्यावर ध्यान केले पाहिजे - त्याचा ध्यास घेतला पाहिजे.'' आजकाल कामाचा खूप उदो उदो करण्याकडे आणि चिंतनमननाची, ध्यानधारणेची हेटाळणी करण्याकडे लोकांचा कल दिसून येतो. 'कर्म करणे' फार चांगले आहे, पण त्याचा उगम होत असतो चिंतनातून, विचारातून. स्नायूंमधून होणाऱ्या शक्तींच्या लहान लहान आविष्कारांनाच कर्म म्हणतात. पण जिथे विचार नसतो तिथून कर्मही निष्पन्न होऊ शकत नाही. म्हणून आपला मेंदू उच्च विचारांनी, सर्वोच्च आदर्शांनी भरून टाका, रात्रंदिवस ते स्वत:समोर बाळगा आणि मग बघाल की त्यातून मोठमोठी कर्मे उद्‌भूत होत आहेत. 'मी अपवित्र' ह्या भावनेला तिलांजली द्या, म्हणा की 'मी पवित्र आहे, शुद्ध आहे'

**- स्वामी विवेकानंद**

बल हेच जीवन होय. दुर्बलता म्हणजे मृत्यू.

# शिबिर वृत्त

## युवक प्रशिक्षण वर्ग

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक ४ व ५ फेब्रुवारी | भाग १, २ | ओंकार न्यास, गुजरवाडी | संख्या ४० |
| दिनांक ११ व १२ फेब्रुवारी | भाग ३, ४ | 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू | संख्या १८ |

**या वर्गात पुढील व्याख्याने झाली.**

१. सूत्रसंचालनाची तयारी - श्री. सुमीत डोळे

२. परीक्षेची पूर्वतयारी - श्री. विलास कुलकर्णी व श्री. विश्वास कुलकर्णी

३. स्वामी विवेकानंद (दृकश्राव्य) - श्री. इंद्रजीत देशमुख

## युवक शिबिर

दि.६ ते १० जून या कालावधीत युवकांचे शिबिर धायरी येथील कै. खंडुजी बंडुजी चव्हाण विद्यालयात झाले.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| वाचन व रसग्रहण | प्रा. डॉ. गणेश राऊत | प्रकल्प प्रशिक्षण | सौ. मुकुलिकाताई थत्ते |
| मुलाखत | श्री. विलास कुलकर्णी | संवाद कौशल्य | श्री. विवेक यत्नाळकर |
| ओळख 'स्व'ची | सौ. अनघाताई अडोणी | शारीरिक तंदुरुस्ती आणि खेळ | कर्नल (नि.) एस. डी. कामत |
| प्रेरणासत्र | श्री. शिरीष पटवर्धन | वर्धिनीचे शैक्षणिक धोरण | श्री. सुनील कुलकर्णी |
| प्रेरणासत्र | प्रा. रामभाऊ डिंबळे | नेतृत्व कौशल्य | कॅ. (नि.) स्मिता गायकवाड |
| 'स्व'चा विकास | श्रीमती इरा सोटी व सौ. संजीवनी महाजन | समारोप सत्र | श्री. विश्वास कुलकर्णी |

१० जूनला शाखाश: सर्व युवकांनी मागील वर्षाच्या अहवालाचे संगणकीय सादरीकरण केले. सर्व शाखाप्रमुखांनी शाखेची वार्षिक उद्दिष्टे सर्वांसमोर मांडली. पुढील वर्षभरात विविध जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या सर्व शाखाप्रमुख, भागप्रमुख, व्यवस्था प्रमुख व शाखा विभाग प्रमुख यांच्या नियुक्त्या घोषित झाल्या.

## इ. १० वी पूर्वपीठिका शिबिर

दिनांक ८ मे ते १० मे या कालावधीत १० वीत गेलेल्या वर्धकांचे पूर्वपीठिका शिबिर वर्धिनीच्या इमारतीत घेण्यात आले. यावेळी शिबिरात पुढील व्याख्याने झाली.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| इतिहास | श्री. विजयचंद्र थत्ते | अभ्यासाचे नियोजन व पद्धती | सौ. उर्मिलाताई गुजर |
| संस्कृत | सौ. दाणी | विज्ञान | श्री. अ. ल. देशमुख |
| भूगोल | श्री. मालुसरे | इंग्रजी | श्री. माळी |
| मराठी | सौ. गांगुर्डे | गणित | सौ. कानिटकर |

**दुर्बलतेमुळेच आपण खोटे बोलतो, चोरी करतो, हत्या करतो व इतर गुन्हे करतो.**

## उन्हाळी शिबिर

### ❖ मोठा गट शिबिर

**कालावधी : दि. २० ते दि. २४ एप्रिल** **स्थळ : राजेंद्र विद्यालय, पारगाव खंडाळा**

**विषय : भारतीय लष्कर व लष्करातील संधी**

**उद्‌घाटन सत्र : श्री. सुरेश खराते (निवृत्त मुख्याध्यापक)** **संख्या : १२५**

| | २१-०४ | २२-०४ | २३-०४ |
|---|---|---|---|
| सत्र १ | भारत पाक युद्धे<br>श्री. शशिकांत मांडके | लष्करातील क्षेपणास्त्रे<br>श्री. काशीनाथ देवधर | लष्करातील अनुभव<br>कर्नल (नि.) सदानंद साळुंके |
| सत्र २ | Documentary on NDA | भारत आणि इतर देशातील लष्कर यांची तुलना<br>श्री. नीलकंठ शिंदे | सैन्य प्रवेशाची पूर्वतयारी<br>श्री. विनायक अभ्यंकर |
| प्रेरणासत्र | शिवरायांची युद्धनीती<br>श्री. मोहन शेटे | भारतीय सीमा<br>श्री. आनंद सराफ | लष्करातील अनुभव व प्रेरणा<br>कॅप्टन (नि.) स्मिता गायकवाड |
| रात्रकार्यक्रम | प्रश्नमंजूषा | कारगीलवरील दृकश्राव्य | |

### ❖ लहान गट शिबिर

**कालावधी : दि. २४ ते २८ एप्रिल** **स्थळ : राजेंद्र विद्यालय, पारगाव खंडाळा**

**विषय : १) सैनिकी जीवन २) वस्तू निर्मिती ३) चलचित्र निर्मिती**

**उद्‌घाटन सत्र : श्री. डी. जी. गाढवे (क्रीडा मार्गदर्शक)** **संख्या : १४०**

| | २५ एप्रिल | २६ एप्रिल | २७ एप्रिल |
|---|---|---|---|
| सत्र १ | कथा सैनिकांच्या<br>श्री. शशिकांत मांडके | रसायनातून वस्तू निर्मिती<br>श्री. गुगळे | चलचित्र निर्मिती<br>श्री. श्रीकांत यादव |
| सत्र २ | ओळख सैन्यदलांची<br>श्री. विनायक अभ्यंकर | गावातील लघुउद्योगांना भेट | चलचित्र निर्मिती प्रशिक्षण |
| कृतीसत्र | सुरक्षा तळ निर्माण | वस्तू निर्मिती | प्रकल्प निर्मिती |
| प्रेरणासत्र | सैनिकी जीवन<br>श्री. आनंद सराफ | कथा उद्योजकांच्या<br>श्री. राहुल जगताप | चलचित्र सादरीकरण<br>श्री. श्रीकांत यादव |
| रात्रकार्यक्रम | चित्रपट<br>LOC KARGIL | गुरुकिल्ली स्पर्धा | Wardhinee Filmfare Award |

**उठा, धीट बना, शक्तीसंपन्न बना. तुम्ही सगळी जबाबदारी स्वत:च्या शिरावर घ्या आणि जाणून असा की तुम्हीच आपल्या भाग्याचे निर्माते आहात.**

## ❖ इ. ७ वी विज्ञान शिबिर

**कालावधी : दि. १८ ते दि. २३ एप्रिल** **स्थळ : 'स्व'-रूपवर्धिनी इमारत**

**विषय : विज्ञानातील गमती जमती** **संख्या : ८०**

| दिनांक/वेळ | सत्र १<br>स. १० ते १२ | कृतीसत्र<br>दु. ३ ते ५ | प्रेरणासत्र<br>सायं. ७.३० ते ८.३० | रात्रकार्यक्रम<br>१० ते ११ |
|---|---|---|---|---|
| १९-०४ | उष्णता ऊर्जा<br>श्री. राजेंद्र देवपूरकर | विज्ञानाची वाडी | प्राचीन वैज्ञानिक ऋषी<br>श्री. ज्ञानेश पुरंदरे | पद्यमंजूषा |
| २०-०४ | पिण्याच्या पाण्याचे विज्ञान<br>डॉ. प्रमोद मोघे | प्रयोग सादरीकरण<br>श्री. प्रणव पुजारी | तारांगण भेट<br>(टिळक रोड शाळा) | विज्ञान प्रश्नमंजूषा |
| २१-०४ | गतिज ऊर्जा<br>श्री. काशिनाथ देवधर | विज्ञानातील गमतीजमती<br>कु. कल्याणी कटारीया | विज्ञानकथा<br>श्री. निरंजन घाटे | अवकाश दर्शन |
| २२-०४ | प्रकाश ऊर्जा<br>श्री. सुनील कुलकर्णी | प्रकाश ऊर्जा<br>श्री. सुनील कुलकर्णी | सर चंद्रशेखर रामन<br>श्री. प्रभाकर कुंटे | रॉकेट सायन्स (माहितीपट)<br>श्री. मयुरेश प्रभुणे |

## ❖ वर्धिका शिबिर

**विषय : प्रतिभा विकसन** **स्थळ : भावे प्राथमिक, सदाशिव पेठ, पुणे**

**कालावधी : दि. २० एप्रिल ते दि. २४ एप्रिल**

| दिनांक/सत्र | २० एप्रिल | २१ एप्रिल | २२ एप्रिल | २३ एप्रिल | २४ एप्रिल |
|---|---|---|---|---|---|
| **प्रबोधन** | - | सौ. सुवर्णाताई शेडगे | कु. निकिता शासम | सौ. हर्षा जैन | कु. त्रिशला शासम |
| **सत्र १** | - | चित्रपट रसग्रहण<br>श्री. ओंकार बर्वे | कविता तयार करणे<br>सौ. संगीता बर्वे | भारुड व वाचन<br>सौ. अद्वेता उमराणीकर | स्वत:चा विकास<br>सौ. सुवर्णाताई शेडगे |
| **कृतीसत्र (सत्र २)** | उद्‌घाटन सत्र -<br>सौ. मृणालिनी जोशी | इकोफ्रेंडली गणेश मूर्ती तयार करणे<br>श्री. अनिरुद्ध जोशी | अभिनय कौशल्य<br>श्री. प्रकाश पारखी | गणेश मूर्ती तयार करणे | समारोप सत्र<br>कल्पनेची कल्पकता<br>श्री.महेंद्र सेठिया |
| **प्रेरणासत्र** | विषय : लता मंगेशकर<br>वक्ते : श्री.अनिल गोडबोले | शाखेतील अनुभव<br>सौ. छायाताई सकटे | निर्णय कसे घ्यावेत?<br>श्री. शिरीष आपटे | अवयवांच्या हालचाली<br>सौ.मेघाताई नगरे | |
| **रात्रकार्यक्रम** | पद्यस्पर्धा | प्रश्नमंजूषा | जहाज बुडते आहे.<br>- स्पर्धा | वेशभूषा स्पर्धा | |

**तुम्हाला हवे असलेले सर्व साहाय्य व सर्व बल तुमच्यातच आहे. म्हणून तुम्हीच स्वत:चे भवितव्य घडवा.**

## सांगोला शिबिर

**शिबिरस्थान : माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला.** **कालावधी : ३० एप्रिल ते २ मे**

**संख्या : ४९ (मुले ४५, युवती ४)** **विषय : कलाकौशल्य**

सांगोल्याला वर्धिनीचे हे प्रथम शिबिर होते. वर्धिनीच्या कामाचा परिचय तेथील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना व्हावा हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. तेथील सौ. संजीवनीताई केळकर, श्री. सुनील बीडकर, श्री. नवनाथ शेळके या शिक्षकांनी मोलाचे साहाय्य केले. शिबिरात मुलांना कलाकौशल्याच्या विविध गोष्टी शिकविण्यात आल्या. शिबिरात पुढील विषय झाले.

| | | |
|---|---|---|
| **३० एप्रिल** | उद्घाटन सत्र | सौ. संजीवनी केळकर |
| सत्र १ | घोटीव कागदाच्या वस्तू बनविणे | कु. निकीता शासम |
| सत्र २ | स्वामी विवेकानंद | कु. प्रियांका बारणे |
| सत्र ३ | विज्ञान खेळणी | कु. प्रियांका बारणे |
| प्रेरणासत्र | देशप्रेम | श्री. सुनील बीडकर |
| **१ मे** – सत्र १ | टिश्यू पेपरची फुले | कु. निकीता शासम<br>कु. प्रियांका बारणे |
| सत्र २ | देवकीनंदन गोपाला चित्रपट | |
| सत्र ३ | संत गाडगेबाबांची ओळख | कु. त्रिशला शासम |
| प्रेरणासत्र | प्रेरणादायी कथा | सौ. संजीवनी केळकर |
| रात्रकार्यक्रम | विविध गुणदर्शन स्पर्धा | |
| **२ मे** – सत्र १ | वर्तमानपत्राच्या पिशव्या | कु. त्रिशला शासम |
| सत्र २ | छ. शिवाजी महाराज | कु. निकीता शासम |
| | समारोप सत्र | स्थानिक नगरसेवक |

## महिला बचत गट शिबिर

दिनांक १९ मे ला 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूमध्ये बचत गटातील महिलांचे शिबिर झाले. या शिबिरात बिबवेवाडी परिसरातील २० महिला सहभागी झाल्या होत्या. शिबिरामध्ये सौ. बागेश्री पोंक्षे, डॉ. विनेश नगरे, श्री. ज्ञानेश पुरंदरे, श्री. रामभाऊ डिंबळे आणि श्री. जुगल राठी (CA) या सर्वांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. श्री. जुगल राठी यांनी माहितीचा अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. यातून पारदर्शक प्रशासन, उत्तरदायित्व या विषयांवर विस्तृतपणे माहिती मिळाली. कोणत्या स्वरूपाच्या माहितीसाठी काय करायचे हे या सत्रातून समजले.

सौ. बागेश्री पोंक्षे यांनी महिलांमधील 'स्व'पण जागे केले. महिला समस्यांशी कशा सामोऱ्या जाऊ शकतात ? घरगुती प्रश्न कसे सोडवावेत ? हे बागेश्रीताईंनी समजावले. त्याचप्रमाणे 'महिला आरोग्य' कसे असावे? कसे सुधारावे ? कशी काळजी घ्यावी ? हे डॉ. विनेश नगरे यांच्या 'आरोग्य' या सत्रातून आम्हाला समजले आणि आता त्याचा दैनंदिन जीवनात आम्हाला फायदा होतो आहे.

भारतीय संस्कृती व त्याचे जतन कसे करावे हे वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी सांगितले. या सत्रात पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण आपण जास्त प्रमाणात करीत आहोत, पण मूळ संस्कृतीचा विसर पडत

**प्रेम, सत्यनिष्ठा व प्रचंड उत्साह यांच्या द्वारेच महान कार्ये होत असतात.**

चालला आहे असे कळाले. तसेच जुन्या व नव्या पिढीची सांगड कशी असावी ? हे श्री. रामभाऊ डिंबळे यांनी उदाहरण देऊन प्रत्येकीच्या मनात रुजवले.

या एका दिवसात आम्ही जे जे शिकलो ते अत्यंत महत्त्वाचे व आमच्या भविष्यात उपकारक ठरेल.

**– शब्दांकन : सौ. संगिता शेंडकर**

## युवती प्रशिक्षण शिबिर -

**कालावधी :** ६ जून ते ९ जून २०१२ **संख्या :** १२

प्रशिक्षण वर्गात झालेली व्याख्याने :-

| विषय | वक्ते |
|---|---|
| क्षमता परिचय व विकसन | श्री. विलास कुलकर्णी.<br>मॅनेजमेंट गेम्सच्या आधारे स्वत:च्या क्षमता कशा ओळखता येतात हे सरांनी सांगितले. |
| निर्णय प्रक्रिया | सौ. माधवीताई पटवर्धन |
| वर्धिनीचे काम : का व कसे ? | श्री. शिरीष पटवर्धन |
| शाखेची कार्यपद्धती | श्री. शिरीष पटवर्धन |
| स्पंदन | चर्चासत्र<br>वर्धिनीचे काम करताना मनात येणाऱ्या विचारांचे प्रकटीकरण युवतींनी केले. |

## शिक्षक प्रशिक्षण वर्ग -

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने २५ व २६ ऑक्टोबरला पुणे जिल्ह्याच्या सर्व तालुक्यातील ७ वी पर्यंतच्या निवडक शिक्षकांचे एक शिबिर घेण्यात आले. एकूण ७५ शिक्षक-शिक्षिका प्रतिनिधी या शिबिराला उपस्थित होते. हे शिबिर दोन गटात होते. १ ली ते ४ थी च्या शिक्षकांचा एक गट होता आणि ५ वी ते ७ वी च्या शिक्षकांचा एक गट होता. ५ वी ते ७ वीच्या गटाच्या शिबिराची जबाबदारी पुणे जिल्हा परिषदेने आपल्या संस्थेवर सोपविली होती. शिबिरात प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनी आपापल्या गावांमध्ये संस्कार वर्ग सुरू करावेत अशी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची अपेक्षा आहे. त्या दृष्टीने संस्कार या सूत्रावर आधारित या शिबिरातील कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. सर्वश्री डॉ. प्रदीप आगाशे, श्री. सुमीत डोळे, श्री. श्यामराव कराळे, श्री. शिरीष आपटे, श्री. सुनील कुलकर्णी, श्री. श्यामराव जोशी आदी वक्त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. शिबिराच्या समारोपात श्री. रामभाऊ डिंबळे यांनी मार्गदर्शन केले. शिबिर संयोजनाची जबाबदारी श्री. शिरीष पटवर्धन व श्री. वेदांग बेहरे यांनी सांभाळली होती.

**फसवणूक करून कोणतेही मोठे काम होत नसते.**

## हिवाळी शिबिर

दिनांक १६ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीत वर्धिनीची एकूण ५ शिबिरे झाली.

**भाग १ :**

● समर्थ रामकृष्ण शाखा ● स्वामी योगानंद शाखा ● स्वामी श्रद्धानंद शाखा ● ग्राम शाखा : विंग गाव

**स्थळ :** रामेश्वर विद्यालय, विंग, सातारा. **संख्या :** २२०

**कालावधी :** दि. २० ते २५ नोव्हेंबर २०१२

**विषय :** ● लहान गट : भूगोलातील संकल्पना ● मोठा गट : भारतीय संस्कृती आणि विज्ञान

| दिनांक | २०-११ | २१-११ | २२-११ | २३-११ | २४-११ |
|---|---|---|---|---|---|
| सत्र १ | | पृथ्वीची अंतर्गत रचना श्री. रोहन शेट्टी | अरण्य जीवन सौ. दीप्ती खरे | अंटार्क्टिका श्री. तुषार शितोळे | जगाची प्राकृतिक ओळख व्हिडिओ क्लिप्स |
| सत्र २ | | नद्या व भौगोलिक परिसर श्री. सतीश नाईक | कालमापन श्री. मालुसरे | सह्याद्रीतील स्फटिके सौ. सुषमा कट्टी | पर्जन्य श्री. राजेश माळी |
| सत्र ३ | | हिंदू घर व प्रतिके श्री. प्रसाद जोशी | संस्कृतीतील विज्ञान परंपरा श्री. माधव केळकर | संस्कृतीतील उज्ज्वल परंपरा श्री. सुमीत डोळे | कार्यशाळा उत्सवांतील व्यवस्थापन श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| सत्र ४ | उद्घाटन श्री. रामभाऊ डिंबळे | संस्कृतीतील हे असेच का ? श्री. मकरंद ढवळे | हिंदू संस्कृती श्री.खर्शीकर गुरुजी | श्रीराम व श्रीकृष्ण श्री. ज्ञानेश पुरंदरे | आचार्य परंपरा श्री.योगेश्वर घोगले |
| प्रेरणासत्र | शाखा पथनाट्य | प्रेरणादायी चरित्रे मधुसूदन घाणेकर | एव्हरेस्ट मोहीम अनुभव कथन श्री. चेतन केतकर | महाराष्ट्राची शाहिरी परंपरा श्री. हेमंत मावळे | समारोप श्री. उदय गुजर श्री. गोयल गुरुजी |
| रात्रकार्यक्रम | प्रश्नमंजूषा | पद्यमंजूषा | भूगोल व्हिडिओ क्लिप्स | कीर्तन श्री.अजय अपामार्जने | |

**उठा आणि कामाला लागा, हे जीवन आणखी किती दिवस टिकणार आहे ?**

**भाग २ :**

- स्वामी अखंडानंद शाखा
- स्वामी दयानंद सरस्वती शाखा
- स्वामी शिवानंद शाखा
- धर्मवीर शंभूराजे शाखा

**स्थळ :** अहिरेश्वर विद्यालय, अहिरे, सातारा. **संख्या :** १५०

**कालावधी :** दिनांक १६ ते २० नोव्हेंबर २०१२

**विषय :**

- लहान गट - पर्यावरण, निसर्ग अभ्यास
- मोठा गट - भविष्यातील तंत्रज्ञानातील संधी

| दिनांक | १६-११ | १७-११ | १८-११ | १९-११ | २०-११ |
|---|---|---|---|---|---|
| सत्र १ | | ऊर्जा<br>श्री. राहुल जगताप | पर्यावरण<br>श्री. राहुल घारे | जागतिक तापमानवाढ<br>श्री. विलास कुलकर्णी | शोध-बोध |
| सत्र २ | | बीबीसीवरील निसर्ग वृत्त | मागील विषयावर गटचर्चा | चांगले पर्यावरण म्हणजे काय ?<br>श्री. हेमंत शिर्के<br>श्री. तेजस हडके | समारोप सत्र<br>श्री. रामभाऊ डिंबळे |
| कृतीसत्र | | किल्ले बांधणीमागील तंत्र | भारताची उज्ज्वल तंत्रपरंपरा<br>श्री.सुमीत डोळे | बहुउपयोगी सायकल | |
| प्रेरणा सत्र | उद्घाटन सत्र<br>श्री. मोरे सर<br>श्री. रासकर सर<br>(अहिरे शाळा) | स्वातंत्र्यवीर सावरकर<br>सौ. नीलिमा गोखले | स्पर्धा तयारी | मणिपूर<br>श्री. ज्ञानेश पुरंदरे<br>अनुभव कथन | |
| रात्र कार्यक्रम | चित्रपट - ओ... माय गॉड | प्रश्नमंजूषा | स्पर्धा तयारी | आकाशवाणी (रेडिओ) स्पर्धा | |

**कोणत्याही कारणाने सत्याशी थोडीदेखील तडजोड करू नका**

**भाग ३ :**

- स्वामी सुबोधानंद शाखा
- स्वामी ब्रह्मानंद शाखा
- राजर्षी शाहू शाखा
- धायरी शाखा

**स्थळ :** अपंग कल्याणकारी संस्था, वानवडी, पुणे **संख्या :** ११०

**कालावधी :** दिनांक १७ ते २२ नोव्हेंबर २०१२

**विषय :**

- अवकाश जगत
- अभिनय कौशल्य
- भाषा विकास
- रंजक विज्ञान

| दिनांक | १७-११ | १८-११ | १९-११ | २०-११ | २१-११ | २२-११ |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रबोधन | | कु. मंदार पोफळे | श्री. दिनेश होले | कु. सागर गायकवाड | कु. प्रतीक जाधव | कु. राहुल पायगुडे |
| सत्र १ | | संस्कृत कु. चिन्मय सुर्वे | सूर्यमाला श्री. विनायक रामदासी | अभिनय कौशल्य श्री. प्रकाश पारखी | विज्ञानाची व्याप्ती श्री. ज्ञानेश पुरंदरे | समारोप सत्र श्री. धनंजय डोबे |
| सत्र २ गटकार्य | | इंग्लिश श्री. सुधाकर मुळे | माहिती संकलन ग्रह घोषणा स्पर्धा | अभिनय कौशल्य श्री. प्रकाश पारखी | पाणी श्री. विलास कुलकर्णी | |
| कृतीसत्र | | पोस्टर स्पर्धा | ग्रह निर्मिती | नाट्यस्पर्धा तयारी | मोठा गट - सायन्स किट कु. प्रतीक जाधव कु. प्रथमेश मातेरे<br>लहान गट - वैज्ञानिक संकल्पना | |
| प्रेरणासत्र | उद्घाटन सत्र श्री. विश्वास कुलकर्णी | मनोरा प्रात्यक्षिक सराव | कल्पना चावला सौ. आरती पाटील (राष्ट्रीय शिष्यवृत्ती व नासा शिष्यवृत्ती) | छत्रपती शिवाजीमहाराजांचे गुण श्री. गजानन केसकर | महादजी शिंदे श्री. मोहन शेटे | |
| रात्रकार्यक्रम | शक्तीबुद्धी स्पर्धा | मनोरा प्रात्यक्षिक | ग्रह सादरीकरण स्पर्धा | नाट्यस्पर्धा | माहितीपट अपंग कल्याणकारी संस्था, वानवडी पद्यस्पर्धा | |

**सत्य हे असत्याहून अनंत पटीने प्रभावशाली आहे. चांगुलपणा हा वाईटपणाहून अनंत पटीने प्रभावशाली आहे.**

**भाग ४ :**

● स्वामी विवेकानंद शाखा ● स्वामी अभेदानंद शाखा

**स्थळ :** राजगड तोरणा वसतीगृह, वेल्हा

**कालावधी :** दिनांक १६ ते १९ नोव्हेंबर २०१२ **संख्या :** ७५

**विषय :** स्वामी विवेकानंद

| दिनांक | प्रबोधन | सत्र १ | कृतीसत्र | प्रेरणासत्र | रात्रकार्यक्रम |
|---|---|---|---|---|---|
| १६-११ | | उद्घाटन सत्र - स्वामी विवेकानंद चरित्र श्री. शशिकांत मांडके | | अनुकरणीय स्वामी विवेकानंद श्री.दिलीप भांगरे | चित्रपट १० वी फ |
| १७-११ | श्री. अमर ठाकूर | स्वामी विवेकानंद यांचे बालपण श्री.रविंद्र जोशी | पथनाट्य कसे करावे ? श्री.प्रकाश पारखी | स्वामी विवेकानंद यांचा परदेश प्रवास श्री. गणेश पवार | रंजन कार्यक्रम |
| १८-११ | श्री. सागर पोफळे | स्वामी विवेकानंदांचे अप्रकट गुण श्री.ज्ञानेश पुरंदरे | पथनाट्य तयारी व सराव | कथा वर्धिनीची श्री. ज्ञानेश पुरंदरे | पथनाट्य सादरीकरण |
| १९-११ | श्री. दत्ता शेडगे | समारोप सत्र - श्री. शिरीष पटवर्धन | | | |

**भाग ५ :**


● भगिनी निवेदिता शाखा ● भवानी पेठ शाखा

**स्थळ :** समरसता गुरुकुल, चिंचवड

**कालावधी :** दिनांक १९ ते २३ नोव्हेंबर २०१२ **विषय :** श्रमानुभव

| | १९-११ | २०-११ | २१-११ | २२-११ | २३-११ |
|---|---|---|---|---|---|
| | उद्घाटन सत्र सौ. सरोज काशीकर | | | | समारोप सत्र श्रमानुभव सौ. अपर्णा कुलकर्णी |
| सत्र १ | | संत गाडगेबाबा श्री. विलास कुलकर्णी | स्वामी विवेकानंद श्री. शशिकांत मांडके | कर्मवीर भाऊराव पाटील सौ. मंजुश्री बोबडे | |
| प्रेरणासत्र | | छ. संभाजी महाराज श्री. संजय चितळे | रामानुजन श्री. जयंत खेडकर | अनुभव कथन श्री. गिरीश प्रभुणे | |

**पर्वतप्राय अडचणी समोर उभ्या राहिल्या तरी त्यांच्यावर मात करण्याची प्रचंड इच्छाशक्ती तुमच्यात आहे काय ?**



"जे शिक्षण लाभल्याने सामान्य जनता जीवन संग्रामाला लायक होऊ शकत नाही, जे शिक्षण चारित्र्यबल, परसेवा, तत्परता व सिंहासारखे साहस निर्माण करू शकत नाही, त्याला काय शिक्षण म्हणायचे ? ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायांवर उभा राहू शकतो, तेच खरे शिक्षण. जे शिक्षण तुम्ही आज शाळा, कॉलेजमधून घेता, त्या शिक्षणामुळे तुमची एका अजीर्ण झालेल्या रोग्याची जातच जणू तयार होत आहे. किल्ली दिलेल्या एखाद्या यंत्रासारखे तुम्ही राबता. 'जन्माला आले आणि मरून गेले' या विधानाचे तुम्ही जणू मूर्तिमंत उदाहरण आहात."

"चारित्र्य घडविणारे, मानसिक बल वाढविणारे, बुद्धी विशाल करणारे आणि स्वावलंबी बनविणारे असे शिक्षण आम्हाला हवे आहे."

**- स्वामी विवेकानंद**

**तलवार उपसून सारे जग तुमच्याविरुद्ध खडे झाले तरी तुम्हाला जे योग्य वाटते, जे सत्य वाटते ते प्रत्यक्ष करून दाखवण्याची धमक तुमच्यात आहे काय ?**

# प्रकल्प विभाग वृत्त

## स्पर्धा परीक्षा केंद्र

वर्षभरात पुढील कार्यक्रम झाले-

| कार्यक्रम | वक्ते | विषय |
|---|---|---|
| विवेकानंद जयंतीनिमित्त 'युवा सप्ताह' विविध उपक्रम व व्याख्यान | मा. श्री. इंद्रजीत देशमुख (अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, वसुंधरा प्रकल्प) | स्वामी विवेकानंद |
| तळजाई ते पर्वती पदभ्रमण व पर्वती येथे गटचर्चा | - | जनलोकपाल बिल |
| स्पर्धा परीक्षा केंद्र व देसाई कॉलेज, संयुक्त व्याख्यानमाला | प्रा. श्री. हरि नरके, श्री. राजा दीक्षित श्री. गणेश राऊत | महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास |
| 'हुतात्मा दिन'निमित्त राजगुरुनगर येथे अभ्यासदौरा | श्री. मोहन शेटे | हुतात्मा राजगुरु |
| शुभेच्छा समारंभ (राज्य लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा) | नायब तहसिलदार डॉ. श्री. शिवाजी जगताप | राज्यसेवा पूर्व परीक्षा |
| गुरुपौर्णिमा | श्री. शिरीष पटवर्धन | गुरुची महत्ता |
| कारगिल विजय दिन | लेफ्ट. जन. श्री. डी. बी. शेकटकर व कर्नल श्री. गौतम खोत | काश्मीर प्रश्न |
| शिष्यवृत्ती योजना वर्ग २०१२-१३ उद्घाटन | श्री. संजय तांबट, श्री. रमेश जोशी व डॉ. श्री. गणेश राऊत | - |
| प्रेरणासत्र | डॉ. श्री. सतीश पाटील | वेळेचे नियोजन आणि अभ्यासतंत्र |
| स्वा. सावरकर पुण्यतिथी | श्री. प्रदीपराव आगाशे | स्वा. सावरकर |
| सौदामिनी अभ्यासिका वर्षपूर्ती सोहळा | डॉ. गणेश राऊत | भूदान चळवळ |

**तुमची सगळी धनदौलत नष्ट झाली, तुमचा सगळा नावलौकिक नाहीसा झाला,**
**तरी सत्याला चिकटून राहण्याची हिंमत तुमच्यामध्ये आहे काय ?**

## सराव चाचणी

दिनांक २० मेला केंद्रातर्फे सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर (पूर्व) परीक्षेसाठी सराव चाचणी घेतली. या सराव चाचणीस १४५ विद्यार्थी उपस्थित होते. तसेच दिनांक ३ जूनला राज्य सेवा (पूर्व) परीक्षेसाठी सराव चाचणी घेतली. या चाचणीसदेखील १६५ विद्यार्थी उपस्थित होते. (वरील दोन्ही परीक्षा ज्ञानप्रबोधिनी येथे घेण्यात आल्या.)

## स्पर्धा परीक्षा शिष्यवृत्ती योजना सन २०१२-१३ : उद्‌घाटन समारंभ

'स्व'-रूपवर्धिनी तर्फे सन २०११-१२ वर्षापासून राज्यसेवा परीक्षेकरीता शिष्यवृत्ती योजना सुरू करून ४० गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१२-१३ करिता दि. २९ जुलैला प्रवेशपरीक्षा घेण्यात आली. महाराष्ट्रातून २५० विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. त्यातून १३० विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन ४० विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजनेकरिता अंतिम निवड करण्यात आली.

या तुकडीचा उद्‌घाटन सोहळा दिनांक १३ सप्टेंबरला 'स्व'-रूपवर्धिनी अभ्यासिकेत घेण्यात आला. उद्‌घाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वर्धिनीचे कार्यकर्ते व एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचे उपप्राचार्य, इतिहासतज्ज्ञ डॉ. गणेश राऊत तर अध्यक्षस्थानी वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे संस्थापक सदस्य प्राध्यापक श्री. संजय तांबट उपस्थित होते. या कार्यक्रमाला वर्धिनीचे कार्याध्यक्ष श्री. रमेश जोशी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. सन २०११-१२ राज्यसेवेमध्ये निवड झालेले श्री. नरेंद्र माने (नायब तहसिलदार) व श्री. उमेश मगदूम (वित्त व लेखा अधिकारी गट ब) यांनी स्पर्धा परीक्षा तयारीबाबत अनमोल असे मार्गदर्शन व अनुभव कथन केले. अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना श्री. संजय तांबट यांनी स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करण्यामागचा उद्देश सांगितला. भाषणात पत्रकारिता व स्पर्धा परीक्षा यातील संबंध स्पष्ट केला. श्री. रमेश जोशी यांनी 'स्वच्छता, शिस्त, सचोटी' ही त्रिसुत्री हे यशाचे रहस्य आहे असे सांगितले. या गुणांच्या आधारावर विकसित भारताची रुपरेषा स्पष्ट केली व एक अधिकारी म्हणून पुढे सक्षम नेतृत्व कसे उभारावे याबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ. गणेश राऊत यांनी त्यांचे 'लोकसत्ता'मधील 'इतिहासात आज दिनांक' सदराचा विद्यार्थ्यांना होणारा उपयोग व परीक्षांची तयारी

With Best Compliments From :

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.**

Plot No. 4, S. No. 17/1-B,
Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune 411 038
Ph : 25431474, 25441124,
25464551
E-mail : adept@vsnl.com

सत्याचे अनुसरण करा - मग ते तुम्हाला कुठेही घेऊन जावो.

करताना आवश्यक गुणांची वाढ घडवून, जोमाने स्पर्धा परीक्षेला सामोरे कसे जावे हे सांगितले. त्यांनी स्वत:च्या आयुष्यातील विविध अनुभवांचा दाखला देऊन इतिहासातील समर्पक उदाहरणे दिली.

❖ ❖ ❖

## अभिनंदन

❖ राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अंतर्गत लोहमार्ग पोलिस व गृहमंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धा परीक्षा शिष्यवृत्ती योजनेतील विद्यार्थी **श्री. धनंजय झोंबाडे** याने या स्पर्धेत 'रस्ता सुरक्षा-काळाची गरज' या विषयावर भाषण करून **प्रथम पुरस्कार** पटकावला. ५ जानेवारीला CKT कॉलेज, पनवेल येथे धनंजय यास **मा. गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील** यांच्या हस्ते पारितोषिक मिळाले.

❖ **राज्यसेवा-२०११** च्या परीक्षेचा निकाल ३० जूनला जाहीर झाला. या परीक्षेत **स्पर्धा परीक्षा केंद्राचे तीन विद्यार्थी** ('वर्ग ब अधिकारी' म्हणून) **यशस्वी** झाले.

**१) श्री. दत्तात्रय सांगोलकर**-असिस्टंट रिजनल ट्रान्सपोर्ट ऑफिसर

**२) श्री. उमेश मगदूम**-ट्रेझरी ऑफिसर

**३) श्री. नरेंद्र माने** - नायब तहसिलदार

❖ **PSI 2012 च्या परीक्षेत** स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिकेतील **१८ विद्यार्थी यशस्वी** झाले.

१) सागर आव्हाड २) दीपक बिरारी ३) समीर चासकर ४) रवींद्र चौधरी ५) सचिन डांगे ६) गणेश गिते ७) गणेश इंगवले ८) सचिन खामगळ ९) सचिन कोकरे १०) वाल्मिक कोरे ११) प्रणित पारधी १२) राजीव राजमाने १३) आनंद गावडे १४) गहिनीनाथ सातव १५) विशाल शहाणे १६) प्रवीण सूर्यवंशी १७) बालाजी तोटेवाड १८) मानसिंग वचकल

**प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी वीरताच आपल्या आत्म्यांना उन्नत बनवील, त्यांचा विकास करील.**

## महिला विभाग

### संक्रांत उत्सव-

दि. ३० जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे महिला विभागाचा संक्रांत उत्सव पार पडला. पाकोळी बालवाडीतील सर्व शिक्षिका, सहायक परिचर्या वर्गातील विद्यार्थिनी यांनी या कार्यक्रमात भाग घेतला. या कार्यक्रमात 'महाराष्ट्राची लोकधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. खेडेगावातील शेतकरी जीवन, समुद्रकिनाऱ्यावरील कोळी जीवन, डोंगर पायथ्याशी असणारे आदिवासी जीवन महिलांनी नृत्य, गायन, नाट्य या माध्यमातून सादर केले. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून ज्ञानप्रबोधिनीच्या डॉ. अनघाताई लवळेकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून स्टरलाईट उद्योग समूहाच्या श्रीमती ज्योती आगरवाल या उपस्थित होत्या. हर्डीकर रुग्णालयाचे डॉ. शरद हर्डीकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

यावेळी अनघाताईंनी आपल्या मार्गदर्शनात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, शारदामाता यांची उदाहरणे दिली आणि आपणही याप्रमाणे वेगळे काही करू शकतो असा विश्वास महिलांच्या मनात निर्माण केला.

### जागतिक महिला दिन-

दि. ३१ मार्चला शारदामणि महिला विभागाच्या वतीने 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात दोन महिलांचा सत्कार केला. ज्यांची आर्थिक परिस्थिती नसताना दत्तक मुलं घेऊन त्यांना उत्तम शिकविले. त्यापैकी एक आहे आपले वाहनचालक श्री. अशोक मुटकुळे यांच्या पत्नी. त्यांनी एका मुलीला दत्तक घेतले. उत्तम संस्कार दिले. उत्तम शाळेत शिक्षण सुरू केले. ती आता अहिल्यादेवी शाळेत ११ वीत आहे. धुणी-भांडी करणाऱ्या श्रीमती खरात बाई यांनी एका मुलाला दत्तक घेऊन उत्तम वाढविले आहे. तो १२ वी पास आहे आणि एका बँकेत नोकरीला आहे. या दोघींनी दाखवून दिले, की सामाजिक काम करण्यासाठी घराबाहेर पडावे लागत नाही. इच्छा असेल तर घरात राहून उत्तम काम करता येते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती रेणुताई गावसकर आल्या होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात ''तुम्ही मालक होऊ नका, पालक व्हा ! मुलांच्या डोळ्यात डोळे घालून बोला. त्यांना जवळ घ्या, प्रेम करा. सतत तुझ्यासाठी मी हे केले, ते केले अशी 'क'ची बाराखडी सारखी ऐकवू नका. पालक करतात ते कर्तव्य असते,'' हा संदेश दिला.

### महिला शाखा :

दि. १७ ऑगस्टला स्वामी दयानंद सरस्वती शाखेवर मासिक महिला शाखा सुरू करण्यात आली. यादिवशी ३५ महिला उपस्थित होत्या. सौ. संध्याताई साबणे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे चरित्र एकपात्री प्रयोगातून महिलांसमोर मांडले.

१४ सप्टेंबरला शाखेत ३० महिला उपस्थित होत्या. शाखेतील महिलांचे फोटो, पत्ते, व्यवसाय याची माहिती असलेली वही तयार करण्यात आली.

१७ ऑक्टोबरला शाखेत २५ महिला उपस्थित होत्या. नवरात्रीनिमित्त सर्वांना श्रीसूक्त शिकवण्यात आले.

**आपण 'अभी:' – निर्भय – झाले पाहिजे, आणि मग आपले काम पूर्ण होऊन जाईल.**

**भोंडला -**

१९ ऑक्टोबरला सर्व महिलांचा महाभोंडला आगरकर शाळेत घेण्यात आला. प्रारंभी श्री विवेकानंद केंद्राच्या श्रीमती सुप्रितमताईंनी स्त्री संघटनेची गरज विवेकानंदाच्या विचारांतून मांडली. स्वामी विवेकानंदांनी स्त्रीमध्ये भगवतीचे रूप पाहिले. त्यामुळेच आपल्या भारतीय संस्कृतीत स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. काळाच्या ओघात यात जरुर बदल झाला आहे. पण सध्या अनेक ठिकाणी स्त्रिया वेगवेगळ्या कामासाठी एकत्र येत आहेत. ही समाजासाठी आवश्यक गोष्ट आहे. संघटनेत एकमेकांवर विश्वास असला पाहिजे. सेवाभाव मनात ठेवून संघटनेचे विचार, नियम पाळून काम केले पाहिजे. म्हणजे संघटन मजबूत होण्यास मदत होते, असे विचार त्यांनी मांडले. भोंडल्यास १५० महिला उपस्थित होत्या. महाभोंडल्याचा हा कार्यक्रम दूरदर्शनवर प्रसारित करण्यात आला. त्यानंतर कोजागिरी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी सर्व महिलांनी भवानी मातेच्या मंदिरात स्त्री सुक्ताचे ११ वेळा पारायण केले. याला १०० महिला उपस्थित होत्या.

**भेट महापौरांची -**

यंदाच्या निवडणुकीमध्ये अनेक महिला नगरसेविका म्हणून निवडून आल्या. या सर्व नगरसेविकांना शुभेच्छापत्र पाठविण्यात आले. त्याचबरोबर शारदामणि महिला विभागाच्या प्रमुखांना घेऊन; शुभेच्छा पत्र व पुष्पगुच्छ घेऊन मा. महापौर सौ. वैशालीताई बनकर यांना देण्यात आले. त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी व भविष्यात महिला सबलीकरणासाठी त्यांच्या हातून जे कार्य घडेल त्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

CHEM-TECH

With Best Compliments From

*M/s. Chemtech Laboratories Pvt. Ltd.*

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex, Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com

प्रत्येक पुरुष, प्रत्येक स्त्री, प्रत्येक जीव म्हणजे ईश्वराचे एकेक रूप आहे हे समजा.

## सहाय्यक परिचारिका वर्ग

**कार्यशाळा -**

आहारशास्त्र विषयासंबंधी रुग्णांना लागणाऱ्या 'पोषक आहार' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. माले येथील कार्यशाळा दि. २४ फेब्रुवारीला झाली. पुणे येथील दोन वर्गांची कार्यशाळा ही दि. २४ फेब्रुवारीला झाली. सौ. मेघाताई नगरे व श्री. शिरीष पटवर्धन यांनी परीक्षण केले. खाद्यपदार्थ कसे तयार केले ? ते कोणत्या रुग्णांना द्यायचे ? का द्यायचे ? वगैरे प्रश्नांची विद्यार्थिनींनी समाधानकारक उत्तरे दिली. श्री. शिरीष पटवर्धन यांनी काही सामान्यज्ञानाच्या गोष्टी विद्यार्थिनींना सांगितल्या. उदा. जेवणाच्या ताटात कुठले पदार्थ कोठे वाढावेत? कुठल्या पदार्थापासून जेवणाची सुरुवात करावी? इ.

**सर्वेऽपि सुखिनः सन्तु । -**

भारतीय योग संस्थानतर्फे दि. १८ जून पासून सहायक परिचर्या वर्गातील विद्यार्थिनींसाठी योगसाधना केंद्र सुरू करण्यात आले.

लोका: समस्ता सुखिनो भवन्तु, सर्वे भवन्तु सुखिन: । हा सिद्धांत भारतीय योग संस्थानच्या प्रेरणेचा मूलाधार आहे. आत्मा हा परमात्म्याचाच अंश आहे आणि त्याची अनुभूती म्हणजेच योग. स्वत:मध्ये स्थित होणे, अंतर्मुख होऊन स्वत:चा (आत्म्याचा) अनुभव घेणे आणि शाश्वत आनंद मिळविणे हा योग आहे. असे निरामय आनंदी जीवन सर्वांना प्राप्त व्हावे यासाठी भारतीय योग संस्थानची स्थापना झाली.

वर्धिनीमध्ये भारतीय योगसंस्थानच्या युवा क्षेत्राच्या प्रमुख व जिल्हाप्रधान श्रीमती सुवर्णा भापकर व श्रीमती अश्विनी पेटकर मार्गदर्शन करतात. या केंद्राचा लाभ ३० विद्यार्थिनी घेत आहेत.

**प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम -**

'सहाय्यक परिचारिका प्रशिक्षण वर्गा'च्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थिनींचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १९ जुलैला वर्धिनीच्या वास्तूत झाला. या वेळेस शिवणकाम प्रशिक्षण वर्गाच्या विद्यार्थिनींनाही प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ससून जनरल हॉस्पिटलच्या डॉ. अंजली पाटील (असोसिएटेड प्रोफेसर ऑफ ॲनाटॉमी) या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून इनलॅक ॲण्ड बुधराणी हॉस्पिटलमधील व्यवस्थापन विभागातील श्रीमती मधू आणि अभिलाषा मॅडम उपस्थित होत्या तर टाटा कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्टचे श्री. दिलीप कवडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविकात श्रीमती पुष्पाताई नडे यांनी परिचारिका प्रशिक्षणासाठी येणाऱ्या मुलींच्या हृदयद्रावक कथा सांगितल्या. स्त्रियांना आपल्या पायावर उभं राहण्यासाठी 'नर्सिंग'सारखा भक्कम आधार व त्यापेक्षाही संस्थेतून मिळणारे संस्कार-शिस्त-आत्मविश्वास, उत्तम शिक्षण याविषयीची मते आपल्या मनोगतातून काही विद्यार्थिनींनी मांडली. एकाच वेळेस प्रपंच-कॉलेज शिक्षण आणि नर्सिंगचे शिक्षण अशी कसरत करणारी नीता हिने स्वरचित कविता गाऊन माझ्या आयुष्याला या वर्गामुळे दिशा मिळाली म्हणून पहिल्या पगारातून ५०० रु. ची देणगी तिने वर्धिनीला दिली. वर्धिनीतून प्रशिक्षित झालेल्या मुली या हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहेत आणि त्या मुलींची कामातील तत्परता, अचूकता आणि कौशल्य यांचे अभिलाषा मॅडम यांनी आपल्या मनोगतातून कौतुक केले.

**तुम्ही कुणाला मदत करू शकत नाही; तुम्ही फक्त सेवा करू शकता.**

पुण्याजवळील माले या दुर्गम ठिकाणी सहाय्यक परिचारिका वर्ग सुरू करण्यात आला. त्यावेळेस या वर्गाची पूर्ण जबाबदारी घेण्यासाठी व तेथे शिक्षिका म्हणून नाशिकचं आपलं सुखी जीवन बाजूला ठेवून सौ. नंदाताई बेंडखळे या माले येथे राहण्यास आल्या. नंदाताईंनी आपल्या शब्दात 'माले कथा' उपस्थितांना ऐकविली. श्री. कवडे यांनी आपल्या मनोगतातून नर्सिंग कोर्सद्वारे आपल्या पायावर उभं राहून, घरालाही आधार देणाऱ्या मुलींचे कौतुक केले. यानंतर यशस्वी विद्यार्थिनींना परीक्षांचे गुणपत्रक व प्रमाणपत्र माननीयांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. विशेष प्राविण्यासह, उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थिनींना बक्षिसे देण्यात आली. पदवीप्रदानानंतर जसे 'दीक्षान्त भाषण' असते, तसे आपल्या अध्यक्षीय भाषणात नर्सिंग व्यवसायात पदार्पण केलेल्या मुलींना 'काम कसे करा' हा कानमंत्र डॉ. अंजली पाटील यांनी दिला. या व्यवसायातच नाही तर समाजातही खूप भले-बुरे, चित्रविचित्र लोक भेटतील; तुम्ही जपून वागा, व्यवसायाचं नाव आणि आपल्या घराचं नाव उज्ज्वल करा हे त्यांनी सांगितले.

**गणेशोत्सव -**

गणेशोत्सवात वर्गातील विद्यार्थिनींचे पथनाट्य बसविण्यात आले. 'पाणी वाचवा' व 'संस्कार' या दोन विषयांवर मुलांनी पथनाट्य सादरीकरण केले. विद्यार्थिनींनी ६ मंडळांसमोर अथर्वशीर्ष पठण केले. भोलेनाथ मित्र मंडळ, केशवनगर, मुंढवा, गोसावीपुरा, सोमवार पेठ, अपोलो मित्रमंडळ, पारगे चौक, साततोटी पोलीस चौकी, रविवार पेठ, उदय मित्र मंडळ या ठिकाणी सादरीकरण झाले.

**भोंडला (माले शाखा) -**

नवरात्रीनंतर माले येथील वर्गातील मुलींचा भोंडला झाला. या निमित्ताने विद्यार्थिनींसाठी व्याख्यान झाले. पुण्याहून वर्धिनीच्या कार्यालय विभागातर्फे सौ. मेघाताई नगरे व श्रीमती स्मिताताई कुलकर्णी उपस्थित होत्या. मेघाताईंनी 'स्वत:मधील स्त्री' व स्मितातार्इंनी 'वाचाल तर वाचाल' या विषयावर मार्गदर्शन केले.

**संस्था भेट -**

सहाय्यक परिचर्या वर्गाच्या शिक्षिका सौ. लत्ता सत्तूर यांनी जामखेड येथील 'एकात्मिक ग्रामीण आरोग्य प्रकल्पा'स भेट दिली. मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. रवी आरोळे व सौ. शोभा आरोळे ह्यांनी राबविलेला हा एक नामवंत प्रकल्प आहे. जामखेडच्या भोवती ३० कि.मी. परिसरात त्यांचे काम चालते. ग्रामीण आरोग्यासाठी काम करणाऱ्या दाईंचे प्रशिक्षण या प्रकल्पात चालते. डॉ. आरोळे यांच्या रुग्णालयात दोन-तीन पिढ्यांपासून काम करणारे कामगार आहेत. ते सर्व निरक्षर आहेत. रोजची कामे पाहून ते सर्व शिकले व आता सफाईदारपणे कामे करतात. गावातील अनेक स्त्रियांना दाई प्रशिक्षण दिले आहे. या दायांनी प्रत्येकी साधारणपणे ७०० ते ७५० बाळंतपण केली आहेत. त्यापैकी फक्त २ ते ५ स्त्रियांना सीझरसाठी दवाखान्यात पाठविले गेले. आई व बाळ यांची काळजी कशी घ्यावी ते त्यांना सहज समजेल अशा भाषेत आणि रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन समजाविले जाते. १७५ गावात त्यांची ही योजना कार्यान्वित आहे. सध्या ४० गावे त्यांच्या संपर्कात आहेत. संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या बालवाडीत ६० विद्यार्थी आहेत. त्यात मूकबधिर विद्यार्थीसुद्धा आहेत. परदेशी युवक युवतीसुद्धा तिथे राहून समाजसेवा करतात.

**सेवेची संधी इतरांना न मिळता तुम्हाला मिळाली याबद्दल स्वत:ला धन्य माना.**

पुणे व माले या वर्गातील विद्यार्थिनींचे शिबिर घेण्यात आले.

**स्थळ :** ‘स्व’-रूपवर्धिनी वास्तू. **कालावधी :** दि. १५ व १६ डिसेंबर २०१२. **संख्या :** ९०

| वेळ | १५ डिसेंबर | १६ डिसेंबर |
|---|---|---|
| ६.०० ते ६.३० |  | उपासना |
| ६.३० ते ७.३० | | प्रबोधन |
| ७.३० ते ८.३० | | सूर्यनमस्कार<br>श्री. कवठेकर सर |
| ९.३० ते १०.३० | | शरीरविज्ञान<br>श्री. सुनील कुलकर्णी |
| ११.०० ते १२.०० | | स्वयंनियोजन<br>श्रीमती पुष्पाताई नडे |
| १२.०० ते १.३० | एकत्रीकरण व गटरचना | भोजन |
| २.०० ते ३.०० | सहवासातून शिक्षण<br>श्री. ज्ञानेश पुरंदरे | अंधश्रद्धा निर्मूलन<br>सौ. शालिनीताई ओक |
| ३.०० ते ४.०० | संस्था भेट व परिचय | भारतीय सणांचे शास्त्रीय महत्त्व<br>श्री. खर्शीकर गुरुजी |
| ४.०० ते ४.३० | सहजीवनाच्या उंबरठ्यावर<br>सौ. विशाखा वेलणकर | गटचर्चा |
| ५.०० ते ६.०० | हृदयाविषयीची माहिती<br>डॉ. गुजर | महिला सुरक्षा<br>सौ. साधनाताई सेठिया |
| ६.०० ते ७.०० | गटचर्चा | विवेकानंद<br>श्री. सुप्रितम गोटखिंडीकर |
| ७.०० ते ७.३० | प्रार्थना | प्रार्थना |
| ७.३० ते ८.०० | भोजन | समारोप<br>श्री. सुप्रितम गोटखिंडीकर |
| ९.०० ते १०.०० | रात्रकार्यक्रम | – |

**सेवा म्हणजे ईश्वराची पूजा होय ही भावना ठेवूनच सेवा करा.**

## पाकोळी बालवाडी

### बाहुलीचे लग्न -

२९ फेब्रुवारीला बाहुला-बाहुलीचे लग्न थाटात पार पडले. लग्नासाठी मृदुलाताईंनी पत्रिका व मंगलाष्टका तयार केली. मुलींनी हिरव्या बांगड्या घातल्या होत्या व हातावर मेहंदी काढली होती. मुले फेटे बांधून तर मुली नऊवारी साडी नेसून आल्या होत्या. या सोहळ्यात पालकही सहभागी झाले होते. लग्नानंतर मुलांसाठी श्रीखंड-पुरीचा बेत केला होता. मुलांनी सहभोजनाचा आनंद लुटला. लग्नसोहळ्यात रुखवत व मांडव अशा आकर्षक गोष्टी होत्या.

### शिक्षिका कार्यशाळा -

दिनांक ३ व ४ मार्चला बालवाडी शिक्षिकांसाठी कार्यशाळा झाली. ही कार्यशाळा सौ. अंजलीताई कार्येकर यांनी घेतली.

कार्यशाळेमध्ये पुढील विषय झाले -

१) भाषा लेखन पूर्वतयारी व मातृभाषा महत्त्व

२) गणित पूर्वतयारी

कार्यशाळेसाठी सर्व शिक्षिका व ४ पालकही सहभागी झाले होते. मुलांच्या मनावर ताण न देता हसत खेळत, मनोरंजनातून, गप्पागोष्टी, श्रवणातून, संभाषणातून कसे शिकवावे हे ताईंनी सांगितले. प्रत्यक्ष साधनांचा वापर करून त्या स्वत: शिक्षिकांसमवेत खेळल्या व साधने कशी बनवावी हे शिकविले.

### परीक्षा -

वर्षभरात होणाऱ्या इतर कार्यक्रमाबरोबरच मार्चमध्ये मोठा गट व मधला गटात परीक्षा घेतली गेली. परिक्षेमध्ये भाषा, गणित, विज्ञान, जीवनव्यवहार या विषयांचे हसत-खेळत, गप्पागोष्टी या माध्यमातून तोंडी व लेखी परीक्षा झाली. परीक्षेनंतर मुलं पहिलीत म्हणजे दुसऱ्या शाळेत जाणार म्हणून शुभेच्छा समारंभ घेण्यात आला. यात पालकांनी व शिक्षिकांनी तसेच बालमित्रांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालकांना अक्षरश: आपले अश्रु अनावर झाले. मुलांकडून शिक्षिकांना गुरुभेट देण्यात आली. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी वर्धिनीला घड्याळ भेट दिले.

-: शिक्षिकांच्या स्वरचित कविता :-

१) ही आवडते मज मनापासूनी सेवा  
लाविते लळा ही जशी दु:खितांच्या जीवा  
मज वाटते की झिजुनी त्यांना द्यावा मेवा  
मग जीवन होईल सफल अशातून देवा

- सौ. मालनताई वाकडे

२) एक आहे घड्याळ ते वाजतं टक-टक-टक  
एक आहे बेल ती वाजते ट्रिंग-ट्रिंग-ट्रिंग  
एक आहे दरवाजा तो वाजतो कर-कर-कर  
एक आहे नळ पाणी पडते टप-टप-टप

- सौ. मनिषाताई वरुडे

### शिक्षिका प्रशिक्षण शिबिर -

१ जूनपासून बालवाडी शिक्षिकांचे शिबिर चालू झाले. पहिल्या दिवशी शाळेच्या वर्षभरातील उपक्रमांचे नियोजन व व्यवस्था वाटप, वर्गवाटप संचालिका श्रीमती पुष्पाताई व शिक्षिका यांच्या विचारविनिमयाने झाले. यावर्षी पाकोळी बालवाडीने २५ व्या वर्षात पदार्पण केले. १५ जुलैला शाळेचा वर्धापनदिन साजरा झाला.

**प्रभूच्या इच्छेने तुम्ही त्याच्या एखाद्या संतानाची सेवा करू शकलात तर तुम्ही स्वत:ला धन्य माना**

दि. ४ जूनला संस्कृत संभाषणवर्गही सुरू करण्यात आला. हा वर्ग सौ. वैशालीताई एकतारे यांनी घेतला. त्यांनी मुलांसाठी छोटी संस्कृत बडबडगीते व स्वत:ची संस्कृतमधून माहिती कशी करून द्यावी हे शिकविले. या वर्गाचा समारोप दि. १६ जूनला झाला. या शिबिरात सौ. नीलाताई गुळवणी यांनी संगीताची उजळणी घेतली.

**प्रकल्प भेट : ममता बाल सदन -**

दि. ४ मेला सर्व शिक्षिकांनी श्रीमती सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन या संस्थेला भेट दिली. असंख्य अनाथ मुलामुलींच्या त्या माई झाल्या. नऊवारी साडी, डोक्यावर पदर अशा सिंधुताईंच्या साध्या राहणीनेच ममता बाल सदनसारख्या मोठ्या सेवाकार्याला जन्म दिला. या भेटीतून बालवाडीच्या शिक्षिकांना तेथील व्यवस्थापनाविषयी व संस्थेची माहिती मिळाली.

**पालखी सोहळा -**

विठ्ठल नामाची शाळा भरली ।
शाळा शिकताना तहानभूक हरली ।।

नवीन शैक्षणिक वर्षाचा बालवाडीचा श्रीगणेशा विठ्ठल नामाच्या गजरात झाला. उपक्रमांची सुरुवात दिंडीच्या सोहळ्यापासून झाली. पालखी सोहळ्यात बालशाखेतील अक्षय व श्रावणी यांनी 'पाणी' या विषयावर कीर्तन केले. 'शेतीसाठी किंवा पिण्यासाठी पाण्याचा कसा साठा करावा ? पाणी कसे वापरावे व कसे अडवावे ?' हे कीर्तनामध्ये मांडले होते. कपडे, भांडी घासताना आईला मुले सांगतात, ''आई, पाणी वाया घालवू नकोस.'' या कीर्तनाचे लेखन श्रीयुत सुभाष नडे यांनी केले होते. 'संथ वाहते कृष्णामाई...' व 'अग्गोबाई ढग्गोबाई' या गीतांचे गायन झाले.

मधला गट, मोठा गट यांचा ३ जुलैला गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा झाला. श्रीमती पुष्पाताईंनी मुलांना गुरुशिष्याची गोष्ट सांगितली. सौ. मालनताईंनी गुरुविषयीची पद्ये घेतली. सौ. मेघाताई नगरे यांनी मुलांना खाऊ दिला.

**श्रावण महिना -**

नागपंचमीला मुलांना दाखविण्यासाठी मातीचे वारुळ तयार केले. आदल्या दिवशी सर्व मुलांच्या हातावर ताईंनी मेहंदी काढली. मातीचे नाग तयार केले व त्यांची दूध लाह्यांचा नैवेद्य दाखवून पूजा केली.

रक्षाबंधनाला मुलांनी एकमेकांना राख्या बांधल्या. दहीहंडीला मोठ्या गटातील मुलांची प्रभात फेरी काढली. कृष्णाची भजने, आरोळ्या दिल्या. नंतर वर्धिनीमध्ये दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला.

**स्वातंत्र्यदिन -**

१५ ऑगस्टला मुले झाशीची राणी, लो. टिळक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अशा अनेक श्रेष्ठ क्रांतिकारकांच्या वेशभूषा करून आली होती.

**माजी विद्यार्थी मेळावा -**

२०१२ हे वर्ष पाकोळी बालवाडी विभागाचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने बालवाडी विभागातर्फे माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षिका यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे सर्व आयोजन शिक्षिका आणि माजी विद्यार्थ्यांनी केले.

सकाळी ११ ते २ या वेळात शाळेच्या सर्व माजी व आजी शिक्षकांचे एकत्रित स्नेहभोजन झाले. आजी-माजी शिक्षकांचे चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात माजी

**दिवसेंदिवस खाली खाली जात असलेल्या या लोकांच्या उद्धाराकरिता आपले संपूर्ण जीवन अर्पण करण्याची तुम्ही प्रतिज्ञा करा.**

शिक्षकांनी संस्कार वर्ग सुरू करण्याची, कार्यरत शिक्षकांना मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. चर्चासत्रानंतर सर्व विद्यार्थी आणि शिक्षिका वर्धिनीच्या गच्चीवर एकत्र जमले आणि सर्वांनी रौप्यमहोत्सवाची सुरुवात २५ रंगीत फुगे आकाशात सोडून केली. अत्यंत उत्साहपूर्वक वातावरणात सर्वजण जिन्यात लावलेले फोटो पाहून आपल्या आठवणी ताज्या करीत सभागृहात आले आणि औपचारिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुण्या रेणुताई दांडेकर यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. रेणुताई आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाल्या, 'मी ज्या ठिकाणी मुलांसाठी काम सुरू केले आहे तिथे मुलांचे अंगावरील कपडे कधी सुकलेले नसतातच. शाळा म्हणजे काय याची माहिती नसलेला हा भाग. दूध तर या मुलांनी कधी पाहिले नव्हते. मा. कै. किशाभाऊंनी दुधाची पावडर आमच्याकडे पाठविली. ते दूध प्रथम मुलं प्यायली. त्या पुढे म्हणाल्या की, ''मुलांनो तुम्हाला सर्व मिळते आहे ते जपून वापरा.''

### गणेशोत्सव -

गणेशोत्सवात वर्गात अथर्वशीर्ष पठण घेतले जाई. मोठ्या गटातील मुलांनी मंगल मित्र मंडळ, नरवडे मंडळ, साई मित्रमंडळ व ओतारी ताई यांच्या घरी अथर्वशीर्ष पठण केले. मंडळातील सभासदांनी मुलांचे खूप कौतुक केले.

### पालकसभा -

प्रत्येक वर्गाची स्वतंत्र पालकसभा झाली. प्रत्येक पालकास बोलते करण्यासाठी हा प्रयत्न होता. दि. ३ ऑक्टोबरला महिला पालक सभा घेतली. पुष्पाताईंनी मासिक महिला शाखेबाबत मार्गदर्शन केले.

### भोंडला -

छोटा गट, मधला गट, मोठा गट यांचा भोंडला आयोजित केला. फेर धरून भोंडल्यांची गाणी राणी ताई, शामला ताई यांनी सांगितली. बालवाडीतील माजी विद्यार्थिनी सिद्धी ही मुलांना गोष्ट सांगण्यास आली होती. तिने गुरु शिष्य (रामदास स्वामी व कल्याणाची) गोष्ट सांगितली.

### संस्कार वर्ग -

वर्धिनीच्या वास्तू परिसरात संस्कार वर्ग सुरू करण्यात आले. संस्कार वर्गाच्या पहिल्या दिवशी वस्तीमध्ये प्रत्येकाच्या घरी जाऊन वर्धिनीचे संस्कार केंद्र आपल्या वस्तीत सुरू झाले आहे हे सांगितले.

प्रथम सर्व मुलांची ओळख करून घेतली. संस्कार वर्ग चालविणाऱ्या सर्व शिक्षिकांचा परिचय मुलांना करून देण्यात आला. आपण 'वर्धिनी'तर्फे वर्ग घेणार आहोत हे ऐकून मुलांना खूप आनंद झाला. मुले म्हणाली, 'ताई, आम्ही बालवाडीत वर्धिनीत येत होतो.' सुरुवातीला वर्गात प्रचंड धूळ व जळमटं होती. तेव्हा मुलांच्या मदतीने संस्कार वर्गाच्या शिक्षिकांनी वर्गाची स्वच्छता केली. चिमुकल्या हातांनी खूप छान काम केले.

गाणी, गोष्टी, खेळ, वर्तमानपत्रवाचन, बोधकथा, अनुभव कथन इ. उपक्रम घेण्यात येतात.

### बालमेळावा -

यावर्षी बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आठ दिवस आधीपासूनच मेळाव्याची तयारी चालू होती. रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्ताने बालमेळावा दोन दिवसाचा होता. २१ व २२ डिसेंबर या दोन

**ज्याचे हृदय गरिबांसाठी कळवळते, ज्याच्या हृदयाला गरिबांसाठी पीळ पडतो त्यालाच मी महात्मा म्हणतो.**

दिवशी मेळावा भरविण्यात आला. मेळाव्यामध्ये प्रत्येक शिक्षिकेला स्वतंत्र विषय दिला होता. त्यामुळे प्रत्येक शिक्षिका आपला वर्ग, विषय, सजावट चांगल्या प्रकारे कशी करता येईल याचा प्रयत्न करीत होती.

बालमेळाव्यात जीवनव्यवहार, दुकान, भाषा, विज्ञान, गणित, कला, पपेट शो इ. विषय होते. प्रत्येक विषयाचे मुलांना हसत-खेळत ज्ञान मिळत होते. त्यामुळे मुलांच्या पालकांना बालवाडीमध्ये कोणते शिक्षण दिले जाते याची माहिती मिळत होती. इतर अन्य ठिकाणी बालमेळाव्याचे फक्त प्रदर्शन भरविले जाते ते फक्त मुलांना पहायला मिळते. पण 'स्व'-रूपवर्धिनी या संस्थेत मुलांना प्रत्येक विषयाचं प्रत्येक साधन स्वत: हाताळायला मिळाले. त्यामुळे मुलांचा आनंद द्विगुणित झाला.

मेळाव्याची मांडणी, शाळेची सजावट पाहून पालकांनीही शाळेचे कौतुक केले. पालकांनी मेळाव्याचे चांगलेच निरीक्षण केले. अक्षरश: पालक फलक लेखन, तक्ते, साधने यांचे फोटो काढत होते. M.S.W. चे विद्यार्थी व होम नर्सिंगच्या विद्यार्थिनींनी शिक्षिकांना मोलाची मदत केली आणि त्यांनीही ह्या मेळाव्याचा भरपूर आनंद घेतला.

❖ ❖ ❖

## प्रौढ साक्षरता वर्ग

मनुष्य कितीही मोठा झाला तरी तो विद्यार्थीच असतो. शिक्षण घेण्याचा अधिकार हा सर्वांनाच आहे. पण परिस्थितीमुळे, कुटुंबातील प्रतिकूलतेमुळे शिक्षण न घेणाऱ्या असंख्य महिला समाजात आहेत. त्यांनाही शिकण्याची आवड असते. यामुळे वर्धिनीमध्ये श्रीमती सुगंधा कबीर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रौढ साक्षरता वर्ग चालविला जातो. या वर्गाला जवळजवळ २० महिला उपस्थित असतात. आज त्यांना उत्तम लिहिता-वाचता येते. यापैकी काही महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन दिवाळीमध्ये वर्धिनीतील कार्यकर्त्यांना व नातेवाईकांना स्वत: पत्र लिहून शुभेच्छा पाठविल्या.

## शैक्षणिक शिष्यवृत्ती

१९९६ पासून डॉ. बाळ जोशी आणि सौ. प्रभा जोशी शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून वर्धिनीमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते आहे. आर्थिक वर्ष २०११-२०१२ आणि २०१२-२०१३ या योजनेच्या माध्यमातून एकूण ४० विद्यार्थ्यांना रु. १,८६,५२५ इतकी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आली आहे. यामध्ये २१ शालेय विद्यार्थी तर १९ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. वाढत्या शैक्षणिक शुल्कांमुळे आज शिक्षण घेणे अत्यंत अवघड होत आहे. परंतु या योजनेमुळे संसस्थेतील अनेक गुणी आणि गरजू विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे. या व्यतिरिक्त या वर्षामध्ये व्यक्तिगत पातळीवर शैक्षणिक साह्यासाठी एकूण रु. १,५६,००० इतकी रक्कम मिळाली असून त्याचा लाभ सुमारे ४४ विद्यार्थ्यांना मिळाला आहे.

**तुमच्या हृदयात प्रेम आहे का – मग तुम्ही सर्वशक्तिमान आहात. तुम्ही पूर्ण निस्वार्थ आहात ना ?– मग तुम्हाला कोणीही पराजित करू शकणार नाही**

## कार्यालय विभाग

### आरोग्यम् धनसंपदा ! -

कार्यालयातील कार्यकर्त्यांचे कामाच्या नियोजना-बरोबर स्वत:च्या वेळेचे, आरोग्याचे नियोजन होणे आवश्यक आहे. म्हणून दि. १ मार्चला कार्यालयातील सर्व कार्यकर्त्यांसाठी डॉ. विनेश नगरे यांचे 'आरोग्य' या विषयावर सत्र झाले.

मन प्रसन्न असेल तर शरीर निरोगी राहते आणि शरीर निरोगी ठेवायचे असेल तर आपल्या पाच इंद्रियांवर नियंत्रण असणे आवश्यक आहे हे डॉ. विनेश यांनी अतिशय सोप्या उदाहरणांनी स्पष्ट केले. आजच्या कमवत्या स्त्रीला घरातील व बाहेरील दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात व या सर्व धावपळीत ती स्वत:साठी वेळ काढू शकत नाही. पण आपण आपले दिवसभराचे वेळापत्रक तयार केले तर स्वत:साठी नक्की वेळ काढू शकतो. त्यामुळे आपण शरीराने व पर्यायाने मनानेही निरोगी राहू शकू. २ ते ५ मिनिटांचे व्यायाम प्रकार त्यांनी सांगितले. साधा आहार, प्रसन्न मन, सकाळचा १ तास स्वत:साठी व्यायाम एवढे केले तर उत्तम शरीरसंपदा लाभते व तुम्ही जास्तीत जास्त तुमच्या वेळेचा चांगला उपयोग करू शकता हे त्यांनी सांगितले.

### वारकरी भेट -

कार्यालय विभागातील कार्यकर्ते व स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थी बाबुराव सणस कन्याशाळा येथे दि. १४ जूनला वारकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी गेले होते. त्यावेळी वारकऱ्यांनी विविध भजने गायली व त्यांचे वारीच्या प्रवासातील अनुभव सांगितले. विठ्ठल भेटीच्या या प्रवासात एकमेकांना सांभाळून घेत 'मुखी नाम आणि पायी गती संगती सर्व काही' असं म्हणत विठ्ठलाला भेटतात. त्यांची ही शिकवण सर्व कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक आहे. आपल्या कामात आपल्या सहकाऱ्यांना सांभाळून घेणे, मुखी नेहमी गोड बोलणे आणि आपल्या कार्याशी एकरूप होऊन इच्छित ध्येय गाठणे हा संदेश या भेटीतून मिळाला.

### चित्रकला स्पर्धा -



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने कार्यालय विभागाने दि. ७ सप्टेंबरला वर्धिनीच्या इमारतीत येणाऱ्या सर्वांसाठी खुल्या चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत ११२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. बरीच वर्षे खडू, रंग, ब्रश यांच्यापासून दूर राहिलेले हात चित्र रेखाटू लागले आणि विविध चित्रकृती साकारत गेल्या. मनातील रंगरेषा कागदावर उमटल्या आणि सर्वांचे चेहेरे निखळ आनंदाच्या रंगात रंगून गेले. चित्रकार सौ. मेघा राऊत यांनी या चित्रांचे परीक्षण केले. स्पर्धेचा बक्षिस वितरण

**मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करून दुसऱ्याच्या हितासाठी एकजुटीने कार्य करण्यास शिका**

समारंभ ११ सप्टेंबरला संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. जयंत कवठेकर उपस्थित होते.

बक्षिसपात्र विद्यार्थी :

श्री. सुहास धास

प्रथम क्रमांक - अभ्यासिका विभाग.

कु. दीपाली कुंभार

द्वितीय क्रमांक - असिस्टंट नर्सिंग कोर्स, पुणे.

सौ. मीरा गायकवाड

तृतीय क्रमांक - MSW Student TMV.

**समुपदेशन -**

वर्धिनीच्या समुपदेशक सौ. मेघाताई नगरे यांनी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या वर्धकांपैकी १५ वर्धकांची कलचाचणी घेऊन त्यांनी कोणती शाखा निवडावी याबद्दल समुपदेशन केले.

त्याचप्रमाणे ताईंचे समर्थ रामकृष्ण शाखेवर 'वेळेचे नियोजन' या विषयावर व्याख्यान झाले. २४ तासांपैकी अभ्यास, शाळा, शाखा, आवडीनिवडी यांना कशा पद्धतीने वेळ देऊ शकतो हे ताईंनी सांगितले.

**गप्पांतून शिक्षण -**

वर्धिनीच्या वास्तूत वॉचमन म्हणून काम करणारा कृष्णा वर्पे हा स्पर्धा परीक्षा केंद्राचा विद्यार्थी. रात्रीच्या वेळी त्याची ड्युटी असते. रात्री ८.३० वाजता समर्थ रामकृष्ण शाखा सुटली की सर्व मुले खाली येतात. या वर्धकांशी गप्पा मारताना कृष्णा रोज वास्तूच्या परिसरातील फलकावर इंग्रजी शब्दार्थ व त्याचे अर्थ लिहितो व ते मुलांना आपल्या वहीत लिहून घेण्यास सांगतो. त्याच्या या नवसंकल्पनेमुळे मुलांच्याही इंग्रजी शब्दार्थांचे पाठांतर होते. आपले काम सांभाळून तो मुलांच्या बरोबर स्वत:चेही ज्ञान वाढवतो आहे.

**माले सहल -**

निसर्गाची ओढ मानवाला कायमच राहिलेली आहे. कोकण, पश्चिम घाट ही अशीच ठिकाणं महाराष्ट्राला लाभलेली देणगी. पुण्याहून कोकणकडे जो रस्ता जातो, त्या रस्त्यावर मुळशी धरणाच्या पायथ्याशी वसलेलं असंच एक गाव... माले. 'स्व'-रूपवर्धिनी या ठिकाणी सहाय्यक परिचारिका वर्ग चालवते.

कार्यालयातील सर्व कार्यकर्त्यांनी सहलीनिमित्ताने माले वर्गाला भेट दिली. पुण्यापासून लांब माले गावी कित्येक वर्षांनी सर्व कार्यकर्त्यांनी चुलीवरील भोजनाचा आनंद घेतला.

वर्गात प्रवेश केल्यानंतर प्रार्थनेने सर्वांचे स्वागत झाले. मेघाताईंनी खेळ घेऊन धम्माल उडवून दिली. अनेक गमतीजमतींसह गडगडाटी हास्यासह सर्वांनी खेळाची मजा लुटली.


'निरामय'
योग चिकित्सा केंद्र

सहवास कॉर्नर बस स्टॉप समोर,
कर्वेनगर, पुणे ४११ ०५२

श्री. केदार पारगावकर
मोबा. ९८८१२ ०२०७०


जोवर श्रद्धा, सचोटी आणि अढळ निष्ठा तुमच्या ठायी आहे तोवर सर्व बाजूंनी तुमची भरभराटच होईल.

**वर्धिनीच्या सहवासामुळे...**

वर्धिनीत काम करणारे मुतालिक काकांचे वय ७० वर्षे आहे.
सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर नुसते बसून राहायचे नाही तर याही वयात काही केले पाहिजे या भावनेतून ते वर्धिनीत कामाला लागले.
वर्धिनीच्या कामानिमित्त सिटी पोस्ट येथे गेले असताना त्यांना रस्त्यावर एक पाकीट सापडले.
त्या पाकिटामध्ये ६००० रु. रोख रक्कम व महत्त्वाची कार्डस् होती.
मुतालिक काकांनी हे पाकीट घेऊन ते कोणाचे आहे याची विचारपूस केली.
त्यावेळी त्या पाकिटात असणाऱ्या एका चिठ्ठीवर त्यांना एक क्रमांक मिळाला.
त्यांनी त्या क्रमांकावर संपर्क साधला. हे पाकीट एका विद्यार्थ्यांचे होते.
दुसऱ्या दिवशी काकांनी ६००० रु. रोख व सर्व कार्डस् त्या विद्यार्थ्याला परत केली.
हे खरोखर वर्धिनीच्या सहवासामुळे झाले असे काका सांगतात.

*With Best Compliments From*

## THE POONA MOTOR GOODS TRANSPORT

**** Fleet-Owners & Transport Contractors***
**** Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa***
**** Full truck load service for Maharashtra & Gujrath State***

❖ ❖ ❖

**Head Office :** 780, Sadashiv Peth, Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ **Branch** ❖

137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.
Phone : 27656925, 27656935


❖

13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi, Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210

❖

Ramraj Yadav Chal, Gala No. 2, 90 Ft. D.P. Road, Sakinaka,
Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072, Phone : 28513018

**अगदी कट्टर शत्रूच्या बाबतीत देखील सभ्य आणि न बोचणारी भाषा वापरा, हितकारक भाषा वापरा.**



संवादातून सुसंवाद साधण्याच्या हातोटीवर बऱ्याच लोकांनी जीवनात यश मिळविले आहे. अनेकांना विषयाचे भरपूर ज्ञान असूनही इतरांवर तेवढासा प्रभाव पाडता येत नाही. उलट जास्त ज्ञान नसूनही काही लोक उत्तम प्रभाव पाडू शकतात. याला कारण म्हणजे संभाषणचातुर्य. आपले विचार जो प्रभावीपणे मांडू शकतो, तोच लोकांची हृदये जिंकू शकतो. आत्मविश्वासपूर्वक केलेले छोटेसे संभाषणसुद्धा प्रभावी होऊ शकते. आपले प्रेमळ, सौम्य व कारुण्यपूर्ण शब्द आपल्या आत्मविश्वासात वाढ करण्यास मदत करतात. इतरांशी संभाषण करताना आपल्या प्रत्येक शब्दातून आपला आत्मविश्वास प्रकट झाला पाहिजे तरच आपण इतरांवर प्रभाव पाडून यश प्राप्त करू शकू. ''काही थोडे लोकच मेंदूची भाषा समजू शकतात, पण हृदयापासून येणारी भाषा मात्र प्रत्येक व्यक्ती समजू शकते.''

**- स्वामी विवेकानंद**

जगाचे हित करणे हेच आपले उद्दिष्ट आहे; आपल्या नावाचा डंका चोहोकडे वाजवा हे आपले उद्दिष्ट नव्हे.

# यशोगाथा
## एक किरण - कर्तृत्वाचा

**शब्दांकन : श्री. गणेश पवार**

**मं**गळवार पेठेत एका छोट्या घरात राहणारं श्री. किरण कुडलिंगार सरांचं कुटुंब. चार बहिणी, आई वडील आणि आजी. या मोठ्या कुटुंबाने आपल्या लहानशा खोलीत चाललेल्या संसाराचे सोने केले. बालपणापासून असलेल्या प्रतिकूलतेवर मात करून, सभोवताली असलेल्या वाईट परिस्थितीचा आपल्या प्रगतीवर परिणाम न होऊ देता त्यांच्या आईंनी आपल्या पाचही अपत्यांना शिकवलं. सरांची आई म्हणजे एक प्रेमळ व्यक्तिमत्त्व. वर्धिनीत सर्वांना आव्वा म्हणून परिचित. वर्धिनीच्या ग्रंथालयाची जबाबदारी आव्वा सांभाळतात. किरणसरांच्या जडणघडणीमध्ये अव्वांचा मोलाचा वाटा आहे. इ. ६ वीपासून नियमित येऊन शाखेत होणारी व्याख्याने, त्यातून मिळणारं ज्ञान, मैदानावर खेळले जाणारे खेळ, त्यातून निर्माण होणारी संघभावना आणि या सर्वांतून मनावर सामाजिक बांधीलकीचे होणारे संस्कार हे भविष्यात मला मार्गदर्शक, दिशादर्शक आणि सरांच्या यशाला साहाय्यभूत ठरले. वर्धिनीत पार पडणारा गुणगौरव समारंभ हा सर्व बुद्धिमान वर्धकांसाठी आनंदाचा क्षण. आपल्याला या कार्यक्रमात बक्षीस मिळावं अशी त्यांची इच्छा होती पण ती कधीच पूर्ण झाली नाही. १० वी पर्यंत त्यांच्या चारही बहिणींना बक्षीस मिळत असे; पण सरांना ते एकदाही मिळालं नाही.

बीएस्सी झाल्यानंतर मिषबुद्दीन खान या आपल्या मित्राबरोबर लष्करात जाण्याचं ध्येय नसतानाही ते लष्कर भरतीची परीक्षा देण्यासाठी मुंबईला गेले. यावेळचा प्रसंग खूप गमतीदार आहे. परीक्षा ९.३० वा. सुरू होणार होती. ५ वाजता ते परीक्षास्थळी पोहोचले. इतका वेळ काय करायचं या प्रश्नाला उत्तर सापडलं आणि सर्वजण मैदानावर क्रिकेट खेळायला उतरले. ५ वा. सुरू केलेला खेळ १० वाजेपर्यंत चालू होता. त्यावेळी अचानक परीक्षेची आठवण आल्यावर सर्वजण परीक्षाकक्षाकडे धावले आणि परीक्षा दिली. उशीरा परीक्षा देऊनही त्यांची निवड झाली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर लेफ्टनंट पदावर कमांडोचे काम त्यांच्याकडे आले. एअर फोर्सला स्पेशल कमांडो म्हणून नियुक्ती झाल्यानंतर विमानातून अपेक्षित ठिकाणी मदत पोहोचवणे, विमानातून उड्या मारणे अशी जिगरबाज कामे त्यांनी केली. यावेळी २ बुलेट त्यांच्या गुडघ्याला लागल्या. ६ महिने हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. पण ही बातमी एक वर्ष घरी कळू दिली नाही. ५ वर्षे लष्करात सेवा दिल्यानंतर आज ते BMC सॉफ्टवेअर कंपनीत Asia Pacific चे काम पाहतात. त्यामध्ये दिल्ली, बंगलोर, बीजींग, मुंबई, चेन्नईच्या कामाची जबाबदारी असल्याने या शहरात त्यांचा प्रवास चालू असतो. वर्धिनीच्या संस्कारामुळे आज ते उत्तम स्थिरस्थावर आहेत. ''मी वर्धिनीत आलो नसतो तर चौकात इतर मुलांसोबत उभा दिसलो असतो'', असं ते सांगतात. १० रुपयांचं दप्तर घेण्याची त्यावेळी ऐपत नसताना सरांचं शिक्षण पूर्ण झालं. कारण वर्धिनीने अनेक मदतीचे हात सरांना मिळवून दिले. किशाभाऊंच्या उतारवयात किशाभाऊंचा जास्त संपर्क त्यांना लाभला. मोठी व्यक्तिमत्त्व ही छोट्या छोट्या व्यक्तिमत्त्वांना आपल्या परीसस्पर्शाने घडवतात याचं उत्तम उदाहरण म्हणजे किशाभाऊंच्या संपर्कात वाढलेले किरण कुडलिंगार.

प्रत्येकाने आपल्या आयुष्याची किमान पाच वर्षे लष्करात गेलं पाहिजे अशी त्यांची इच्छा आहे.

**केवळ स्वत:चा उत्कर्ष व्हावा या भावनेचा, कलह प्रियतेचा आणि**
**परस्पराविषयीच्या मत्सराचा तुम्ही नेहमीसाठी त्याग करावा याचीच मी तुम्हा सर्वांपासून अपेक्षा करतो.**

सामाजिक कामातून ही भावना जास्त प्रमाणात निर्माण होते, वाढते आणि प्रत्यक्षात येते. वर्धिनीचं काम हे सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार करणारे आहे. या संस्कारातून भारतासाठी लष्करात काम करणारे असंख्य किरण कुडलिंगार तयार व्हावेत.

## दीर्घोद्योगी उमेश जोशी

**आ**युष्यातील मोठमोठे निर्णय घेण्यासाठी एक छोटीशी घटनाही कारणीभूत ठरते. अशी घटना प्रत्येकाच्याच आयुष्यात घडत असते. पण ती ओळखून त्या दिशेने पाऊल उचलणारे फार कमी असतात. उमेश जोशी हेही असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. लहानपणी घरातील मशीन उघडणे व ती पुन्हा जशीच्या तशी लावणे यात उमेश सरांना अत्यानंद होत असे. तांत्रिक विषयाची आवड ही लहानपणापासून होती. पण १० वी झाल्यानंतर तांत्रिक विषयांच्या शिक्षणात इच्छा असूनही प्रवेश घेता आला नाही. वडील पौरोहित्य करायचे. वडिलांच्या पौरोहित्यावर घराचा उदरनिर्वाह चालायचा. सोमवार पेठेत एका लहानशा खोलीत त्यांचं कुटुंब राहायचं. श्रीकांत ढोले या वर्गमित्रामुळे वर्धिनीचा व उमेशजींचा परिचय आला. युवक गटात आल्यानंतर हा परिचय खूपच वाढला.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना उमेशजींनी वर्धिनीतील विविध जबाबदाऱ्या उत्तमपणे सांभाळल्या. या कालावधीमध्ये सरांनी वर्धिनीचे २ वर्षे पूर्ण वेळ काम केले. बिबवेवाडी भागात स्वामी अखंडानंद शाखा सुरू करण्यामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. घरची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शिक्षण घेता घेता काम करायला पाहिजे हे लक्षात घेऊन फेविकॉल या कंपनीत काही वर्षे नोकरी केली. नोकरी करत असताना खास करून विक्री विभागात काम करत असताना 'आपण गुणवत्तेचं उत्पादन केलं की ग्राहकांचा विश्वास बसतो' हे त्यांच्या लक्षात आलं आणि आपण असं उत्पादन करू शकतो, आपणही उद्योग सुरू करू शकतो हा आत्मविश्वास आला. नोकरीच्या पाशात न राहता आपला स्वत:चा उद्योग सुरू करावा असं सतत मनात होतं. यातून जन्म झाला 'सेक्टर सेल्स' या उद्योगाचा. मूळत: वाणिज्य शाखेचे विद्यार्थी असताना व विज्ञान शाखेशी ज्यांचा दुरूनही संबंध नाही अशा उमेश सरांनी उद्योगात पडल्यानंतर रसायन, यंत्र यांचा अभ्यास केला. विविध साबण तयार करण्यासाठी लागणारी रसायनं, यंत्र त्यांनी स्वत:च्या कौशल्यावर विकसित केली.

मुळातच मनमिळाऊ, शांत असलेल्या उमेश सरांना उद्योग क्षेत्रात त्यांच्या या स्वभावाचा खूप फायदा झाला. वर्धिनीचे पूर्ण वेळ काम करीत असताना मिळालेल्या अनुभवांचा उद्योग उभारणीत खूप महत्त्वाचा वाटा आहे असे ते आवर्जून सांगतात. मध्यम वर्गातील घरातून आलेले, स्वत:च्या कर्तृत्वावर ३०० ते ३५० कामगारांना रोजगार देणारे उमेश सर आपल्यासाठी नक्कीच एक आदर्श आहेत. वर्धिनीत झालेल्या संस्कारांचा, शिक्षणाचा उपयोग सरांना उद्योग, व्यवसाय उभा करताना झाला. धाडस, महत्त्वाकांक्षा, आपणही काही करू शकतो हा आत्मविश्वास, प्रसंगावधान, निर्णयक्षमता हे सर्व गुण रुजवले गेले वर्धिनीमध्ये. लौकिक शिक्षणापासून वेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे उमेश सर वर्धिनीच्या 'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे' या ब्रीदवाक्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

**– शब्दांकन : श्री. गणेश पवार**

**आपल्याला संघटनेची आवश्यकता आहे. संघटना हीच शक्ती आहे आणि आज्ञाधारकपणा हेच तिचे रहस्य आहे.**

## बदल घडतो - सुसंस्कारांमुळे

– श्री. निलेश मांढरे

नमस्कार मित्र-मैत्रिणींनो, मी 'स्व'-रूपवर्धिनी परिवाराच्या स्वामी अखंडानंद शाखेचा वर्धक. वर्धक अशासाठी की वर्धक असण्यात जी मजा आहे ती शिक्षक असण्यात नाही. 'स्व'-रूपवर्धिनीच्या कार्यवृत्तात लेख लिहिण्याचे भाग्य मिळणे हा माझ्या आयुष्यातील खूप मोलाचा, अविस्मरणीय क्षण. कारण कधी वाटलंच नाही की, आपल्याला अशी संधी मिळेल. पण आज ही संधी मिळाल्याने मन अगदी भरून आले.

मी वाढलो बिबवेवाडी गावात. मला 'स्व'-रूपवर्धिनीत येण्याचा दैवीयोग जुळून आला तो अखंडानंद शाखेतील आमचे लाडके व ज्येष्ठ शिक्षक श्री. सचिन चव्हाण व श्री. गोरख चव्हाण यांच्यामुळे. स्वामी अखंडानंद शाखा म्हणजे रांगडेपणाचं प्रतीकच. अशा या शाखेत माझ्यावर शारीरिक, मानसिक व बौद्धिक असे सर्व प्रकारचे संस्कार झाले. आज जे सरकारी अधिकारीपद मिळाले त्यासाठी आवश्यक असणारी शारीरिक गुणवत्ता शाखेतील खेळ, सहली, क्रीडाशिबिरे यातूनच मिळाली. बौद्धिक गुणवत्ता एकही रुपया फी न भरता मिळालेले तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, अभ्यास शिबिरे, प्रश्नमंजूषा आणि यांसारख्या अनेक बौद्धिक कार्यक्रमातूनच मिळाली. या सर्वांमधून माझ्या आयुष्याचा पाया तयार झाला.

दहावीनंतर मला शिंगे फुटली. त्यानंतर मी 'स्व'- रूपवर्धिनीपासून खूप दुरावलो. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ताही खालावली व एक चांगला मुलगा न राहता गैरकृत्यांमध्येच जास्त अडकत गेलो. स्वत:हून एका चुकीच्या वातावरणामध्ये गेलो व आयुष्याचा तो स्वत:ला घडवायचा काळ वाममार्गामध्येच घालवला. या गोष्टीमुळे खूप वाईट प्रसंग अनुभवले. पण जशी आई आपल्या मुलाला कधीच दूर करीत नाही व आपल्या मुलाला त्याच्या वाईट कृत्यांपासून परावृत्त करून चांगलं बनवायला हात देते त्याचप्रमाणे वर्धिनीने मला हात दिला व त्यातून बाहेर काढले.

दहावीनंतर पदवीपर्यंत कसाबसा रडतखडत पास झालो. पण साथ सोडतील ते वर्धिनीचे संस्कार कसले ? या संस्कारामुळेच आयुष्याला परत चांगल्या मार्गावर आणायचे ठरविले आणि सुरू झाला वाईटाकडून चांगल्याकडे प्रवास. वर्धिनीने नेहमी सामान्य राहून असामान्य जगायला शिकविले आणि मग ठरविले, आता असामान्य असे काही तरी करायचे व सुरू केला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा व वकिलीचा अभ्यास. आज वर्धिनीमुळे या दोन्ही क्षेत्रात यश संपादन करू शकलो.

आम्ही मातीचे गोळे होतो. आम्हाला न रंग होता ना आकार. पण वर्धिनीतील सर्व शिक्षक आमचे कुंभार बनले व या मातीच्या गोळ्याला या परमेश्वररूपी कुंभारांनी आकार दिला. माझी या पदामागची खरी प्रेरणा वर्धिनी हीच आहे.

इथून पुढे एक अधिकारी म्हणून जगतानाही वर्धिनीच्या संस्काराची शिदोरी कायम जवळ असेल व मी माझ्या कार्याने वर्धिनीची छाती अभिमानाने अजून जास्त फुगवेन. वर्धिनीच्या ऋणातून अजून शंभर जन्म घेतले तरी कधीही उतराई होऊ शकणार नाही.

**ज्यांना मानवजातीला साहाय्य करावेसे वाटते त्यांनी आधी आपल्या सुखदु:खांचे नावलौकिकांचे आणि सर्व प्रकारच्या स्वार्थी भावनांचे गाठोडे बांधून ते समुद्रात फेकून दिले पाहिजे.**

## स्वयंसिद्धा

(एका यशस्वी महिला कार्यकर्तीचे आत्मनिवेदन)

**मी** सौ. सुदर्शना रमेश त्रिगुणाईत. वयाच्या १६ व्या वर्षी माझे लग्न झाले. नवनवीन शिकण्याची इच्छा लहानपणापासून होती. काही ना काही करायचे, जगात आपले वेगळे अस्तित्व निर्माण करावयाचे अशी इच्छा होती. पण माझे संगोपन खेडेगावातून झाले. खूप काही शिकायचे, डॉक्टर बनायचे अशी प्रचंड इच्छाशक्ती मनात होती. गावातील शिक्षणसंस्थांच्या अपुरेपणामुळे व पुरातन रुढी परंपरेमुळे शिक्षण पूर्ण होऊ शकले नाही. परंतु शिक्षणाच्या कमतरतेमुळे मागे न राहता डोळ्यात नवनवी स्वप्न घेऊन व मनात प्रबळ इच्छाशक्ती बाळगून प्रगतीच्या मार्गावर चालत राहिले.

मी लग्न होऊन आले ते एकत्र कुटुंबात पडले. १५ ते १६ जणांचे कुटुंब व एकच खोली. घरातील आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच. माझे पती भाड्याची रिक्षा चालविणारे. सासरे निवृत्त होऊन घरी बसलेले; पण विचारी. घरातील कामातच माझा सगळा वेळ जायचा. आमच्या तिघींची मुले लहान. मला तीन मुलं. त्यापैकी एक मुलगा व दोन मुली. घरातील कामे वेळेवर होणे आवश्यक. पहाटे सर्वांच्या आधी उठून स्वत:ची कामे उरकून घ्यावी लागत. कारण वाड्यात राहात होतो. सर्व गोष्टी कॉमन असायच्या. मुलांची शाळा, मोठ्यांची उठबस करणे, घरातील धुणी भांडी, स्वयंपाक, पाहुणा सर्व पाहावे लागत. अशा परिस्थितीत मनात मात्र सतत द्वंद्व चालायचे स्वत:च्या अस्तित्वाबद्दल. त्यात मी अत्यंत लाजाळू व समाजाला सतत भिणारी. हा समाज मला माझ्या इच्छा पुऱ्या करू देईल ना. त्यात आधी घरातील लोकांची मने जिंकायची म्हणजे सर्वांशी खूप गोड वागले पाहिजे. गोड वागायचे म्हणजे आपल्या वाट्याची कामे करून इतरांच्या कामात मदत करणे. हळूहळू मला ही सवय लागली. पण मनातील प्रश्न संपत नव्हता. मुले मोठी होत होती. माझा मोठा मुलगा विवेक याला बालवाडीत घालायची वेळ आली. मोठ्या जावेची मुले 'स्व'-रूपवर्धिनीच्या बालवाडीत जात होती. मग माझा विवेकही तिथे जाऊ लागला. त्याला सोडायच्या निमित्ताने वर्धिनीमधील उपक्रमांची चौकशी केली आणि मनास खूप आनंद झाला. मी शोधत असलेली जागा मला मिळाली. मनाची तयारी करून घरात परवानगी मिळावी यासाठी वातावरण तयार करणे आवश्यक होते. विषय काढला आणि माझे सासरे एकदम जा म्हणाले, ''संस्था चांगली आहे. दुपारच्या वेळेस तसे फार काम नसते. तू जा व शिवणवर्गात नाव घाल.'' पडत्या फळाची आज्ञा मानून मी लगेच अर्ज भरला व प्रवेश घेतला. समाजातील प्रत्येक घटकाने यावे आणि आपापल्या गुणांचा विकास करावा हे संस्थेचे उद्दिष्ट. अगदी मनापासून मी शिवणवर्ग पूर्ण केला. तिथे नुसताच शिवणवर्ग नव्हता त्या बरोबर समाजात कसे वागावे, कुटुंब हे समाजात कसे मोडते, कुटुंब म्हणजेच छोटा समाज. प्रथम या समाजात स्वत:चं अस्तित्व कसे निर्माण करावे यासाठी आपली भूमिका किती



**एकसारखे कार्य करीत राहा. जाहिरातबाजीच्या व नावाच्या पाठीमागे लागू नका.**

महत्त्वाची. प्रत्येकाने आपण नेमून दिलेल्या भूमिकेनुसार कर्तव्य केले तर भांडणे, हेवेदावे हे होणारच नाही तर प्रत्येकजण एकमेकांविषयी आदर बाळगेल. अशा प्रकारचे विचार मला मिळू लागले. पहिल्याच बॅचमध्ये मुलींची संख्या खूप होती. दोन-तीन बॅचमध्ये वर्ग चालायचा. सौ. ढवळे बाई मला होत्या. त्यावर्षी १०० विद्यार्थिनींमध्ये माझा प्रथम क्रमांक आला. माझ्या आयुष्यातील तो अविस्मरणीय दिवस होता. मी नक्कीच वेगळे काही तरी करू शकते हा विश्वास पुष्पाताई मला द्यायच्या. तो विश्वास वाढू लागला. कारण पुष्पाताईंपासून घरातील परिस्थिती लपली नव्हती. वर्ग चालू असताना एकदा एक गोष्ट घडली. घरातील कार्यक्रमासाठी आम्हाला सर्वांना सोलापूरला जावे लागले. शनिवार रविवारी सुट्टी असल्यामुळे मी पण गेले. रविवारी रात्री परत यायचे पण झाले वेगळेच. आम्ही सगळे सोमवारी दुपारी १ वाजता आलो तर मी रिक्षातून उतरून घरी न जाता सरळ वर्धिनीत आले. एकही दिवस खाडा करावयाचा नाही हे पक्के ठरविले होते. विवेकची बालवाडी पूर्ण होऊन तो पहिलीत गेला तर पूजा बालवाडीत गेली. विवेक वर्धिनीच्या बालशाखेतही जाऊ लागला. पुढे पूजापण जाऊ लागली. वर्धिनी म्हणजे माझे माहेर झाले होते. या वर्धिनीसाठी आपणही काही करावे, आपणही वर्धिनीला काही द्यावे असे सारखे वाटत असे. मी माझ्या घरातील सर्व कामे आटपून लोकांचे कपडे कमी पैशात शिवून देऊ लागले आणि बाहेरचा महागडा फॅशन डिझाईनचा वर्ग पूर्ण केला. तो वर्ग झाल्यावर थोडा सराव केला आणि एक दिवस पुष्पाताईंना म्हटले, ''ताई आपण फॅशन डिझाइनिंगचा वर्ग सुरू करू या का ?'' ''खूपच छान, हरकत नाही. पण तू बाहेर भरलेली फी इथे कोणी देऊ शकणार नाही.'' ''काही हरकत नाही. सेवा म्हणून मी रोज दोन तास देण्यास मी तयार आहे. आपण हा वर्ग सुरू करू या. तुम्हाला जे योग्य वाटेल ते मानधन तुम्ही मला द्या.'' मग मी फॅशन डिझाईनचा वर्ग सुरू केला आणि त्या वर्गातून एक गोष्ट केली की महिलांचे संघटन बांधून तयार ब्लाऊजचा त्या महिलांना व्यवसाय काढून दिला. त्या महिलांना घरबसल्या व्यवसाय मिळाला. या शिवाय अनेक महिलांना व्यवसाय कसा करावा, नवनवीन फॅशन्स बाजारात कशा येतात, त्या कशा आत्मसात कराव्यात हे पण शिकविले. आता मला अर्धवट सोडलेले शिक्षण पूर्ण करावे असे वाटू लागले व माझा मुलगा विवेक १० वीत गेल्यावर मी पण त्याच्याबरोबर १० वी चा अभ्यास सुरू केला. अनेक वर्षे खंड पडल्याने जड जाणार होते. त्यात एकत्र कुटुंब, एकच खोली. हे सर्व सुखासुखी नव्हते. पण करायचेच मनाने घेतले होते. आता मला सारखे वाटत होते, महिलांसाठी आपण हे करावे, ते करावे. अनेक गरजू महिला आहेत, त्यांच्या घरच्यांना आर्थिक हातभार लावता येईल असे प्रशिक्षण वर्ग आपण सुरू करू या. म्हणून मी २००३ साली 'माँ दुर्गा शक्ती महिला संस्थे'ची स्थापना केली. त्या माध्यमातून मी फॅशन डिझाईन, ब्युटी पार्लर असे वर्ग सुरू केले की जेणेकरून १० X १० खोलीमध्ये महिला आपला व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवू शकतील हाच उद्देश होता. वर्धिनीत २ तास देत होतेच. त्यानंतर मी 'लक्ष्मी भगवती स्वयंरोजगार सेवा सोसायटी'ची स्थापना केली व ४५० महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला. नेहरू युवा केंद्राद्वारे राज्याचा पुरस्कार मला मिळाला. वर्धिनीचे पाठबळ मिळाल्यामुळेच हे सगळं घडू शकलं होतं.

**तुम्हाला मरावयाचे तर आहेच, मग एखाद्या महान ध्येयासाठी का मरत नाही ?**

अशा प्रकारे सामाजिक कार्यात मी रमू लागले. एकीकडे संसार व एकीकडे कार्य. अपुऱ्या जागेमुळे धनकवडी येथे राहायला गेले. तेथे एक खोली घेतली. मुलांच्या शिक्षणाची आबाळ होऊ दिली नाही. म. न. पा. कडून निवडणुकीसाठी विचारणा झाली. मी पुष्पाताईंना विचारले. ताई म्हणाल्या, ''सुदर्शना समाजकारण व राजकारण हे नेहमी वेगळेच असावे. जेव्हा आपल्या मनाचा ठाम निश्चय होईल की सत्तेचा उपयोग मी नक्कीच समाजकार्यासाठी करेन तेव्हा तू नक्की विचार कर.'' त्यानंतर मी २०१२ च्या निवडणुकीमध्ये एका राजकीय पक्षाने देऊ केलेल्या संधीचा फायदा घेतला पण पैशाच्या राजकारणापुढे मी टिकू शकले नाही. धनकवडीत मी सुखासुखी राहावयास गेले नव्हते. माझे पती खूप आजारी होते व घरचेही साथ देईनात. मुले मोठी होत होती. मी धनकवडीत भाड्याची खोली घेऊन शिवणवर्ग सुरू केला. १८ मुलींनी प्रवेश घेतला. १८०० रु. मध्ये माझा चरितार्थ मी चालवत होते. हळूहळू त्यात वाढ होत गेली. काही वर्षांनी आम्ही एक टेम्पो खरेदी केला. माझे पती आता टेम्पो चालवतात. आर्थिक परिस्थिती सुधारल्यावर पुन्हा मंगळवार पेठेत घर विकत घेतले. वर्धिनीच्या जवळ आले म्हणून खूप बरे वाटले. समाजातील दुर्बल घटकांना उत्तम शिक्षण मिळावे या हेतूने २००५ साली 'नॅशनल इंग्रजी स्कूल'ची स्थापना केली. कमीतकमी फी व उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणे सुरू केले.

माझा मुलगा विवेक एम.कॉम. झाला. एका बँकेत तो नोकरी करतो. त्याचे लग्न झाले. त्याला पण शिकलेली व सुसंस्कारित बायको मिळाली. पूजाने बी. सी. एस. केले. तिचे पण लग्न ठरविले आहे तर तृप्तीने १२ वीनंतर ब्युटी पार्लरचा कोर्स करून एक पार्लर टाकले आहे. मला सर्व महिला, मुलींना एक सांगावेसे वाटते ते म्हणजे आपल्याकडून सोने, पैसे हिसकावून घेतले जाऊ शकतात. पण आपली कला कोणी हिरावू शकत नाही. ती जितकी इतरांसाठी वापराल तेवढी ती वाढेल.

असा हा माझा प्रवास चालू आहे. पुढे शाळा, कॉलेज आणि अनाथ आश्रम व महिलांना रोजगार या बाबत देखील अजून काही करावयाचे आहे. तरी याकरिता आपली मदत व वर्धिनीचे आशीर्वाद हवेत.

❖ ❖ ❖


वैष्णवी
फोटोज/व्हिडीओ

कमर्शिअल फोटोग्राफर

श्री. मंगेश नरडेकर
५१२, रास्ता पेठ, अपोलो टॉकीजमागे,
पुणे ४११ ०११
मोबा. नं. : ९८२३८९८१४८
ई-मेल :
mangeshnardekar@yahoo.com

जीवनात एखादे उच्च ध्येय समोर ठेवून त्याच्यासाठी मरून जाणे हे कितीतरी चांगले आहे.

# विशेष लेख

यावर्षीच्या वार्षिक कार्यवृत्तासाठी पुढील लेखकांनी काही विशेष लेख दिले आहेत. त्या सर्वांविषयी कृतज्ञतेची भावना आम्ही व्यक्त करतो.

- नामांकित वक्त्या, लेखिका माननीय सौ. डॉ. सुरुचिताई पांडे यांनी 'स्त्रियांविषयीचे स्वामी विवेकानंदांचे विचार' या विषयावर लेख लिहिला.
- 'स्व'-रूपवर्धिनीचे सहकार्याध्यक्ष व स्वामी विवेकानंद सार्धशती समितीचे महाराष्ट्र प्रांताचे संयोजक श्री. शिरीष पटवर्धन यांनी आगामी वर्षभरात सार्धशतीनिमित्त कोणकोणते उपक्रम राबविले जाणार आहेत याविषयी लेख लिहिला.
- विविध नियतकालिकांतून व दिवाळी अंकातून लेखन करणारे तसेच जुन्या ध्वनीमुद्रिकांचे संग्राहक व संगीताचे अभ्यासक श्री. अद्वैत धर्माधिकारी यांनी 'गानयोगी विवेकानंद' या विषयावर लेख लिहिला.
- ज्ञानदा प्रशालेचे कला शिक्षक, लेखक, गायक श्री. मिलिंद सबनीस यांनी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या १७५ व्या जन्मशती व स्वामी विवेकानंद यांच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने 'आनंदमठ' या कादंबरीतील बंकिमचंद्र व विवेकानंद यांच्या आठवणींवरील लेख लिहिला.
- 'प्रबोध संपदा' उद्योगसमूहाचे संचालक श्री. प्रफुल्ल कुलकर्णी यांनी 'रेझांग ला' युद्धाच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त इंडियन एक्स्प्रेसमधील श्री. शेखर गुप्ता यांच्या लेखांवर आधारित 'रेझांग लाची लढाई ' या विषयावर लेख लिहिला.

**तुम्ही कामाला लागा म्हणजे तुम्हाला दिसून येईल की**
**तुमच्यात इतकी शक्ती उत्पन्न होत आहे की ती सहन करणे तुम्हाला कठीण जाईल.**

## भारताला आवाहन

भारता ! तुझ्या स्त्रियांचा आदर्श सीता, सावित्री आणि दमयंती ह्या आहेत
हे विसरू नकोस. विसरू नकोस की तुझे उपास्य आहेत सर्वत्यागी उमानाथ शंकर.
विसरू नकोस की तुझा विवाह, तुझे धन, तुझे जीवन ही इंद्रियसुखासाठी,
केवळ तुझ्या वैयक्तिक सुखासाठी नाहीत. विसरू नकोस की
'माते'साठी बली म्हणूनच तू जन्माला आला आहेस.
विसरू नको की तुझा समाज म्हणजे त्या विराट महामायेची केवळ छाया आहे.
विसरू नकोस की दलित, अज्ञानी, गरीब, निरक्षर, चांभार, भंगी हे सारे तुझे भाऊच
आहेत, तुझ्याच रक्तमांसाचे आहेत. हे वीरा ! धीट हो, धैर्य सोडू नकोस,
तू भारवासी आहेस याबद्दल गर्व वाटू दे - आणि अभिमानाने ललकार की,
''मी भारतीय आहे, प्रत्येक भारतवासी माझा बंधू आहे.''
जगाला गर्जून सांगा की, ''अज्ञ भारतवासी, गरीब भारतवासी, दु:खी भारतवासी,
ब्राह्मण भारतवासी, चांडाळ भारतवासी - सर्वजण माझे बंधू आहेत.''
तू देखील कमरेपुरते वस्त्र गुंडाळून गर्वाने गर्जना कर की,
''भारतवासी माझा भाऊ आहे. भारतवासी माझा प्राण आहे,
भारताच्या देवदेवता माझ्या ईश्वर आहेत, भारतीय समाज हा माझ्या बाळपणाचा पाळणा,
माझ्या तारुण्याची फुलबाग, माझ्या वार्धक्याची वाराणशी आहे.''
बंधो ! उच्च स्वराने उद्घोष कर की, ''भारताची माती माझा स्वर्ग आहे,
भारताच्या कल्याणातच माझे कल्याण आहे'' आणि रात्रंदिवस हीच प्रार्थना कर की,
''हे गौरीनाथ ! हे जगदंबे ! मला 'मनुष्यत्व' दे; माते !
माझी दुर्बलता, भीरुता दूर कर - मला 'मनुष्य' बनव.''

**आपल्या देशाच्या सर्व भावी आशा तुमच्यावरच अवलंबून आहेत.**

## स्त्रियांच्या स्थानाबद्दल स्वामी विवेकानंदांनी मांडलेले विचार

**भा**रतात स्त्रियांची जी अवनती झालेली होती, ती पाहून स्वामी विवेकानंदांचे मन कायम दु:खाने व्याकूळ होत असे. १८९७ सालात मार्च-एप्रिलच्या सुमारास आपल्या एका शिष्याशी बोलताना स्वामीजी म्हणाले, ''तुमच्या या देशात स्त्रियांच्या शिक्षणासाठी काहीच प्रयत्न होत नाहीत. शिकल्यासवरल्याने स्वत: तुम्ही मात्र माणसांत येता पण तुमच्या सुखदु:खाच्या वाटेकरणी, ज्या प्राण पणाला लावून तुमची सेवा करतात त्या स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी, त्यांची उन्नती करण्यासाठी तुम्ही काय करता ?''

आजच्या काळात कदाचित् एखाद्याला वाटू शकेल, की एव्हाना तर आपल्या देशात, स्त्रियांसाठी शिक्षणाचा प्रसार झाला आहे. स्त्रियांना अनेक कार्यक्षेत्रात संधी मिळते आहे, मग स्वामीजींनी स्त्रियांबद्दल जे विचार मांडले आहेत, त्यांचा सखोल अभ्यास करण्याची आता काय गरज आहे ? याच्या अनुषंगाने आपण थोडासा विचार करायचा आहे. पहिली गोष्ट ही की स्त्रियांना शिक्षणाची संधी पूर्वीपेक्षा नक्कीच अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध झालेली आहे, हे तर खरं आहे. परंतु हे सर्वच स्त्रियांच्या बाबतीत घडत नाही, हीदेखील वस्तुस्थिती आहे. अजूनही भारतात सर्व राज्यांमध्ये शिक्षणाचा सर्वदूर प्रसार झालेला नाही. आजही कधी दुर्गम भागांत, ग्रामीण भागात किंवा शहरात राहणाऱ्या संकुचित मनोवृत्तीच्या माणसांमध्ये घरातला खर्च वाचवायचा एक मार्ग म्हणून स्त्रीचे शिक्षण बंद करून टाकले जाते. म्हणूनच स्वामीजींनी १८९७ मध्ये पुढे म्हटलं होतं, ''सर्वसामान्य लोकांत आणि स्त्रियांपर्यंत जोवर शिक्षणाचा प्रसार होत नाही तोवर काहीही साधणे शक्य नाही... आज पाहावे तर तुम्ही स्त्रियांना काम करणारी यंत्रे करून ठेविले आहे... शिक्षणाने साऱ्याच बाबतीत डोळसपणा यायला हवा.'' स्त्रियांनी शिक्षण घेऊन म्हणजे केवळ अक्षरओळख करून घेऊन थांबू नये; तर पुढे या स्त्रियांनी अन्य मुलींना शिकविण्याची जबाबदारी घ्यावी, असे विचार स्वामीजींनी मांडले आहेत. आधुनिक विज्ञान आणि आदर्श चारित्र्य घडविणारे शिक्षण मुलींना मिळायला हवे, असे ते म्हणत.

२१ जानेवारी १८९५ मध्ये, ब्रुकलिन स्टँडर्ड युनियन येथे दिलेल्या व्याख्यानात स्वामीजींनी आवर्जून वैदिक काळातील स्त्रीचा उल्लेख केला. भारतात स्त्रियांनी पुरोहिता म्हणून काम करण्याची प्रथा प्राचीन काळापासून असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे भारतातील मातृभक्तीचा विचार त्यांनी स्पष्ट केला. ''सगुण ईश्वराचे रूप म्हणजे स्त्री आहे'', असे स्वामीजींचे शब्द आहेत.

स्त्रियांच्या अवनत दशेमागे इतिहासाची कारणे दडलेली आहेत, हे स्वामीजींनी १८९८ सालातील एका मुलाखतीत सांगितले. त्यात स्वामीजींनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला होता, तो असा, ''आपल्या देशात स्त्रियांना जे स्थान आहे, ते समाधानकारक मुळीच नाही. पण स्त्रियांच्या बाबतीत हस्तक्षेप करण्याचा आपला अधिकार फक्त त्यांना शिक्षण देण्यापुरता आहे. स्वत:च्या समस्या स्वत:च्याच पद्धतीने स्वत:च सोडविता येण्याची क्षमता स्त्रियांना लाभली पाहिजे. त्यांच्याकरिता म्हणून दुसरा कोणी

**दुसऱ्यासाठी केलेले अत्यंत लहानसे काम देखील अंत:स्थ शक्ती जागृत करते.**
**दुसऱ्याच्या हिताचा अत्यंत थोडा विचार केल्यानेदेखील क्रमश: हृदयात सिंहाचे बळ संचारते.**

ते कार्य करू शकत नाही आणि कोणी ते करूही नये. जगातल्या कोणत्याही स्त्रियांइतक्याच योग्यतेने भारतीय स्त्रियाही ते कार्य करू शकतील.'' स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य देण्याचा विचार इतक्या नि:संदिग्धपणे अन्य कुणी क्वचितच मांडला असेल.

स्वामीजींच्या विचारांमागचे खरे मर्म आहे त्यांच्या परिपक्वतेत. २५ सप्टेंबर १८९४ रोजी आपल्या सर्व गुरुबंधूंना उद्देशून लिहिलेल्या पत्रात स्वामीजींनी म्हटले होते, ''स्त्रीपुरुष भेद मुळापासून उपटून टाकल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. आत्म्यामध्ये का कधी लिंगभेद असतो ? हा स्त्रीपुरुष भेद पूर्णपणे दूर करा. सर्व काही आत्माच आहे.'' स्वामीजींच्या शिक्षणविषयक विचारांचा गाभा जर आपण समजून घेतला, तर स्त्रियांसाठी काम करताना आपल्यासमोर कायम एक मोठी चौकट राहील. आपण स्वामीजींच्या शब्दांतच ते समजून घेऊ या.

''मी कोणत्याच गोष्टीची व्याख्या देत नसतो. तथापि शिक्षणाचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल. खरे शिक्षण म्हणजे नुसते शब्द घोकणे नव्हे, तर सर्व मानसिक शक्तींचा विकास करणे हेच खरे शिक्षण होय; किंवा असेही म्हणता येईल की शिक्षण म्हणजे व्यक्तींना अशा रीतीने वळण लावणे की जेणेकरून त्या आपली इच्छाशक्ती चांगल्या गोष्टींकडे वळवू शकतील आणि त्या गोष्टी प्रत्यक्ष कृतीत आणू शकतील. थोर, निर्भय स्त्रियांची जी भारतात वाणवा आहे ती अशा शिक्षणानेच दूर होईल, आणि संघमित्रा, अहिल्याबाई, मीराबाई यांची परंपरा पुढे चालेल. भगवंताच्या चरणस्पर्शाने प्राप्त होणारे सामर्थ्य ज्यांच्या हृदयात विराजमान आहे, ज्या पवित्र आणि नि:स्वार्थी आहेत आणि म्हणूनच वीरमाता होण्यास ज्या योग्य आहेत अशा स्त्रिया ह्या शिक्षणानेच निर्माण होतील.''

''धर्म हा शिक्षणाचा अगदी गाभा आहे असे मी मानतो. धर्म म्हटला म्हणजे तद्विषयक मते अथवा इतर कोणाची तद्विषयक मते असा माझा अभिप्राय नाही एवढे मात्र लक्षात ठेवा. मला असे वाटते की शिक्षिकेने, इतर विषयांप्रमाणेच ह्या विषयातही आपल्या विद्यार्थिनींची कुठवर तयारी आहे हे पाहून तेथून तिला शिक्षण देण्यास सुरुवात करावी आणि तिला स्वत:ची प्रगती करून घेण्यासाठी असा मार्ग दाखवावा की ज्यात तिला कमीत कमी अडथळ्यांना तोंड द्यावे लागेल.''

**– डॉ. सुरुचि पांडे**

❖ ❖ ❖


**सचीन चव्हाण** **मोबा.** ९८२२ ८४ ०४ २०
९७६६ ३७ ३७ ३७
**नितीन चव्हाण** **मोबा.** ९८६० ६० ५७ ५७
**(आर.टी.ओ.ची कामे)**

**ॐ ड्रायव्हिंग स्कूल**
**ॐ ट्रॅव्हल्स**

**❖ कल्याणीनगर शाखा ❖**

कल्याणीनगर, गेरा लँडमार्क, प्लॉट क्र. २२/बी,
जुना सर्व्हे क्र. २२०/२ बी कल्याणी बंगल्यासमोर,
आय.सी.आय.सी.आय. बँकेजवळ,
कल्याणीनगर पुणे.

**❖ सदाशिव पेठ शाखा ❖**

पेरूगेट पोलीस चौकीसमोर, गोपी हॉटेलजवळ,
सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.


**दुसऱ्यांसाठी कार्य करता करता तुम्हाला मृत्यू यावा अशी माझी हार्दिक इच्छा आहे – तुम्हाला तसे करताना पाहून मला आनंदच होईल.**

## पुण्यस्मरण युगपुरुषाचे

**'स्व'**-रूपवर्धिनीचे काम सुरू झाल्यानंतरच्या काळात जेव्हा जेव्हा कै. किशाभाऊ पटवर्धन सरांशी गप्पा होत होत्या, त्यावेळी एक गोष्ट स्पष्टपणे समजली होती की उपेक्षित प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे काम विवेकानंद केंद्राचा उपक्रम म्हणून सुरू व्हावे अशी त्यांची अत्यंत मनापासून इच्छा होती. तसा प्रयत्नही त्यांनी केला होता. परंतु अशा प्रकारचे उपक्रम पुण्यासारख्या शहरांमध्ये सुरू करण्यासंबंधीचा विचार केंद्राच्या त्यावेळच्या धोरणात नसल्याने आपल्या मनातील विचार किशाभाऊंनी 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने प्रत्यक्षात आणला आणि म्हणूनच वर्धिनीच्या शाखांना नावे सुद्धा रामकृष्ण परमहंस आणि त्यांचे निकटचे सर्व शिष्य यांची द्यावीत असे त्यांनी ठरविले. म्हणूनच आपल्या बहुतेक शाखांची नावे त्या परंपरेतील आहेत.

वर्ष २०१३ हे स्वामी विवेकानंदांच्या सार्धशतीचे म्हणजे १५० व्या जयंतीचे वर्ष आहे. केवळ आपला देशच नव्हे तर अमेरिकेसारख्या अनेक पश्चिमी देशांमध्येही स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने अनेक कार्यक्रम होणार आहेत. वर्धिनीच्या संस्थापकांच्या मनात स्वामी विवेकानंदांच्या प्रति असलेली श्रद्धा विचारात घेऊन एक संस्था म्हणून वर्धिनीनेही या सार्धशतीच्या वर्षात स्वामीजींच्या ओजस्वी, प्रेरणादायी, आत्मविश्वास फुलविणाऱ्या, देशभक्ती जागविणाऱ्या आणि समरसता रुजवणाऱ्या विचारांचा प्रसार करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करायला हवे.

समाजाच्या सर्व स्तरांमध्ये आणि सर्व वयोगटांमध्ये पोहोचविण्याच्या हेतुने विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी यांच्या नेतृत्वाखाली स्वामी विवेकानंद सार्धशती समारोह समिती गठित झाली आहे. या समितीच्या माध्यमातून २५ डिसेंबर २०१२ ते १२ जानेवारी २०१४ पर्यंत विविध कार्यक्रमांच्या, उपक्रमांच्या आणि योजनांच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणावर समाजाला सक्रीय करण्याचा समितीचा मनोदय आहे. हे सर्व कार्यक्रम खाली उल्लेख केलेल्या पाच आयामांच्या माध्यमातून केले जाणार आहेत.

**युवा आयाम :**

आज सारे जग भारताकडे बघते आहे ते भारताकडे असलेल्या युवाशक्तीच्या समृद्धतेमुळे. ही युवा शक्ती जागृत व्हावी, कर्तृत्ववान आणि आपल्या देशाविषयी अत्यंत अभिमान बाळगणारी घडावी यासाठी या युवाचैतन्याला स्वामी विवेकानंदांच्या विचारांच्या आधारे साद घालण्यासाठी युवा आयामाद्वारे विविध कार्यक्रमांची योजना समितीच्या माध्यमातून होणार आहे.

**संवर्धिनी (महिला) आयाम :**

कुटुंबव्यवस्था हा जगाने भारताचा हेवा करावा असा विषय आहे. या कुटुंब व्यवस्थेच्या आधारावरच भारतीय समाजाने सर्व संकटांचा सामना केला आहे. अगदी अलीकडच्या काळात आर्थिक मंदीमुळे जगामधील अनेक देशांमध्ये उलथापालथी झाल्या, अगदी अमेरिकेसारख्या देशालाही या मंदीच्या फटक्यातून सावरणे अवघड जाते आहे. अशा काळातही कुटुंब व्यवस्था टिकवल्याचा भारताला काय फायदा होऊ शकला याची अनुभूती सारे जग घेते आहे. या कुटुंबव्यवस्थेचा कणा म्हणजे घरातील मातृशक्ती. या मातृशक्तीचा स्वामी विवेकानंदांनी अत्यंत मुक्तपणे गौरव केला आहे. स्त्रियांचे शिक्षण, त्यांच्या कर्तृत्त्वाला संधी मिळणं, समाज जीवनात त्यांना सन्मानाचं स्थान मिळणं याविषयी आपले विचार आग्रहाने मांडले आहेत. आजच्या काळात आपल्या देशातील

**तुम्ही जर आपल्या हृदयाचे रक्त देऊन दुसऱ्यांसाठी रात्रंदिवस कार्य कराल,**
**तर जीवनात असे काहीच नाही की जे तुम्ही करू शकणार नाही.**

मातृशक्तीला जागृत करण्यासाठीच्या कार्यक्रमांचा विचार संवर्धिनी (महिला) आयामाद्वारे केला जाणार आहे.

**प्रबुद्ध आयाम :**

भारतीयांच्या बुद्धिमत्तेविषयी जगामध्ये आदर आहे. ज्या मानाने या बुद्धीच्या बळावर जगामध्ये आमचं स्थान असायला हवं तेवढं ते आज नाही. कारण समाज जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करणारी माणसं, ज्यांच्या मतांची दखल प्रचार प्रसार माध्यम किंवा सरकारही घेतं अशी माणसं, ज्यांच्यामागे मोठी जनशक्ती आहे अशी वेगवेगळ्या गटांचे, पंथांचे, श्रद्धांचे नेतृत्व करणारी माणसं, जगामध्ये एखाद्या विषयातील ज्यांच्या कर्तृत्वाबद्दल दबदबा आहे अशी माणसं समाजजीवनामध्ये जेवढी सक्रीय आणि संघटित असायला हवीत तेवढी ती आज नाहीत. या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने अशा सर्वांना एकत्र आणण्याचा आणि त्यांना सक्रीय करण्याचा प्रयत्न या आयामाच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून करण्याचा समितीचा मनोदय आहे.

**ग्रामायण आणि अस्मिता आयाम :**

सहा लाख खेड्यांनी व्यापलेल्या आपल्या देशातील ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावल्याखेरीज देशाच्या विकासाचा कोणताही उपक्रम यशस्वी झाला आहे असे म्हणता येणार नाही. हीच गोष्ट सुदूर जंगलामध्ये राहणारे वनवासी बांधव, ज्यांचं जीवनच स्थिर होऊ शकलेलं नाही असा भटका समाज आणि शहराच्या झगमगाटात राहात असूनही ज्यांच्या जीवनात अज्ञान आणि दारिद्र्यामुळे अंधार आहे असा उपेक्षित वस्त्यांमधून राहणारा गरीब समाज यांच्याशी संपर्क आणि संवाद केल्याखेरीज, त्यांच्या जीवनमानात बदल घडवून आणणारी शिक्षण आणि रोजगाराबरोबरच अन्य विकासाची कामे केल्याखेरीज 'शिवभावे जीवसेवा' या स्वामीजींच्या वचनाची अनुभूती कशी येईल ? या आयामांच्या माध्यमातून ज्यांनी या सर्व समाजबांधवांची सेवा करायला हवी अशा सर्व कर्तृत्ववान आणि सक्षम हातांपर्यंत हा सेवेचा संस्कार पोहोचविणारे कार्यक्रम या आयामाच्या माध्यमातून करण्याचा समितीचा मानस आहे.

२५ डिसेंबर २०१२ रोजी होणाऱ्या संकल्प दिनाच्या कार्यक्रमाने सार्धशतीची म्हणजेच स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंतीची देशभर सुरुवात झाली असून या पूर्ण वर्षात खालील मोठ्या कार्यक्रमांचेही आयोजन केले जाणार आहे.

**१२ जानेवारी २०१३** – स्वामी विवेकानंदांच्या जयंतीच्या निमित्ताने भव्य शोभायात्रा.

**१८ फेब्रुवारी २०१३** – रथसप्तमीच्या निमित्ताने युवाशक्तीच्या अधिकाधिक सहभागातून सांघिक सूर्यनमस्काराचा उपक्रम

**११ सप्टेंबर २०१३** – भारत जागो दौड

**१५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०१३** – सेवासाधना कालावधी (उपेक्षित समाजबांधवांच्या सेवेसाठी काही दिवस देण्याचा उपक्रम)

**१२ जानेवारी २०१४** – सार्धशती सांगता कार्यक्रम (मानव शृंखला कार्यक्रम)

शालेय आणि महाविद्यालयीन स्तरांवरच्या विविध स्पर्धांचे आयोजन, घरोघर संपर्क मोहिमेत मोठा सहभाग, स्वामीजींचे चरित्र सांगण्याच्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील अनेक खेड्यांशी संपर्क, स्वामी विवेकानंदांच्या चरित्राच्या आणि विपुल साहित्याच्या अभ्यासासाठी वर्धकांची आणि कार्यकर्त्यांची शिबिरे, महिला संमेलने अशा अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातून वर्धिनी या सार्धशतीमध्ये सहभागी होऊ शकते व तसा संकल्प व्हावा अशी सार्धशती समारोह समितीची अपेक्षाही आहे.

**– श्री. शिरीष पटवर्धन**

❖ ❖ ❖

**जोपर्यंत 'मला – शिवू – नका – वाद' हा तुमचा धर्म आहे तोपर्यंत तुमची आध्यात्मिक उन्नती होऊ शकणार नाही.**

## गानयोगी स्वामी विवेकानंद

**स्वा**मी विवेकानंद यांची ह्या वर्षी १५० वी जयंती आहे. स्वामीजी देशभक्त, अध्यात्मिक होतेच; पण त्याचबरोबरच ते उत्तम गायक, वादक आणि संगीतज्ज्ञ पण होते. त्यांचे वडील विश्वनाथ बाबू अतिशय कलासक्त होते. त्यांनी ठुमरी आणि टप्प्याचे विधिवत शिक्षण घेतले होते. नरेन्द्रनाथ मोठे झाल्यावर विश्वनाथ बाबूंच्या लक्षात आले की आपल्या मुलाचा आवाज अतिशय मधुर आहे. तेव्हापासून विश्वनाथबाबूंनी नरेन्द्रनाथांना स्वत: गाण्याची तालीम द्यायला सुरुवात केली. पुढे गायक उत्साद अहमद खाँ यांचे शिष्य वेणुप्रसाद गुप्त यांच्या मार्गदर्शनात स्वामीजींची गाण्याची तालीम सुरू राहिली. पहिल्या परीक्षेनंतर नरेन्द्रनाथ संगीताच्या व्याकरणापासून ते बंदिशी पर्यंत अधिकारवाणीने बोलू लागले. याच काळात नरेन्द्रनाथ पखवाज, तबला आणि इसराज्य ही वाद्ये वाजविण्यात प्रवीण झाले. नरेन्द्रनाथ संगीतविषयक जे विचार मांडत ते कलकत्त्यातील संगीत क्षेत्रातील अधिकारी लोकांना पण मान्य होते.

नरेन्द्रनाथांच्या शेजारी सुरेन्द्रनाथ मित्र नावाचे गृहस्थ रहात. रामकृष्णांवर त्यांची अपार श्रद्धा होती. १८८१ च्या नोव्हेंबर महिन्यात सुरेंद्रनाथ मित्र यांनी रामकृष्णांना आपल्या घरी बोलावले. त्याचबरोबर नरेन्द्रनाथांनाही भजने गाण्यासाठी घरी बोलावून घेतले. ही नरेन्द्रनाथ व रामकृष्ण परमहंसांची पहिली भेट. नरेन्द्रनाथांच्या गायनाने रामकृष्ण परमहंसांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. पुढे नरेन्द्र दक्षिणेश्वरी जाऊन रामकृष्णांना भजने गाऊन दाखवी. १८८९ साली नरेन्द्रनाथांनी ब्राह्मो समाजात जायला सुरुवात केली. तेथे ते सभेत गायन करीत. महर्षी देवेन्द्रनाथ ठाकूर यांचे नातू हितेन्द्रनाथ त्यांचे सहाध्यायी होते. त्यामुळे रवीन्द्रनाथ ठाकुर आणि नरेन्द्रनाथांची मैत्री झाली आणि ठाकुरांच्या घरी नरेन्द्रनाथांचं जाणं-येणं सुरू झालं. रवीन्द्रनाथांच्या काव्याला ते चाली लावून गात आणि रवीन्द्रनाथ त्यांच्या गायनाला दाद देत. कधी कधी नरेन्द्रनाथ रामकृष्ण परमहंसांनादेखील रवीन्द्रनाथांच्या रचना ऐकवीत.

पुढे नरेन्द्रनाथांनी संन्यास घेतला. स्वामी विवेकानन्द असे नाव धारण केले. सर्व धर्म परिषदेसाठी अमेरिकेला गेले. त्यांचे शिकागोमधील भाषण गाजले. अमेरिकेतील भाषणांची सुरुवात ते संस्कृत श्लोक गायनाने करीत आणि भाषा कळत नसतानाही अमेरिकन श्रोते त्यांच्या श्लोकगायनाने मंत्रमुग्ध होत. स्वामीजींचा पाश्चात्य संगीतावर पण अभ्यास होता. अमेरिकेहून परत आल्यावर भारतात भ्रमण करताना स्वामीजींचे वास्तव्य उत्तर प्रदेशातील बरेली येथे होते. योगायोगाने त्याच वेळी ग्वाल्हेर घराण्याचे नामवंत गायक रामकृष्णबुवा वझे ही तेथे होते. दोघांच्या १५ दिवस संगीतावर तासनतास चर्चा झाल्या. स्वामीजींनी आपली मौलिक मते बुवांना सांगितली. तसेच त्यांना काही दोहे दिले. महाराष्ट्रात स्वामीजींचे वास्तव्य असताना गोवा मुक्कामी स्वामीजींनी लयभास्कर खाप्रुमामा पर्वतकर यांनी काही अवघड ताल शिकविले. पुढे अध्यात्माला वाहिल्यामुळे त्यांच्या गायनाचा फार बोलबाला झाला नाही. पण संगीत क्षेत्रातील स्वामीजींची योग्यता असामान्य आहे.

**– श्री. अद्वैत धर्माधिकारी**

**तुम्ही आपल्या सत्कर्मांच्याद्वारे भगवंताचीच पूजा करत असता. कोणत्याही कर्माला वा कर्तव्याला क्षुद्र लेखू नका.**

## स्वामी विवेकानंद आणि बंकिमचंद्राचे 'आनंदमठ'

'**व**न्दे मातरम्' हा राष्ट्रमंत्र लिहिणारे बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांचे हे १७५ वे जन्मवर्ष; तर स्वामी विवेकानंदांचे हे १५० वे जन्मवर्ष. बंकिमचंद्रांनी साऱ्या देशातील जनतेला, आपल्या देशाला मातेच्या स्वरूपात पाहण्याचा मंत्र दिला. स्वामीजींनीही अशीच शिकवण देशाला दिली. बंकिमचंद्रांचा काळ हा बंगाली साहित्यातील प्रबोधनकाळ मानला जातो. स्वामी विवेकानंदांचे गुरू श्री रामकृष्ण परमहंस हे बंकिमचंद्रांचे समकालीन. १८८४ मध्ये आधारचंद्र सेन यांच्या निवासस्थानी त्या दोघांची भेट झाली होती. त्यावेळी रामकृष्णांनी त्यांना थट्टेच्या स्वरात विचारले, ''तुम्हाला बंकिम कुणी बनवले ?''

बंगाली भाषेमध्ये बंकिम या शब्दाचा अर्थ वाकडा असाही होतो. त्यावर बंकिमचंद्र हसून म्हणाले, ''ब्रिटिशांच्या बुटाच्या ठोकरीने.'' त्या चेष्टेच्या सुरांमध्येसुद्धा इंग्रजांबद्दलचा आणि परकीय सत्तेबद्दलचा राग व्यक्त होत होता. या मुलाखतीनंतर बंकिमचंद्रांनी श्री रामकृष्णांना पुन्हा भेटीचे आमंत्रण दिले; पण स्वत: जाऊ न शकल्यामुळे त्यांनी स्वामी विवेकानंद आणि इतर काही शिष्यांना त्यांच्याकडे पाठवले होते. बंकिमचंद्रांच्या अनेक कादंबऱ्या रामकृष्णांच्या समोर वाचल्या गेल्या होत्या. तरुण नरेंद्राला 'वन्दे मातरम्' काव्य निश्चितच माहिती असावे. पुढे शिकागो येथील धर्मपरिषदेतल्या भाषणामुळे जगप्रसिद्ध झालेल्या स्वामी विवेकानंदांच्या देशविदेशांतल्या अनेक भाषणांवर प्रत्यक्ष 'वन्दे मातरम्' या काव्याचा प्रभाव दिसतो. देशातील जनतेमध्ये स्वातंत्र्याची चळवळ उभी करण्यासाठी संघटन आणि वैचारिक क्रांती होणे आवश्यक आहे, हे स्वामी विवेकानंद जाणून होते. 'वन्दे मातरम्' हे गीत 'आनंदमठ' या कादंबरीमध्ये, मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करून युद्धासाठी तयार झालेल्या संन्याशांच्या मुखी आहे. 'आनंदमठ' कादंबरीतील भवानंद हा संन्यासी म्हणतो, 'आम्ही लोक दुसरी माता जाणत नाही. आमचं म्हणणं असं, की जन्मभूमी हीच जननी. आम्हाला आहे ती फक्त सुजला सुफला मलयजसमितरण शितला सश्य शामला भारत माता.' इ. स. १८९७ मध्ये स्वामीजींनी लोकांना सांगितले होते. पुढची ५० वर्षे तरी भारतमाता हीच तुम्ही आपली देवता माना. जशी तुम्ही देवाची सेवा करता, तशीच तुम्ही देशाची करा. मग भारत जागृत होईल.

'स्वदेश आणि स्वधर्मसंरक्षणासाठी बलिदान करण्यासाठी तयार व्हा', असे म्हणणारे स्वामी विवेकानंद म्हणतात, ''संन्यासी आपल्या धर्माचे रक्षण करतात. ते देशाचे सैनिक आहेत. पाहा... प्रदीर्घ अशी रात्र संपून उष:काल होतो आहे. आमचा भारत देश निद्रेतून जागा होतोय. त्याला कोण अडवणार ? आता तो पुन्हा झोपेमध्ये जाणार नाही. भारतमातेच्या स्वरूपात प्रत्यक्ष महाकालीच जागृत होते आहे.'' 'वन्दे मातरम्'मध्ये महाकाली दुर्गेला बंकिमचंद्रांनी पाहिले, तोच अनुभव स्वामी विवेकानंदांनी या आपल्या शब्दांमध्ये सांगितला आहे. स्वामीजींनी आपल्या भाषणामध्ये किंवा लेखनामध्ये 'वन्दे मातरम्' हे शब्द किंवा 'आनंदमठ'चा प्रत्यक्ष उल्लेख केला नसला, तरीही त्यांच्या भाषणांमध्ये वरील आशयाचे उतारे आले आहेत. हृदयात स्वामी विवेकानंदांचा उपदेश आणि 'वन्दे मातरम्' हे शब्द उच्चारत क्रांतिकारकांनी क्रांतिकार्यात स्वत:ला झोकून दिले.

**– श्री. मिलिंद सबनीस**

**मनुष्याची श्रेष्ठता त्याचे कर्म कोणते आहे यावरून ठरविता कामा नये,**
**तर तो आपली कर्मे कशा रीतीने पार पाडतो यावरूनच त्याची श्रेष्ठता ठरविली पाहिजे.**

## 'रेझांग ला'ची लढाई

**आ**ज अशा एका अद्वितीय घटनेला बरोबर ५० वर्षे पूर्ण होत आहेत जिला गेल्या संपूर्ण शतकात क्वचितच जोड सापडेल. ती म्हणजे 'रेझांग ला'ची लढाई.

भारत-चीन युद्धाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या युद्धात भारताला लाजिरवाण्या पराभवाला तोंड द्यावे लागले. प्रचंड प्रदेश गमवावा लागला, हजारो जवान शहीद झाले, पण पराभवाची मोठी नामुष्की पदरी आली.

पण एका पराभवापुरतेच हे थांबले नाही. या पराभवाचे अतिशय गंभीर परिणाम झाले आणि त्यातील महत्त्वाचा परिणाम होता तो हा की भारतीय लोक स्वत:ला चिनी लोकांपेक्षा कमी समजू लागले. एक प्रकारचा न्यूनगंड संपूर्ण भारतीय समाजामध्ये अतिशय दृढमूल झाला की चीन सर्वच बाबतीत आपल्याला सरस आहे. उद्योग, व्यापार, सैनिकी सामर्थ्य, क्रीडा नैपुण्य यापैकी कोणत्याच क्षेत्रात भारत, चीनच्या पुढे टिकाव धरू शकणार नाही.

या पराभवाच्या स्मृतीने भारतीय मनाला जेवढ्या वेदना होतात, तेवढा आनंद अगदी १९७१ च्या पाकिस्तानवरील अतिशय देदिप्यमान अशा विजयाच्या आठवणीनेसुद्धा होत नाही. एक प्रकारे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये आपण चीनपुढे कच खायला लागलो आहोत. ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. चिनी सेना NEFA (सध्याचा अरुणाचल प्रदेश)मध्ये घुसली आणि कमकुवत, भोळसट नेतृत्व असलेली, युद्धासाठी बिल्कुल सज्ज नसलेली भारतीय सेना हवालदिल झाली. तिला पळता भुई थोडी झाली. केमेंग-ठाग ला, नामकाचू, तावांग, दिरांग झोंग, त्से ला, बोमदि ला अशी सर्व ठाणी चीनच्या हातात पडत गेली.

युद्धाच्या तयारीमध्ये झालेली हलगर्जी, नेतृत्वामध्ये असलेल्या खंबीरतेचा, एकसूत्रीपणाचा अभाव, धरसोड वृत्ती, सैनिकी निर्णयांमध्ये राजकीय हस्तक्षेप अशी अनेक कारणे या पराभवाला होती. त्यामुळे भारतीय सैन्याची पळापळ झाली. फार मोठा मानहानीकारक पराभव झाला ज्याची चिकित्सा अजूनही चालू आहे.

हा असा अर्धवट, कचखाऊ असा इतिहासच जर आपल्यापुढे मांडला गेला तर त्याचे परिणाम संपूर्ण राष्ट्रावर कसे भयानक होतात याचे चिनी आक्रमणाचे भारतावरील परिणाम हे अत्यंत उत्कृष्ट उदाहरण आहे.

वर चिनी आक्रमणाबाबत सांगितलेला इतिहास हा भारत-चीन संग्रामामधला अर्धाच भाग आहे, की जो आपल्याला सतत सांगितला जातो, ठसविला जातो पण याच संग्रामामधला दुसरा प्रखर तेजस्वी पण दुर्लक्षित असा ही एक भाग आहे जो आपण माहिती करून घेतला पाहिजे.

चीनने ऑक्टोबर १९६२ मध्ये जसे ईशान्येकडील अरुणाचल प्रदेशावर आक्रमण केले, तसेच आक्रमण भारताच्या उत्तरेकडील लडाखवरही नोव्हेंबर १९६२ मध्ये केले. पण येथे त्यांना वेगळा अनुभव आला. येथे त्यांना भारतीय सेनेकडून जबरदस्त प्रतिकार झाला. येथील भारतीय लष्करी नेतृत्व अतिशय खंबीर होते, प्रेरणादायी होते, आणि त्यामुळे लडाखमध्ये घनघोर लढाया झाल्या. त्यामधील सर्वात महत्त्वाची म्हणजे रेझांग लाची लढाई.

'ला' म्हणजे खिंड. रेझांग खिंडीच्या परिसरात

**मृत्यू येईपर्यंत कार्य करीत राहा. मृत्यूला कवटाळावे लागले तरी कार्य सोडू नका.**

झालेली ही लढाई सामरिकदृष्ट्या फार महत्त्वाची होती. जवळच 'चुशुल' या गावी विमानतळ आहे. भारतीय रसद पुरवठ्यासाठी त्याचे महत्त्व फार मोठे होते. या रेझांग खिंडीचे संरक्षण करण्याची जबाबदारी १३ कुमाऊँ या बटालियनकडे दिलेली होती.

१८००० फूट उंचीवरील या खिंडीवर चिनी सैन्याने १८ नोव्हेंबरला चढाई केली. तेव्हा तापमान होते -२४$^0$C ! चिनी सैनिकांच्या लाटांवर लाटा पुढे सरकू लागल्या. चिनी फौज होती ५ ते ६ हजारांच्या दरम्यान तर त्यांना तोंड देण्यासाठी सज्ज असलेल्या १३ कुमाऊँच्या चार्ली (C) कंपनीमध्ये जवान होते फक्त १२०. होय. ५/६ हजार विरुद्ध १२० असा हा विषम लढा होता. भारतीय सैनिकांची तुकडी खिंडीच्या बाजूच्या ज्या पर्वतरांगेवर उभी होती त्या जागेच्या मागे प्रचंड मोठा कडा होता व त्या कड्याच्या मागे आपले तोफदळ होते. पण मध्ये असलेल्या कड्याच्या उंचीमुळे ते आपल्या जवानांना संरक्षण देऊ शकत नव्हते. चिनी तोफदळ मात्र त्यांच्या पायदळाला संरक्षण देत आपल्या सैनिकांवर सतत तोफांचा भडिमार करत होते.




या १३ कुमाऊँच्या चार्ली कंपनीचे प्रमुख होते मेजर शैतानसिंग आणि त्यांच्या अधिपत्याखाली लढणारे जवान होते, दिल्लीजवळच्या हरयाना प्रांतातील रेवडी जिल्ह्यातील यादव, ज्यांना अहिर म्हणतात. ही सर्व यादव मंडळी एकाच प्रदेशातील, एकमेकांचे मित्र, नातेवाईक वा शेजारी असलेली व स्वत:ला भगवान श्रीकृष्णाच्या यादव कुळातील मानणारी, भगवान श्रीकृष्णावर अपार श्रद्धा असलेली !

आक्रमणाला सुरुवात झाली तेव्हा चार्ली कंपनीला आदेश मिळाले, अखेरपर्यंत खिंड लढवण्याचे. परिस्थितीचे गांभीर्य प्रत्येकालाच माहीत होते. शत्रू संख्येने भारी आहे, हेही सगळ्यांना माहीत होते. म्हणून मेजर शैतानसिंगांनी सर्वांना विचारले 'कोणाला परत जायचे आहे ? ज्यांना जायचे असेल त्यांनी आत्ताच जावे, नंतर कोणी जाऊ शकणार नाही, मरेपर्यंत मारत मारत आपल्याला झुंजायचे आहे.' एकही जण मागे फिरला नाही. शेवटच्या जवानापर्यंत व बंदुकीतील शेवटच्या गोळीपर्यंत लढण्याचा निश्चय प्रत्येकाने केला.

चिनी सैन्य पुढे सरकू लागताच चार्ली कंपनीने त्यांच्यावर लाईट मशीनगनने (LMG) जबरदस्त हल्ला चढवला. मोठी हानी झाल्यामुळे चिनी सैन्याला माघार घ्यावी लागली. एकापाठोपाठ एक असे चार हल्ले भारतीय तुकडीने परतवले पण भारतीय सैन्याची सुद्धा मोठी हानी होत होती. चिनी तोफदळाच्या माऱ्यामुळे अनेक जण जखमी झाले, अनेकजण मृत्युमुखी पडले. त्यामुळे चिनी सैन्य पुन्हा चाल करून आले.

आता शत्रू फारच जवळ आला आहे हे बघून LMG चालक हवालदार निहालसिंगांनी LMG स्वत:च सुटी केली व चिन्यांच्या हातात ती पडू नये म्हणून तिचे सुटे भाग वेगवेगळ्या बाजूंना फेकून दिले.

**एखाद्या विषयासक्त किड्याप्रमाणे मरण्यापेक्षा सत्याचा प्रचार करीत करीत**
**कर्तव्याच्या रणभूमीवर मृत्यूला आलिंगन देणे कितीतरी चांगले ! पुढे चला ! पुढे जात रहा !**

निहालसिंग स्वत: जबर जखमी झाले. मेजर शैतानसिंगसुद्धा याच काळात गंभीर रीतीने जखमी झाले. त्यांचे दळणवळण साहाय्यक (Radio Man) रामचंद्र यादव हेही जखमी झाले. त्यांचा रेडिओ संपर्क तुटला.

शत्रू आपल्या ठाण्यापर्यंत येऊन पोचला. कोणत्याही परिस्थितीत मेजरसाहेब शत्रूच्या हातात सापडू नयेत म्हणून स्वत:च्या जखमांची पर्वा न करता रामचंद्र यादवने स्वत:च्या रायफलचा पट्टा सोडवला व मेजर शैतानसिंगांचे शरीर स्वत:ला बांधून घेतले. मेजरसाहेब वाचण्याची शक्यता अजिबात नव्हती पण ते शत्रूच्या हाती पडू नयेत म्हणून त्यांना घेऊन घसरत घसरत ५०० यार्ड लांब एका मोठ्या दगडाआड आणून लपवून ठेवले. मग मेजरसाहेबांनी या लढाईची कहाणी सांगण्यासाठी मुख्य ठाण्याला जायला रामचंद्र यादवांना सांगितले व स्वत: प्राण सोडले.

इकडे प्रत्यक्ष खिंडीत हातघाईची घमासान लढाई सुरू झाली. ठाणे ताब्यात घ्यायला आलेल्या चिनी सैनिकांवर भारतीय जवानांनी बंदुकीच्या संगिनींनी हल्ला चढवला. संगिनी चिन्यांच्या पोटात खुपसून मारायला सुरुवात केली. पण थंडीच्यापासून बचाव करण्यासाठी चिन्यांनी घातलेल्या जाड कोटांमधून संगिनी आत घुसेनात. ते बघून पहिलवान नाईक सिंग राम चवताळला. त्याने चिनी सैनिकांना हाताने धरून त्यांची डोकी एकमेकांवर आपटून मारायला सुरुवात केली. अनेकांना त्याने मोठ्या खडकावर आपटून मारले.

अखेर ५ तासाच्या घमासान युद्धानंतर भारतीय प्रतिकार थंडावला. १२० जणांच्या तुकडीतले ११४ जण मृत्युमुखी पडले. ५ जण जखमी अवस्थेत चिनी सैन्याच्या तावडीत सापडले व फक्त १ जण म्हणजे रामचंद्र यादव ही कहाणी सांगायला मुख्य ठाण्यापर्यंत पोहोचले. याउलट चिनी सैन्याची हानी मात्र कितीतरी पट झाली. बाजारात फळांचा सडा पडावा तसा चिनी सैनिकांच्या प्रेतांचा सडा पडला होता. सुमारे १४०० सैनिक मरण पावले होते. १२० जवानांनी १४०० चिन्यांना कंठस्नान घातले. जखमी किती झाले याची गणनाच नाही.

पण चिनी सैन्याची प्रचंड दहशत बसलेल्या दिल्लीतल्या अधिकाऱ्यांना रामचंद्र यादवांनी सांगितलेली ही हकीकत पटेच ना ! खोटे बोलल्याबद्दल व पळून आल्याबद्दल त्यांच्यावरच खटला (Court Marshall) भरण्याची धमकी त्यांना देण्यात आली. रेवडी भागातले गावकरीसुद्धा त्यांना 'भगोडा' म्हणजे पळपुटा समजू लागले. कारण त्या भागातला प्रत्येक सैनिक शहीद झाला होता मग हाच कसा वाचला असे ते त्यांना विचारायचे. खरेच होते ते. रेवडी भागातल्या प्रत्येक घरातले कोणीतरी नातेवाईक युद्धात शहीद झाले होते वा जखमी झाले होते वा चिन्यांच्या अटकेत पडले होते पण कोणीच पळून आले नव्हते. एका घरातील तर दोन सख्खे भाऊ व त्यांच्या बहिणीचा नवरा असे तिघेजण देशार्पण झाले होते.

१३ कुमाऊँच्या जवानांचे बलिदान फुकट गेले नाही. भारतीय सैन्याच्या तिखट प्रतिकाराचा जो चटका चिनी सैन्याला बसला, त्यामुळे आगेकूच करून संपूर्ण लडाख ताब्यात घेण्याची योजना त्यांना गुंडाळून ठेवावी लागली. विजय मिळाला तरी त्यांची प्रचंड हानी झाली होती. एका भारतीयाच्या बदल्यात त्यांना दहा चिनी सैनिकांचे मोल मोजायला लागले होते. मिळालेला विजय पदरात पाडून त्यांनी एकतर्फी युद्धविरामाची घोषणा करून टाकली. रेझांग ला च्या लढाईमुळे चुशुल वाचले, लडाखचा बहुतांश भाग

**मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करा. दुसऱ्यासाठी एकोप्याने काम करण्यास शिका.**
**आपल्या देशाला याचीच मोठी आवश्यकता आहे.**

वाचला.

रामचंद्र यादव यांचा वृत्तांत पडताळून पाहण्यासाठी युद्धविरामानंतर सुमारे तीन महिन्यांनी आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस व भारतीय सैन्याने या भागाची पाहणी केली. त्यांना काय आढळले ? त्यांना दिसले की कडाक्याच्या थंडीमुळे तीन महिन्यानंतरसुद्धा, युद्धविरामाच्या वेळी सैनिकांचे देह ज्या अवस्थेत होते ते तसेच्या तसे होते. मृत्युमुखी पडलेल्या कोणाही भारतीय सैनिकाकडे बंदुकीची एकही गोळी शिल्लक नव्हती. अनेक भारतीय सैनिकांच्या प्रेताच्या हातात फेकण्यासाठी उगारलेला हातबॉम्ब जसाच्या तसा होता. कोणी शत्रूच्या पोटात संगीन खुपसण्याच्या आवेशात होते तर कित्येकांनी मरतानासुद्धा शत्रूवर रोखलेली बंदूक घट्ट धरून ठेवलेली होती. मेजर शैतानसिंगांचा देहसुद्धा खडकाआड दडवून ठेवलेला जसाच्या तसा होता.

आणखी एक गोष्ट होती. भारतीय सैनिकांच्या पराक्रमामुळे स्तिमित झालेल्या चिनी सैनिकांनी एक बंदूक जमिनीत उलटी खुपसून त्यावर एक हेल्मेट घातले होते व भारतीय सैनिकांना अभिवादन करणारी चिठ्ठी त्या बंदुकीला लावून ठेवली होती. प्रत्यक्ष शत्रूनेसुद्धा भारतीय सैनिकांना हा सर्वोच्च सन्मान दिला होता ! कोणाही भारतीय सैनिकाच्या देहात पाठीमागून गोळी घुसलेली नव्हती. सर्वजण शत्रूचा सामना करतच मृत्युमुखी पडले होते. हे दृष्य पाहून कसलेले योद्धे असलेले ब्रिगेडिअर रैना जे पुढे भारतीय सेनाप्रमुख झाले, त्यांना सुद्धा अश्रू अनावर झाले. या एका तुकडीला १ परमवीरचक्र, ४ वीरचक्रे व ४ सेनापदके देऊन गौरवण्यात आले. असा सन्मान क्वचितच कोणा तुकडीला मिळाला असेल. या चीनच्या युद्धानंतर लता मंगेशकरांनी जे अमर गीत गायले, 'ए मेरे वतनके लोगों - त्यातील 'दस दस को एकने मारा...' हा भाग रेझांग ला उद्देशून आहे. हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एकमेव खराखुरा युद्धपट याच लढाईवर आधारित आहे.


रेवडी गावातील
रेझांग ला वीरांचे स्मारक

पराभवातून धडा शिकण्यासाठी पराभवाची कारणे शोधलीच पाहिजेत, पराभवाच्या कारणांची चिकित्साही झाली पाहिजे पण पुन्हा पराभव होऊ नये म्हणून प्रेरक असा इतिहासही पुढच्या पिढीला सांगितला गेला पाहिजे, ज्यातून प्रेरणा घेऊन नवे तरुण नौजवान मायभूमीच्या सेवेला सज्ज होतील.

पण आपण या वीरांची स्मृती काय ठेवतो ? ज्या वीरांचा शत्रूनेदेखील सन्मान केला, त्या वीरांचे जे छोटेसे स्मारक रेवडी भागात उभारले गेले आहे, त्याची दुर्दशा झालेली आहे. तिथे कचऱ्याचे ढीग पडलेले असतात. प्रत्यक्ष ज्या गावांमधले हे वीर होते तेथेच ही त्यांची उपेक्षा तर लांबपर्यंत कोण त्यांना लक्षात ठेवणार ? 'नाही चिरा नाही पणती' अशी त्यांची अवस्था आपण किती काळ ठेवणार ? या वीरांचे हे बलिदान, ज्याने पुढील इतिहास बदलला त्याचे स्मरण आपण जपणार की नाही ? याला होकारार्थी उत्तर मिळेल का ? काळच ठरवेल !!

**- श्री. प्रफुल्ल कुलकर्णी**
**(इंडियन एक्स्प्रेसमधील श्री. शेखर गुप्ता यांच्या लेखांवर आधारित)**

**तरुणांनो ! गरीब, अज्ञानी आणि दलित यांच्याविषयीच्या सहानुभूतीचा आणि त्यांच्या उन्नतीसाठी सतत कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांचा वारसा मी तुम्हाला देत आहे.**

## आवाहन मदतीचे

वर्धिनीचे उद्दिष्ट ''विकसित व्हावे-अर्पित होऊन जावे'' हे आहे. त्यामुळे देशाच्या विविध समस्यांमध्ये त्यांचा अभ्यास करून कृती करणे हे काम वर्धिनीतील युवक युवती करत आहेतच. विवेकानंदांच्या प्रेरणादायी कथांमधून आपण आपला पैसा समाजहितासाठी वापरला पाहिजे. हीच त्यांची शिकवण होती. स्वत: स्वामीजींनी प्लेग व दुष्काळात आपल्या गुरुबंधूंना सांगितले, ''धनिकांनी त्यांची संपत्ती या कार्यासाठी दिली तर ठीकच, अन्यथा आपण संन्यासी आहोत, आपण झाडाखाली झोपू शकतो आणि भिक्षा मागून जगू शकतो. जर लाखो लोकांचे जीव वाचणार असतील तर मठाची ही जमीन विकून टाकायचीही माझी तयारी आहे.'' खरोखरच स्वामीजींमध्ये प्रखर देशभक्ती व देशवासीयांप्रती कळकळ होती. वर्धिनीतील युवकांनी स्वामीजींच्या 'सार्ध शती'प्रित्यर्थ विविध उपक्रम करण्याचे ठरविले आहेत.

यावर्षी या अंकात विविध कामांचा वृत्तांत आपण वाचालच आणि त्यासंबंधी आपले विचारही आम्हाला कळवा. अर्थात हे सर्व करण्यासाठी लागणाऱ्या अर्थाबद्दल खालील माहिती आपणास देत आहोत -

| वर्ष | एकूण खर्च रु. |
|---|---|
| २०११-१२ | ५०,३७,२२६ |
| मूळ उद्देशावर केलेला खर्च रु. | ४४,६८,७६० |
| मूळ उद्देशावर केलेल्या खर्चाची टक्केवारी | ८८.७१ % |
| पुढील वर्षासाठी अपेक्षित खर्च रु. | ५२,५०,०००/- |

मागील वर्षी 'स्व'-रूपवर्धिनीच्या सर्व देणगीदार, हितसंबंधी तसेच वर्धकांच्या मदतीतून खर्चाएवढाच निधी जमा झाला. आता दरवर्षी वर्धिनीच्या शाखा व प्रकल्पांच्या विस्तारत्या कक्षांमुळे मूळ उद्देशावरील खर्चही वाढत आहे. महागाईमुळे खर्चात होणारी वाढ अटळच आहे. परंतु वर्धक, युवक तसेच सुहृद यांच्या प्रयत्नांतून नवीन तंत्रज्ञानाचा वापर, कल्पकता, तसेच काटकसर यामुळे वायफळ खर्च टाळला जात आहे. यासाठी सर्व विश्वस्त व मूलाधार गटाचे सदस्य कसोशीचे प्रयत्न करत असतात. मूळ उद्देशाला धरून चाललेल्या या कामाला आपण सर्व सढळ हाताने सहाय्य करत आहात, असेच यापुढेही करत राहाल याबाबत शंका नाही.

१. आपल्या माहितीतील दानशूर व्यक्तींची नावे वर्धिनीला ई-मेल, पत्र, फोन अथवा प्रत्यक्ष भेटून देऊ शकाल का ?

२. जेथे शक्य असेल तेथे वर्धिनीचे साहित्य वाचायला देऊन त्यांची वर्धिनीच्या वास्तूस अथवा जवळच्या शाखेस भेट घडविणे.

३. समारंभ अथवा स्मृतीदिनानिमित्त वर्धिनीमध्ये पूरक आहार, लहान मुलांसाठीच्या क्रीडा साहित्या-साठी आर्थिक वा वस्तूरूप मदत

४. वर्धिनीच्या शिबिरांमध्ये धान्य, साहित्य, प्रवास खर्च यासारखे खर्च वैयक्तिक अथवा संस्थांच्या सहाय्याने मिळवून देणे.

यासारख्या विविध उपक्रमांमध्ये तन-मन-धन पूर्वक आपण मदत करू शकाल व वर्धिनीचे व आपले संबंध अजून दृढ होवोत ही अपेक्षा.

**जे गरीब आहेत, जे दलित आहेत, जे खालच्या जातीचे आहेत,**
**ज्यांच्यावर भगवंताचे सर्वाहून अधिक प्रेम आहे त्यांच्यासाठी महान बलिदान करा, आपल्या संपूर्ण जीवनाचे बलिदान करा.**

## आठवणी दाटतात

वर्षभरामध्ये वर्धिनीशी संबंधित काही कुटुंबांमध्ये व्यक्तिवियोगाच्या दु:खद घटना घडल्या. या कालावधीत खालील व्यक्तींचे देहावसान झाले.

- 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना श्रद्धांजली' हे शब्द लिहिताना मनाला तीव्र वेदना होत आहेत. प्रखर देशभक्ती, शिवप्रभूंवरील असीम निष्ठा, संपूर्ण देशात शिवशाही अवतरावी ही मनिषा बाळगणारे नेतृत्व, मार्मिक, निर्भीड पत्रकार व व्यंगचित्रकार, अजातशत्रु आणि सर्वसामान्यांवर अलोट प्रेम करणारा नेता ही स्वर्गीय बाळासाहेबांची प्रेरणादायी वैशिष्ट्ये.
- ज्येष्ठ गाणपत्य व श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टचे आधारवड श्री. तात्यासाहेब ऊर्फ प्रतापराव गोडसे यांचे दु:खद निधन झाले.
- 'स्व'-रूपवर्धिनीचे सन्माननीय सभासद उद्योजक श्री. अविनाश वाडदेकर यांचे निधन झाले.
- श्वेतक्रांतीचे जनक डॉ. वर्गिस कुरियन यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.
- रा. स्व. संघाचे निवृत्त सरसंघचालक कुप. सी. सुदर्शनजी यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. कार्यकर्त्यांना आणि वर्धकांना त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले होते.
- वर्धिनीचे संस्थापक सदस्य कै. दि. दा. जोशी यांची कन्या सौ. उज्ज्वला दिक्षित (दीदी) यांचे आजारपणामुळे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीच्या बालवाडीच्या माजी मुख्याध्यापिका स्वातीताई कारेकर यांचे पती कै. श्री. मंगेश कारेकर यांचे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या सौ. मंजुषाताई कुलकर्णी यांचे सासरे श्री. विष्णुपंत दत्तात्रय कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.
- कसबा भागातील संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. अतुल अग्निहोत्री यांच्या मातोश्री सौ. अनुपमा अशोक अग्निहोत्री यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
- वर्धिनीचे देणगीदार, हितचिंतक व साहाय्यकर्ते श्री. नाना वझे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
- वर्धिनीच्या स्वामी अभेदानंद शाखेचा कार्यकर्ता विजय धोत्रे याच्या मातोश्रींचे निधन झाले.



- धनकवडी शाखेतील वर्धकाचे काका श्री. विभूते यांचे अपघातामध्ये निधन झाले.
- वर्धिनीचे धनकवडी भागातील कार्यकर्ते श्री. मनीष रासने यांचे वडील श्री. प्रताप रासने यांचे निधन झाले.



**जो जितका जास्त निस्वार्थ, तितका तो अधिक धार्मिक व शिवाच्या अधिक निकट असतो.**

- वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. दीपक व श्री. महेश धामापूरकर यांच्या मातोश्री सौ. कमल शंकर धामापूरकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
- वर्धिनीच्या देणगीदार श्रीमती कलिकाताई पटवर्धन यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.
- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक श्री. नाना जोशी यांचे निधन झाले.
- स्वामी अभेदानंद शाखेतील पालक व भारतीय मजदूर संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. शाम सुरत्राण यांचे निधन झाले.
- स्वामी दयानंद सरस्वती शाखेचा युवक अभिजित शिंदे याची आई सौ. अनघा आबासाहेब शिंदे यांचे निधन झाले.
- स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रशिक्षक व माजी विद्यार्थी डॉ. शिवाजी जगताप (नायब तहसिलदार) यांच्या मातोश्रींचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

## भावांजली कविवर्य ग्रेस यांना



**'माझी कविता हे एक बेट'** असे म्हणणारे ज्येष्ठ कवी माणिक सीताराम गोडघोटे ऊर्फ कवी ग्रेस यांचे दिनांक २६ मार्च २०१२ रोजी कर्करोगासारख्या दुर्धर आजाराने निधन झाले. आपल्या प्रतिभाशाली कवितांनी मराठी साहित्य समृद्ध करणारे कवी ग्रेस यांच्या जाण्याने मराठी साहित्याचे खूप मोठे नुकसान झाले असे म्हणावे लागेल.

मोठ्या माणसांना लांबूनच पहावे. जवळ गेले तर भ्रमनिरास होतो. कारण बाहेरचा माणूस आणि आतला माणूस वेगळा असतो. आपण बाहेरची छबी मनात ठेवून आतल्या माणसाला भेटतो अन् बरेचदा निराश होतो. कवी ग्रेस यांच्याबद्दल असे कधीच झाले नाही. कारण की त्यांचे अंर्तबाह्य दोन्ही छबी एकच होत्या. ते म्हणत, ''मला खोटे वागता येत नाही. दोन चेहरे नाहीत. दोन वाणी नाही. माझा सभ्यपणा हा ग्रांथिक संस्कारांचा नाही. जीव लावा असा प्रचार मी करत नाही. आय ॲम ए डिस्प्लेअर ऑफ माय सब्जेक्ट. आय ॲम नॉट अ टीचर ऑफ माय सब्जेक्ट.''

**पाठशिवणीचा खेळ, पोटशिवणीच्यासाठी**
**थोडे रडू येता येता, मृत्यू हसू लागे ओठी**
**आता तक्रारच नाही, तुम्ही शांतपणे जगा**
**पण देठ तोडतांना ठेवा, फुलांसाठी जागा !**

**वरील सर्व कुटुंबियांच्या दुःखात 'स्व'-रूपवर्धिनी सहभागी आहे.**

गरीब, दुर्बल व रोगी यांच्यामध्ये ज्याला शिव दिसतो तो शिवाचा खरा उपासक.

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागप्रमुख- श्री. चेतन पैलवान ✆ : ९८८१२३०३०२**

## भाग १ (शहर विभाग)

**भागप्रमुख : श्री. प्रसाद गाडे ✆ : ९७६५१९९१८१**

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | **समर्थ रामकृष्ण शाखा** | बाबुराव सणस कन्याशाळा, २२/१, मंगळवार पेठ, पुणे - ४११ ०११. | **श्री. सिराज शेख** ✆ : ९६२३१६३८०५ |
| ॐ | **स्वामी योगानंद शाखा** | नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३० | **श्री. अमोल कुसुरकर** ✆ : ९६६५५७२१८३ |
| ॐ | **स्वामी श्रद्धानंद शाखा** | म. गांधी विद्यालय घोरपडे पेठ, पुणे - ४११ ०४२ | **श्री. शुभम जगताप** ✆ : ९५९५२१२६४४ |
| ॐ | **वीर अभिमन्यू बालशाखा** | 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११ | **श्री. रोहित धायरकर** ✆ : ८३७८८३६६०८ |

## भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भागप्रमुख : श्री. राहुल जगताप ✆ : ९९२२१८३८९८**

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | **स्वामी अखंडानंद शाखा** | कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७ | **श्री. अतुल बिबवे** ✆ : ८३७८०२४८८२ |
| ॐ | **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** | विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर, पुणे - ४११ ०३७ | **श्री.अनिकेत शिंदे** ✆ : ९६३७५३१०५४ |
| ॐ | **स्वामी शिवानंद शाखा** | कै. वि. स. खांडेकर शाळा सहकारनगर, पुणे-४११ ००९. | **श्री. सुमीत पाटील** ✆ : ८४४६१३४१७१ |
| ॐ | **धर्मवीर शंभू राजे शाखा** | प्रेरणा माध्यमिक विद्यालय, गणेश चौक, आंबेगाव पठार पुणे ४११ ०४६ | **श्री. विशाल शिंदे** ✆ : ९५२७५१९२४७ |

**उठा, जागे व्हा आणि आपल्या ह्या भारतमातेला तिच्या त्या शाश्वत सिंहासनावर पुन: विराजमान झालेली पहा.**

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. धनंजय डोबे, ✆ : ९७६७७२३३२२**

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी सुबोधानंद शाखा | पंडित दिनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे - ४११ ०५२ | श्री. सागर गायकवाड ✆ : ९६०४६४१८५६ |
| ॐ | स्वामी ब्रह्मानंद शाखा | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१ | श्री. गुरुप्रसाद मुळे ✆ : ९९७००९०६२२ |
| ॐ | राजर्षी शाहू शाखा | सरस्वती विद्यामंदिर, कमिन्स कॉलेज जवळ, शाहू कॉलनी, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२ | श्री. अशोक इंगवले ✆ : ९८८१५५८१८० |
| ॐ | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | कै. बंडुजी खंडुजी चव्हाण विद्यालय, धायरेश्वर मंदिराजवळ, धायरी, पुणे. | श्री. प्रतिक परमार ✆ : ९५९५५१४३४६ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. दत्ता शेडगे ✆ : ९८२३५२१०७३**

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी विवेकानंद शाखा | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-४११ ०१६ | श्री. अभिजित दोडके ✆ : ८०८७५८८५९४ |
| ॐ | स्वामी अभेदानंद शाखा | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - ४११ ०१६ | श्री. विपुल शेलार ✆ : ९७६४०४७६९० |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : कु. लीना हायगुंडे ✆ : ९९६०१७९५६४**

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | भगिनी निवेदिता शाखा | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ४११ ०११ | कु. नूतन यद्रे ✆ : ९९७००४३१७७ |
| ॐ | भवानी पेठ मुलींची शाखा | लहुजी वस्ताद शाळा, जन. अरुणकुमार वैद्य स्टेडियमजवळ, भवानी पेठ, पुणे - ४११ ०१६ | कु. प्रियांका बारणे ✆ : ८०८७३०२९७४ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६ ते ८.३०, शनिवार- दु. ४.३० ते ७.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

**तुम्ही जर क्षमा कराल आणि विसरून जाल तर सारे काही तिथेच समाप्त होऊन जाईल.**

## शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

महिला विभाग सहाय्यक – **सौ. संगीतताई शेडगे** ✆ : ८१४९४३०२५५

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. मृदुलाताई सफई** ✆ : ०२०-२६१२१७०४

बचतगट समन्वयक – **सौ. मालनताई वाकडे** ✆ : ९९६०७९८६२२

❖❖❖

## उद्योगशिक्षण वर्ग

१) सहायक परिचर्या (पुणे वर्ग) – **सौ. विजयालक्ष्मी कुलकर्णी, सौ. लता सत्तूर**
सहायक परिचर्या (आंबवणे वर्ग, नसरापूर) – **सौ. शशिकला विटेकर**
सहायक परिचर्या (माले वर्ग) – **सौ. नंदाताई बेंडखळे, सौ. सुजाता सातपुते**

२) शिवण वर्ग (पुणे) – **सौ. संगिता पाटील**
शिवण वर्ग (माले) – **सौ. संगीता कोंडेकर**

३) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

❖❖❖

## प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**

सौ. मनिषाताई नरडेकर (०२०-२६१२१७०४)

**अभ्यासिका केंद्र**

श्री. निलेश धायरकर (९०२९०७४५२१)

**ग्रंथालय**

श्रीमती नीलाताई कुडलिंगार (०२०-२६१२१७०४)

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

**पुणे मनपा शिक्षण मंडळ आणि 'स्व'-रूपवर्धिनी संचालित संयुक्त अभ्यासिका केंद्र**

सरदार कान्होजी आंग्रे विद्यालय,

शुक्रवार पेठ – श्री. वसंतराव भिडे ✆ : (०२०) २४४७१५०८

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

**ही जाणीव असू द्या की एखाद्याच्या पाठीमागे त्याची निंदा करणे हे पाप होय. हे पाप कधीही करू नका.**

## असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८
२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
३) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) आजोळ प्रकल्प (दुपार शाखा) : दुपारी २ ते ५
३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) – प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र – प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
९) बचतगट
१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळांमध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

सौ. मेघा नडे-नगरे

**कार्यालय विभाग**

कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
श्री. अशोकराव चिपळूणकर
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**सर्वांशी सख्य ठेवून वागा. अहंकाराचा पूर्णपणे त्याग करा.**

## प्रार्थना





नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३ ।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।



सर्वदा आनंदी व हसतमुख राहिल्याने तुम्ही ईश्वराच्या अधिक निकट जाल.